# मुंबईचे मानकरी

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०८८.



REFBK-0018188

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबअी ४.

# मुंबअीचे मानकरी

१०/१ ६/
७५४२६
११।३।७१
२०६७

[library stamp] ७५४२६ निबंध
२०६७ ११।३।७१

लेखक
बाळकृष्ण वामन फाटक
अण्णा, कारकुनांचे धंदे, चाळींतील चाळे
अित्यादि पुस्तकांचा कर्ता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८१८८

REFBK-0018188

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगांव, मुंबअी ४

मूल्य सव्वा रुपया

प्रकाशिका : सौ. सुधा गजानन परचुरे, गोरेगांवकर चाळ क्र. २, मुंबअी ४.
मुद्रक : मा. कृ. सहस्रबुद्धे, श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

# रामा



मुंबईत भांडीं घांसणाऱ्या आणि घरकाम करणाऱ्या गड्यांना ‘ रामा ’ म्हणायची पद्धत आहे. गड्यावांचून घरधनिणीचें पानही हालत नसल्यामुळें ती सारखी त्याच्या नांवानें हांका मारीत असते. तेव्हां ‘ अजित–नाम घडो भलत्या मिसें। सकळ पातक भस्म करीतसे। ’ या वामनोक्तीप्रमाणें तिच्या तोंडून वारंवार निघणाऱ्या ‘ रामा ’ या नांवामुळें अनायासें तिचा उद्धार व्हावा हा हेतु घरकामी गड्यांना ‘ रामा ’ म्हणून म्हणण्यांत असण्याचा संभव आहे. अर्थात् ही भाविकांची उपपत्ति झाली. दुसरे असें म्हणतील, कीं या मुंबईचें सारेंच न्यारें! इथें पैशाला ‘ दिडकी ’ म्हणतील आणि पारशाला ‘ बावाजी ’ म्हणतील; दक्षिणी इसमाला ‘ तात्या ’ म्हणतील आणि गाडीला ‘ व्हिक्टोरिया ’ म्हणतील! तेव्हां त्यांनीं गड्याला ‘ रामा ’ म्हटल्यास “ रामा, रामा, हरे हरे रामा! ” असें म्हणण्यावांचून आम्ही तरी काय करणार?

आणि यामुळें लोकांचाहि एक फायदा झाला आहे. आतां कुठल्याही घरगड्याला ‘ **रामा** ’ म्हणून हांक मारणें सोपें झालें आहे! मग त्याचें नांव **लक्ष्मण** असो नाहीं तर **रावण** असो!!

आपण मुंबईकर ज्याला ‘ रामा ’ म्हणतों तो माल मुंबईच्या दक्षिणेकडील कांहीं बंदरांतून निर्यात होतो. काळा रंग, हाडें मोजतां येतील अशी शरीरयष्टि, डोकीवर भरपूर शेंडी आणि अंगांत एखादा जीर्ण असा शर्ट नाहीं तर कोट. पहिल्यानेंच भाऊच्या धक्क्यावर उतरणाऱ्या या ‘ पार्सलाची ’ मुंबईच्या प्रचंड इमारती, मोटारी, ट्रामगाड्या, रंगीबेरंगी लोक आणि वेगवेगळ्या भाषा यामुळें जलाबाहेर पडलेल्या माशाप्रमाणें अवस्था होते. ज्या ठिकाणाहून तो आला, तेथें खावयास पुरेसें अन्न व नेसावयास पुरेसें वस्त्र नसलें तरी राहावयास व वाटेल तिकडे मोकळेपणीं फिरावयास विस्तीर्ण क्षेत्र असतें. साहजिकच मुंबईतील आपल्या गांववाल्याच्या आठदहा फुटी खोलींत नाहीं तर जिन्याखालीं बनविलेल्या निवासस्थानांत त्याला टोपलीखालीं ठेवलेल्या कोंबडीसारखें वाटत असल्यास आश्चर्य नाहीं !

हा ‘ कच्चा ’ माल मुंबईच्या बाजारांत आला, कीं त्याला ‘ पक्का ’ बनविण्यासाठीं एखाद्या कसलेल्या घरगड्याच्या हाताखालीं पोटावारी काम करावें लागतें. भांडीं घांसणें, धुणीं धुणें, असल्या कामांत लागणाऱ्या कष्टाचा त्याला जन्मजात अनुभव असतो. त्यामुळें वाटेल तेवढे शारीरिक कष्ट करावयास त्याची तयारी असते. प्रश्न असतो तो हें काम पद्धतशीर रीतीनें कसें करावयाचें ह्यासंबंधीं; आणि हेंच शिक्षण तो एखाद्या तरबेज इसमाच्या हाताखालीं घेतो. सर्व प्रकारचीं जनानी कामें करायला ह्या उमेदवाराला पटाईत बनविला, कीं त्याची हुषारी नजरेस येऊन, आळशी असलेल्या मुंबईकर स्त्रिया त्याला लगेच कामावर ठेवतात. कांहीं ठिकाणीं त्याला शेटचीं कामेंही करावीं लागतात. पण शक्य तों त्याच्याकडून घराबाहेरचीं कामें करून घेण्यापेक्षां घरांतील कामें करून घेणेंच शेटाणीला आवडतें. ‘ **रामा** ए करो, **रामा** ते करो ’ म्हणून त्याला ती सारखी फर्मावीत असते. बायकांचीं लुगडीं–पातळें धुणें, भांडीं घांसणें, चहा करणें, प्रसंगीं स्वयंपाकांतही हातभार लावणें यांत मर्दासारखा मर्द असून त्याला कांहीं वाटत नाहीं ! आणि ज्या लोकांशीं त्याचा संबंध येतो, ज्या तऱ्हेचीं तो कामें करतो त्यांसारखाच तोही बनतो. त्याच्यांत पुरुषी-

पणा असा दिसतच नाहीं. त्याचें वागणें, बोलणें, चालणें सर्व कांहीं बायकी छाप पडल्यासारखें बनून जातें.

एखाद्या बिल्डिंगच्या पुढील दारीं असण्यापेक्षां स्वयंपाक-घरांतच तो रमतो व नळाजवळ—भांडीं घांसण्याच्या ठिकाणीं—तर तो पुरा रंगून जातो. याच ठिकाणीं त्याला कंठ फुटतांना दिसतो! आपल्या गांवठी गाण्यांबरोबरच मुंबईतील सिनेमांतून ऐकलेलीं गाणींही तो मुक्त कंठानें गातांना आढळतो. रात्रीची वेळ आहे, भांडीं घांसण्याचे ठिकाणीं काळोखांत किंचित् प्रकाश पडलेला आहे अशा वेळीं भांडीं घांसत असलेली रामाची मूर्ति पाहिली, कीं खोल गाभाऱ्यांत मंद प्रकाशांतून अस्पष्ट दिसणाऱ्या देवळांतील मूर्ति पहात आहों असें वाटेल. तोंडानें जोरजोरानें गाण्याचा चरण घोळतो आहे आणि हातानें जोरजोरानें भांडें घांसतो आहे. यावेळीं त्याची जी लय लागते ती अवर्णनीय असते. त्याच्याभोंवतीं भाताचे शितकण, आमटी, वरण, भाजी, पोळी यांचे अवशेष इतस्ततः विखुरलेले दिसतील. ह्या जबरदस्त आकर्षणानें माशा, चिलटें, कॅबरीं आणि डांस तेथें घोंघावतांना आढळतील. या उडणाऱ्या प्राण्यांबरोबरच तेथील कोपऱ्यांत एखादी घूस अगर उंदीर शांतपणें बसून शितांवर ताव मारतांना तुम्ही पहाल. पोट भरणें आणि रामाला सोबत करणें असा स्वार्थ आणि परमार्थ साधण्यासाठींच उंदीर व घूस तेथें आलीं असावीं! पण रामाला त्याची दखलही नसते! किंबहुना तो कुणाच्या संगत-सोबतीची अपेक्षाही करीत नसतो. तो आपल्या कामांत इतका मशगुल होऊन गेलेला असतो, कीं शितें कुजून तेथें घाण सुटलेली असते त्याचीही तो दखलगिरी घेत नाहीं!

कपडे धुण्यासाठीं तो लांकडी दांड्याचा उपयोग करील तर भांडीं घांसण्यासाठीं काथ्या, राख व चिंच हीं साहित्यें घेईल. घरांतील दांड्यांवरून तो अशा शिस्तशीर रीतीनें कपडे वाळत घालील, कीं आजकालच्या फॅशनेबल बायकांनीं तें काम पाहून माना खालीं घालाव्या. पूर्वीच्या काळीं 'गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते' असें म्हणत. आतां गृहिणीच्या ठिकाणीं 'रामा' हा शब्द घालणें यथार्थ होईल. अलीकडच्या संसारांतील गृहसौख्य 'रामा' (पक्षीं स्त्रिया वर अवलंबून नसून 'रामा' (पक्षीं गडी) वर अवलंबून आहे. मला वाटतें घरगड्याला 'रामा' हें नांव

क़ां ठेविलें याची उपपत्ति अशीही असू शकेल. जो गडी बायकांचीं कामें करितो तो प्रति 'रामा' (स्त्री) समजला पाहिजे! किंवा त्याच्या कर्तबगारीनें त्यानें ती पदवीच मिळविली असें म्हणावयास हरकत नाहीं.

रामाला केवळ गृहिणीचीं कामें करूनच भागत नाहीं, घरांतील पोरांची आईही व्हावें लागतें. लहान पोरांना दूध पाजणें, कपडेलत्ते करणें, फिरावयास नेणें, झोंपविणें हीं कामें तो करतो. मोठ्या मुलांना व मुलींना शाळेस पोहोंचविणें हीं कामेंही त्याला करावीं लागतात. कोणा सुंदर मुलीमागून मुकाट तिचीं पुस्तकें घेऊन जाणारा रामा पाहिला, कीं एखाद्या कवीला आपणही 'रामा झालों असतों तर!' असा विचार येणें अपरिहार्य आहे. घरांतील सर्व प्रकारच्या कामाचा बोजा संभाळून मालकाच्या संसाराचा गाडा सुरळीत चालण्यास रामाचीच मदत होते. एखाद्या नवथरच लग्न झालेल्या जोडप्याच्या घरीं रामास नोकरी असेल तर मग रामावर घर चालविण्याचें काम पडतें. एखाद्या ठिकाणीं नुसता मालकच असेल तर खानावळींतून डबे आणून घरसंसार चालता ठेवण्याची जबाबदारी रामावरच असते. फार काय, मालक आणि घरांतील इतर मंडळी हवाबदल वा मुलखाला भेट देण्यासाटीं मुंबई सोडून गेली तर त्यांच्या गैरहजेरींत घर संभाळण्याची जबाबदारी रामालाच वहावी लागते. अशा वेळीं त्याच्या कामसूपणाचीच नव्हे, तर प्रामाणिकपणाचीही कसोटी लागते; आणि आनंदाची व अभिमानाची गोष्ट अशी, कीं रामा त्या कसोटीला पुरेपूर उतरतो. हजारो रुपयांचा माल, सोनेनाणें, दागदागिने खुशाल रामावर सोंपवून जावें आणि निश्चित रहावें.

रामाचें व्यसन म्हणजे पान-सुपारी. वेळ मिळाला, कीं त्यानें आपली पान-सुपारीचा पिशवी सोडलीच. किंबहुना आपल्या कामांतून ह्या कामासाठीं तो वेळ काढतोच. त्याचें तोंड सदासर्वकाळ पानानें रंगलेलें असतें. त्याच्या कृष्णमुखावरील ते लाल ओंठ पाहिले, कीं कुणाला पेटलेल्या उदबत्तीची आठवण होणें अपरिहार्य आहे! हो, त्याला आणखी एक मोटें व्यसन असतें; आणि तें तो मध्येंच एखादा दिवस नाहींसा होऊन भागवून येतो. दिवसांतून चोवीस तास राबणारा व सदा पाण्यांत काम करीत असल्यामुळें ज्याचे हात कुजल्यासारखे झाले आहेत असा रामा आपले

हें सर्व कष्ट ' बाटलींत ' बुडवून टाकतो आणि पुन्हां काम करण्यास ताजा-तवाना होऊन येतो.

एरव्हीं तो नेहमीं कामांत गढलेला असला, तरी मधूनमधून त्याला घरची आठवण देण्याचें काम ' मुलुखांतून ' येणारीं पत्रें करीत असतात. या पत्रांतून गुरां-वासरांच्या खुशालीपासून घरांतील सर्व माणसांच्या गरजांचा पाढा वाचलेला असतो व पैशाची मागणी केलेली असते. रामानें घर सोडलेलें असतें तेंच मुळीं उताराला सावकाराकडून पैसें घेऊन. त्याखेरीज घरीं राहून कर्ज उभारण्याचें काम त्याची नातेवाईक मंडळी करीत असतातच. पुढें हा स्वतःचें लग्न वगैरे करण्याच्या फंदांत पडला, कीं आणखी कर्ज काढतो. श्रीमंताचें पोर ' तोंडांत चांदीचा चमचा घेऊन जन्मास आलें ' असें म्हणण्याची वहिवाट आहे; त्याप्रमाणें रामा हा पिढीजात कर्ज घेऊन जन्मास येतो, कर्जांतच वाढतो आणि या फाटलेल्या आकाशाला ठिगळ जोडणें त्याच्या आवांक्याबाहेरचें असल्यामुळें कर्जांतच मरतो. एकसारखें राबावयाचें आणि जे काय पांच-दहा रुपये मिळतील ते मुलखांत पाठवावयाचे, यासाठींच तो जगत असतो.

रामा हा निरुपद्रवी प्राणी आहे. लोकांना एरवीं त्याचें अस्तित्वही भासत नाहीं. बिळांतून उंदीर डोकावतो त्याप्रमाणें चाळीच्या दारांतून तो डोकावतांना दिसतो. मुंबईत हजारो रामालोक काम करीत असतील; पण ते गिरणबाबूंप्रमाणें फिरतांना आढळणार नाहींत. कदाचित् दहा-पांच रामा आढळले तर डोक्यावर पोतें घेऊन भाऊच्या धक्क्यावर जाण्यासाठीं गोळा झाले आहेत अगर त्यांच्यांतील कोणी ' खतम् ' झाल्यामुळें नाना शंकरशेट वाडीकडे चालले आहेत म्हणून खुशाल समजावें !

हां; पण या रामालोकांनीं एकत्र येऊन आपल्या स्वभावाला न साजेसें आचरण करण्याचा एक दिवस येतो तो अवश्य सांगितला पाहिजे. तो म्हणजे कृष्णाष्टमीचा दिवस. या दिवशीं जणुं त्यांच्या अंगांत संचार झाल्यासारखा दिसतो.

**' गोविंदा आला रे आला । गोकुळांत आनंद झाला ॥ '**
अशी गर्जना करीत श्रीकृष्णजन्माच्या आनंदानें बेहोष झालेले रामा-लोक नाचूं लागले, कीं आनंदानें रामांच्या रूपानें जणुं नृत्यरूप धारण

केलें आहे असें वाटतें. एकाचा हात दुसऱ्याच्या हातांत अडकवून आनंदाची जणुं सांखळीच निर्माण झाल्याचा भास होतो. नाचतांना त्यांच्या शरीराला मिळणारा मोहक बांक मोठा प्रेक्षणीय असतो. प्रत्येक उडीबरोबर आणखी पिंजारले जाणारे केंस आणि मधूनच उठून पडणारी गांठदार शेंडी पाहिली, कीं मुसलमानी टोपीच्या गोंड्याची आठवण होते. अंगांत रंगीबेरंगी पट्टे असलेला गंजीफ्रॉक अगर गळयाभोंवतीं गुंडाळलेली रंगीत मफलर हा त्याचा सणासुदीचा पोशाख ह्या प्रसंगीं त्याच्या अंगावर दिसतो. त्याच्या हातांत एखादी काठी, बनाटी नाहीतर टोंकाला गदेसारखा भाग बनविला आहे असें कांहींतरी आढळतें. कांहीं जणांजवळ वल्ह्या-सारख्या काठ्याही असतात; आणि त्यांची हालचाल जणुं आपण होडी वल्हवितों आहों अशा ऐटींत करीत ते नाचत जातात. तोंडानें आपली ऐट मिरविणारी—

**एक दोन तीन चार । कांदेवाडीचे पोऱ्ये हुषार ॥** अशी गर्जना चालू असते. यावेळीं तो मुखदुर्बळ, भित्रा आणि मवाळ दिसणारा रामा कुठेंच लोपून गेलेला असतो. वर्षांतील तीनशेचौसष्ठ दिवस ज्या रामाचें दर्शन होतें तो रामा आतां राहिलेला नाहीं. आज त्याला स्वर्गसुख तुच्छ वाटत असून त्याच्या अंगावर आनंदाचे रोमांच उभे राहिलेले दिसत आहेत. त्याच्या या आनंदांत भर घालण्यासाठीं कीं काय, चाळींतील वरच्या मजल्यावरून रस्त्यावरून नाचत जाणाऱ्या रामांवर पाण्याचे घडेच्या घडे पालथे केले जात आहेत. पूर्वींच्या काळीं आकाशांतून पुष्पवृष्टि होत असे असें आपण वाचतों. आतांच्या काळीं तिनें जलवृष्टीचें रूप धारण केलें आहे असें म्हटलें पाहिजे. पाणी घातलेलें झाड जसें तरारतें तसा रामालोकांचा देह पाणी खाऊन तरारून निघतो. टिपऱ्यांच्या तालावर त्यांचा नाच जोरांत चालू होतो.

हातांत हात घालून नाचत जाणाऱ्या रामांच्या टोळीपुढें एक तिरंगी व एक भगवें निशाण फडकत चाललेलें दिसतें. भगव्या झेंड्यावरील पिढीजात प्रेम कमी होत नाहीं आणि नव्यानें उदय पावलेल्या तिरंगी झेंड्याचें आकर्षण आवरतां येत नाहीं, अशा मनःस्थितींत दोन्हींही निशाणें फडकत राहिल्यास नवल तें काय ?

एखादी टोळधाड आली, कीं जसें सर्वत्र कृष्णरूप होऊन जातें, तशी कृष्णरंगी रामांची धाड आली, कीं सर्व गल्ली कृष्णरूप बनून जाते. एकाएकीं उडत आलेले हे हजारो टोळ होते तरी कुठें असा प्रश्न उद्भवतो, तद्वत् शेंकड्यांनीं नाचत येणारे रामालोक होते तरी कुठें असें वाटल्यास वावगें नाहीं. रस्त्यावरून गल्लींत, गल्लींतून बोळांत आणि एखाद्या शेटच्या दारीं जाऊन ही टोळी उंचावर टांगलेली हंडी मोठ्या शिताफीनें फोडून 'गोपाळकाला' साजरा करीत पुढील मोहिमेवर रवाना होते.

शिमग्याच्या प्रसंगीं रामालोक जीं सोंगें घेतात तीं प्रेक्षणीय असतात. कुणी साहेब बनतो तर कुणी दुसरें कांहीं होतो. त्यांतील एखादा जें स्त्रीसोंग काढतो तें पाहून अर्धनारीनटेश्वराची आठवण होते. स्त्री दिसण्यासाठीं पुढच्या केंसांचा भांग काढलेला असून मागें पुरुषी शेंडी लोंबते आहे, कुठूनतरी पैदा केलेलें लुगडें अंगावर दिसलें तर अंगांत चोळीऐवजीं रंगीत गंजीफ्रॉक उठून दिसतो आहे, हातांत बांगड्यांऐवजीं चांदीचीं कडीं शोभत आहेत, पायांत पैंजण घातलेले असून कपाळीं कुंकवाचा मळवट भरला आहे, ओंठावर नुकतीच उगवूं लागलेली मिशी तशीच राहूं दिलेली आहे आणि तोंडांतून विडीचा धूर काढीत चालला आहे, असें हें स्त्रीपात्र पाहिलें, कीं अर्धनारीनटेश्वराची आठवण होणार नाहीं तर होणार काय ?

मालकाकडून पोस्त उकळण्यास हीच संधि योग्य असल्यामुळें रामालोक आपला संच घेऊन शेटच्या दारावर हजर होतात. दारासमोर गाणें आणि नाचणें यांचा एकच जल्लोष उडवून देतात. त्यांचें तें नाचणें आणि गाणें पहाण्यापेक्षां व ऐकण्यापेक्षां पोस्त देऊन सुटका करून घेणेंच मालकाला सुखावह होतें !

रामाच्या आयुष्यांत आढळणारा एवढा हा सुखाचा दिवस वर्ज्य करितां कर्ज आणि कष्ट यांखेरीज त्याच्या नशिबीं दुसरें कांहीं दिसत नाहीं !

—*—

# कोपऱ्यांतील कारागीर



फाटक्या चपला, जोडे आणि बूट नीट करून देणारा हा कारागीर अशी कांहीं मोक्याची जागा धरून बसतो, कीं तेथून त्याला आपल्या सावजांवर अचूक मारा करितां येतो. त्याचें लक्ष येणाऱ्याजाणाऱ्या माणसाच्या चेहऱ्यावर कधींच नसतें. एखाद्या सुंदर स्त्रीच्या मुखकमलापेक्षां पदकमलाकडेच हा भृंग आकर्षिला जातो! लोकांच्या पायांवर हा आशेचे मनोरे उभारीत असतो. कोळी आपलें जाळें पसरून बसतो त्याप्रमाणें हा आपल्या नाना तऱ्हेच्या मालाचा पसारा मांडून बसलेला असतो. उडत जाणारी माशी अचानक त्या कोळयाच्या जाळयांत अडकते, तसा त्या वाटेनें जाणारा बेसावध वाटसरू ह्या कारागिराच्या अचूक तावडींत सांपडून त्याची शिकार बनतो. तुमची इच्छा नसली तरी तुमचें लक्ष तो आपल्याकडे ओढून घेतो. आतां लांब कशाला? अस्मादिकांचाच अनुभव पहा ना!

एकदां काय झालें, मी असाच रस्त्यावरून चाललों होतों. सहज माझी नजर एका भिंतीच्या कोंपऱ्यावर गेली. तेथें कोळशानें मोठमोठ्या अक्षरांत लिहिलें होतें, "दुकान आहे लहान। पण काम होतंय छान." ह्या काव्यमय ओळी वाचल्या आणि माझ्या कवि–मनाला कौतुक वाटलें. रंगीबेरंगी सोनेरी अक्षरांच्या मोठमोठ्या पाट्या लावून जें काम झालें नसतें तें या छोट्या काव्यपंक्तीनें होत होतें. आतां हें दुकान आहे तरी

कसलें म्हणून मीं खालीं पाहिलें. मागच्या भिंतींत दोन जाडजूड खिळे ठोकून त्यांना गोणपाटाच्या एका फाटक्या तुकड्याचीं दोन टोकें बांधलेलीं होतीं. या तुकड्याचा पुढचा भाग बांबूच्या दोन तिरक्या उभ्या केलेल्या काठ्यांच्या आश्रयानें वाऱ्यावर फडफडत होता. अशा या और छत्राखालीं एक इसम चपला शिवण्याचें काम करीत होता. कोल्हापुरी, कारवारी वगैरे वेगवेगळया फॅशनच्या जुन्याच्या नव्या बनविलेल्या तीन–चार चपलांचा प्रचंड 'स्टॉक' त्या भिंतीवर 'खालीं डोकें वर पाय' अशा स्थितींत लटकवून ठेवलेला होता. पॉलिश केलेला एक काळा बूट तेथें इस्पिकच्या एक्क्यासारखा शोभत होता ! आतां या कारागिराच्या आजुबाजूला मीं नजर फिरविली. शेजारींच एक टिनचें टमरेल पाण्यानें भरून ठेवलेलें होतें. मागच्या बाजूस एक मोडकी लाकडी पेटी होती. सर्वसाधारण स्त्रीसमूहांत एखादी चटकचांदणी उठून दिसावी तशी बुटपॉलिशची डबी चमकत होती. चुका, खिळे, चंद्रकोरीसारखे छोटे छोटे नाल, घोड्याच्याही पायाला फिट् बसतील एवढे प्रचंड लोखंडी नाल आणि वाटोळे, लांबट, पांढरे व काळे रबरी सोल एका फळीवर लावून ठेविलेले होते. एखादा भुक्कड कवि 'इकडून–तिकडून' आणलेल्या बुद्धीचा उपयोग करून आपला काव्यसंसार थाटतो, तसा हा कारागीर इकडून–तिकडून आणलेल्या कातड्यांच्या तुकडयांचा उपयोग करून आपला धंदा चालवीत असतो !

कारागिराच्या दुकानाचा हा सर्व सरंजाम पाहिल्यावर त्याच्या चेहऱ्याकडे पहाण्याची मला बुद्धि झाली. मीं त्याच्या चेहऱ्यावर नजर फेकायला आणि त्यानें माझ्या पायांवर दृष्टि फेकायला एकच गांठ पडली. माझ्या पायांतील कोऱ्याकरकरीत चपला पाहिल्यावर त्याचा चेहरा पडला. पण पडला तरी पुन्हां प्रयत्न करणाऱ्या 'एका कोळिया'प्रमाणें त्यानें आतां वेगळाच पवित्रा टाकला. "शेट, पालिश करून देऊं का ?" त्यानें अजीजीच्या सुरांत म्हटलें.

त्या गांवचाच नव्हे अशा ऐटींत मी दुसरीकडे पाहूं लागलों.

"नव्या चपलास्नी पालिश करून घेतलं, कीं त्या दिसतात लई छान, आन् टिकायलाबी येत्यात." त्यानें गळ टाकला.

मीं निर्विकार मुद्रेनें त्याच्याकडे पाहिलें.

"शेट, नाहींतर या चपलास्नी नाल मारून घ्या. सस्त्यांत देतों. आठबारा आनं खर्च व्हत्याल पन वरीसभर काम घेत्याल."

"तो मोठा लोखंडी नाल लावणार काय रे? मला काय घोडा समजतोस कीं काय?" मीं हंसत हंसत विचारलें.

"आतां ह्ये पगा! मी काय घोड्यावानी तुमच्या पायाला नाल मारनार व्हय? तुमच्या चेपल्यास्नी नाल मारीन म्हटलं मीं. उगाच गरिबाची चेष्टा कशाला करतां राव?"

"नाल? नको रे बाबा! तुझ्यासारख्यानं मागं एकदां असंच मला सांगितलं तें ऐकून मीं नाल मारून घेतले आणि चप्पल घसरून पडलों. नशीब, त्या वेळीं माझे दांत शाबूत राहिले."

"तुमीं असलं कटीन लोकंडी नाल मारून घेतलं असत्याल–" आणि त्यानें जवळचे छोटेमोठे नाल पुढें करून दाखविले.

"कठीण लोखंडाचे नव्हे तर तूं काय मऊमऊ लोण्याचे नाल मारणार असशील?" मीं खवचटपणें विचारलें.

"लोन्याचे कसे मारीन? पन लोन्यावानी मऊमऊ असं कायतरी मारून देईन खास!"

"तें काय बुवा?" माझी जिज्ञासा जागृत होऊन मीं विचारलें.

"अवो, ह्ये रबरी सोल हायती न्हवं का? त्ये खोटंपासून अंगठ्यापवतर मारून घ्या. चपला झिजायची भीतीच न्हाई. आन् पैसंबी लई न्हाई पडायचं—"

"किती पैसे घेशील?" मीं मुद्दामच विचारलें.

त्याच्या चेहऱ्यावर आशेचा किरण दिसला. त्यानें उत्तर दिलें, "अवो, तुम्हापास्नं काय हत्तीघोडं थोडंच घ्येनार? दोन रुपयं द्या आन् चांगलं वरीसभर चालां कीं राव!"

"छे; तुझे हे रबरी सोल कांहीं आपणाला नकोत. ते सोल लावले म्हणजे माझ्या ह्या चपला पोलिसांच्या चपलांसारख्या जाडजूड दिसायला लागतील."

" मग त्येच्यामंदीं काय बिगडलं ? "

" आतां ह्या जशा पातळ, फॅशनेबल आणि नाजुक दिसतात तशा दिसायच्या नाहींत. शिवाय सोल लाविलेल्या चपला वापरल्या तर त्यांचा डोळ्यांवर परिणाम होतो म्हणतात. "

" आतां इकतं लोक मारून घ्येत्यात त्ये येडं आन् तुमीच मुल्का-येगळं— "

" शहाणे ! असंच ना ? बरं बरं, समजलं ! उगीच वाद कशाला ? मला कांहीं तुझे ते लोखंडी नाल नकोत कीं रबरी सोल नकोत ! "

" मर्जी तुमची ! आजकाल कुनाला सांगायला जावं बरं, तर त्यो म्हनतो माजंच खरं !! "

पण त्याचे पुढील शब्द ऐकायला मी उभा राहतोंच कशाला ?

* * *

पण दुर्दैवाची गोष्ट अशी, कीं हा कारागीर बसतो तें ठिकाण आणि ट्रॅमचा स्टॅंड हीं नजीक येत असल्यामुळें मला तेथें वरचेवर जावें लागे. कांहीं दिवसांनंतर मी असाच त्या स्टॅंडवर गेलों असतांना पहातों तर कारागिराची स्वारी गाण्यांत रंगून गेली आहे ! जवळच एक पाटीवाला आपल्या पाटीचा तक्क्या करून टेकून बसला असून त्यांचें कांहीं संभाषणही चालू आहे.

मी पाठमोरा उभा होतों. साहजिकच मीं कान टवकारले.

" आ ! काय र ऽ ? आज लईसा रंगलायास ? " पाटीवाल्यानें विचारलें.

" काय इचारूं नगस ! काल रातचा त्यो शिणिमा पगितला आन् त्येतल्या मस्त लावन्या ऐकून जीव अगदीं येडा झाला गड्या ! पुना पगिनसा वाटतो पन पैसं न्हाईत. आतां येवडं ह्ये बूट पालिस करून ठिवतो आन् पगतो येकांदं गिऱ्हाईक गवसतं का ! ह्या मंमईत गिऱ्हाईकाला काय कमी न्हाई म्हना ! पन येक हाय. हतं काम कसं अगदीं झटपट व्हाया होवं. हतं या मंमईत जर का माजा बाबा दुकान मांडून बसला असता तर त्येचा निकालच लागला असता ! "

" आन् त्यो कसा काय ? " पाटीवाल्यानें प्रश्न केला.

" माज्या बाकडं कुनीं चप्पल, जोडा, नीट करायला दिला आन् त्येनं त्यो येळेवर दिला असं कंदीं झालंच न्हाई ! आज या, उद्यां या, करून-श्यान गिऱ्हाईकाला धा-पांच खेटं घालायला लावल्याखेरीज त्येच्या जिवाला गोडच वाटायचं न्हाई त्यें ! मग गिऱ्हाईकानं त्येला शेवटीं शिव्याबी द्यायच्या; आन् त्या ऐकून त्यो लई खूष व्हायचा ! असा होता माजा बा. पन त्याच बाबाचा ह्यो ल्योक तसा वागायला गेला, तर ह्या मंमईत–' मी न्हाई माजा बा ' मस्त शिवनार पडल्यात कीं ! "

" मग आपल्या बाबासारका तूं गांवांतच कां न्हाई राह्यलास ? "

" आर ऽ हाय काय त्या खेड्यांत ? जिमनीचा तुकडा व्हता त्यो बानं दारू पिऊन घाल्वला. घरबी घान टाकलं सावकाराकडं. बा गमावला आन् मीं इचार केला, आतां मंमईला जावं आन् पगावं चार पैसं मिळलं तर. "

" बाकी तूं मंमईला आलास आन् तुजं सारं ठीक जमल्यालं दिसतंया. खातोस, पितोस, मौज करतोस, तमाशा आन् शिणिमाबी पगतुंयास. तवा तुला गांवची आटवन कशी येनार ? "

" आटवन् येत न्हाई असं कसं व्हईल ? कंदीं कंदीं गांवाला जावं असं वाटतं. पन् पुन्हां इचार करतों, इथल्यावानी हाय काय ततं ? हतं ' ए पोऱ्या, शिंगल चा आन् ' म्हटलं, कीं पोऱ्या ' चा ' आनून देतोया कीं बसल्या जागेवर... "

" आन् गांवामंदीं हाटलास्नी तोटाच गेला असंल ? "

" हाटलं लई हायती. पन् त्येंच्या दारांत भिकाऱ्यावानी टमरेल हातांत घेऊन उभं रहावं लागतं. हाटल्वाल्यानं त्यामंदीं ' चा ' घातला तर नशीब ! त्येंच या मंमईत कुटल्याबी हाटलांत जाऊन ' चा ' प्यावा कीं राजासारका खुर्चीवर बसूनशान् ! "

" अर ऽ पन् समद्या अस्परशास्नी हाटलांत घेतलंच पायजे असा आतां सरकारचा कायदा झालाया...... "

" त्ये खरं रे; पन कायद्यानं का कुटं कामं व्हत्यात ? मानसाचं मन बदललं पायजे. आतां तूंच पग. तूं माज्या शेजारीं बसला हायस, तसा गांवामंदीं बसचील व्हय र ? "

" छा छा ! ततं कसा बसनार ? गांवचं लोक काय म्हनत्याल ? "

" मीबी त्येंच म्हनतों. गांवामंदीं लोक आमास्नी हिडीसफिडीस करत्यात. लोक कुत्र्या–मांजराला अंगाखांद्यावर घेऊन खेळिवत्यात पन आमास्नी इस्पर्श केला तर त्येस्नी इंटाळ व्हतो ! अर ऽ चेपला नीट करायच्या असल्या तर दुरूनच फेकत्यात आमच्या अंगावर. मी म्हनतों, त्यापरीस मंमई बरी. हतं आपून मानूस आहो असं वाटतं मनाला. बरं जाऊं द्या त्ये ! येकांदी इडी असली तर काड गड्या. फर्मास व्होवी. "

" इडी हाय पन काडी न्हाई. "

" पेटी हाय माज्याकडं. तुजी इडी आन् माजी काडी; एक झुरका मारूं. "

त्या दोघांचा हा संवाद मीं कान देऊन ऐकला. एरवीं ट्राम यावयास उशीर झाला म्हणून मी चडफडलों असतों. पण आज मला ती इष्टापत्तीच वाटली. त्यामुळें त्या कारागिराचें अंतरंग कळण्याची मला संधि मिळाली.

* * *

तीनचार महिन्यांनंतरची गोष्ट. मी पुन्हां त्या स्टँडवर येऊं लागलों होतों. कारागिराची नजर गिऱ्हाईक हेरण्याचें काम करीतच होती. सहज एके दिवशीं माझ्या चपलेचा अंगठा तुटल्याचें त्यानें माझ्या ध्यानीं आणून दिलें. पुढें चारपांच दिवसांनीं पुन्हां त्या स्टँडवर गेलों असतां माझ्या चपलांची वादी तुटायला झाली असून ती लावून घेणें जरूर असल्याची त्यानें मला जाणीव करून दिली. पण मीं नेहमींप्रमाणें त्याच्याकडे दुर्लक्षच केलें. आणखी एक दिवस गेला. जागा मिळविण्यासाठीं ट्रॅमच्या दांड्याला धरून मी आंत उडी मारूं लागलों. माझ्यामागून येणाऱ्या इसमानेंहि माझेंच अनुकरण केलें. त्याचा पाय माझ्या चपलेच्या खोटेवर पडला आणि तट्कन् वरचा आडवा पट्टा तुटून चप्पल रस्त्यावर पडली. मी मात्र त्या जाणाऱ्या ट्रॅमबरोबर चांगला एक फर्लांगभर पुढें गेलों !

ट्राममधील रिकामी जागा मिळविण्यापेक्षां मागें पडलेली चप्पल मिळविणेंच मोलाचें होतें. कारण ती तशीच सोडून केवळ एका चपलेवर व्यवहार चालणें शक्य नव्हतें. बरें, नवी विकत घ्यावयाची तर पांच-सहा रुपये खर्च येणार होता. मीं ट्राममधून धाडकन् उडी मारली; पळतच मागें गेलों! ती पडलेली चप्पल उचलली आणि दांतीं तृण धरून एखाद्याला शरण जावें त्याप्रमाणें हातीं चप्पल घेऊन त्या कोपऱ्यावरील कारागिराला शरण गेलों!

हातांत चप्पल धरून असहाय्य स्थितींत मी येत आहें हें त्यानें पाहिलें आणि त्यानें आपण कामांत गढल्याचा बहाणा केला.

त्याच्यापुढें चप्पल टाकून मीं म्हटलें, "ही चप्पल नीट करायची आहे. काय घेशील?"

त्यानें बेदरकारपणें ती चप्पल उचलली आणि मागेंपुढें करून पाहिली आणि म्हटलें, "दोन रुपये व्हत्याल."

"काय, दोन रुपये!" मी चमकून उद्गारलों. माझ्या अगतिक स्थितीचा तो फायदा घेऊं पहात आहे हें मीं ताडलें.

"कमी न्हाइ व्हायचं. अवो, हाय काय या चपलेंत? नुसतं चामडं राह्यल्यालं हाय. अंगठा लावाया व्होवा, वाद्या बसवल्या पायजेत आन् वरचा पट्टाबी शिवाया व्होवा."

"तें खरं, पण दोन रुपये म्हणजे फार आहेत."

"अवो, ही काय एकच चप्पल नीट करून भागनार हाय? दोनीबी नीट कराया व्होव्या."

"दुसरी कशाला? ती चांगली मजबूत आहे अजून."

"शेट, तीबी हिच्याइकतीच वापरल्याली हाय. आज ना उद्यां तीबी फाटनारच. तवा अदुगरच नीट करून घेतल्याली काय वाईट?"

"बरं, कर काय तें; पण ...... दोन रुपये म्हणजे भलतीच किंमत सांगतोस ..."

"अवो, ह्ये कमतीच हायती. नवी चप्पल घ्यायला जा. पांच-सहा रुपयांखालीं मिळाली तर माजं नांव बदलून देईन. बरं, तुमी काय घेनार?"

" देईन रुपयाभर. "

" आतां रुपयासाठीं घासाघीस करूं नका. माजं काम बगा; एकदां करून घेतलंत कीं परत यालच तुम्ही. "

" पण दोन रुपये म्हणजे..."

" बरं पावनेदोन द्या " म्हणत त्यानें चप्पल उचलली.

" तुझंही नको नी माझंही नको. दीड रुपया ठरला. " मीं नाखुषीनें म्हटलें. एकदां तर इतके पैसे देण्यापेक्षां निघून जावें असाही विचार माझ्या मनांत आला.

" बरं हाय. " म्हणून ती चप्पल टमरेलांतील पाण्यांत बुडवून त्यानें कामाला सुरवात केली.

" मी पूर्वी सांगत व्हतों तवा ऐकला न्हाईसा; तवा नाल मारलं असतं, न्हाईतर सोल घातला असता तर आज रिपेर करून घ्यावी लागली असती व्हय ? पन गरिबाचं ऐकतो कोन ? "

खिंडींत गांठून तो मला चार गोष्टी सुनवीत होता !

मी मुकाट्यानें त्याचें बोलणें ऐकत राहिलों आणि ती नीट झालेली चप्पल घेऊन निघालों.

* * *

या गोष्टीला आठवडा झाला असेल. त्याला चांगला दीड रुपया देऊन नीट करून घेतलेली ती चप्पल तुटली. अर्थात् मी फारच रागावलों; आणि ती त्या कारागिराला नेऊन दाखविली आणि जाब विचारला. तेव्हां तो हंसत हंसत म्हणाला, " अवो, तुटनार न्हाई तर काय व्हनार ? दोऱ्यानं शिवल्याली चप्पल तुटनारच. "

" पण तूं दोऱ्यानं कां शिवलीस ? चामड्याच्या वादीनं कां नाहीं शिवलीस ? " मीं जोरानें विचारलें.

" तुमची फॅशनेबल चप्पल चामड्यानं शिवली असती तर ग्वाड दिसली असती व्हय ? लोक म्हंगलं असतं ह्यो शिवनारा कारागीर हाय का हाय त्तरी कोन ? "

" बरं, मग आतां ? "

" आतां माजं ऐका. ह्या असल्या मंमई—फॅशनच्या चपलांच्या भानगडींत नका पडूं. त्या मंमईच्या मानसावानी नाजूक आन् पुळचट असत्यात. चांगल्या मर्दाला सोभत्याल अशा कोल्हापुरी वहाना घ्या. अखंड सोल, काम फक्कड. तिचा अंगठा न्हाईतर वादी तुटली, तर मान कापून देईन. बरं, किंमतबी लई न्हाई ....."

" कोल्हापुरी वहाणेची किंमत काय होईल ? "

" व्हत्याल चार रुपय. आतां माज्याकडं दोन रुपय देऊन ठिवा. चांगलं चामडं आनतों आन् ' फसकलास ' चेपल्या बनवतों. उद्यां या येळला या आन् आपल्या वहाना घेऊन जा. "

मीं विचार केला, त्या जुन्या परत नीट करून घेण्यापेक्षां हा म्हणतो त्या कोल्हापुरीला ' ट्रायल ' द्यावी. मीं त्याला दोन रुपये दिले.

दुसऱ्या दिवशीं चप्पल आणण्यासाठीं गेलों तेव्हां चामडं मिळालं नाहीं, म्हणून तयार नाहींत असें त्यानें सांगितलें !

तेव्हांपासून आजवर तो अनेक सबबी सांगतो आहे आणि मी खेटे घालतों आहें ! !

— * —




"माफ करो!"

जरा तोंड वेडेंवांकडें करून बाबुराव म्हणाला.

"माफ करो!!"

त्यानें जरा मोठ्या आवाजांत म्हटलें.

"माफ करो!!!"

त्याचा केवळ आवाजच चढला असें नव्हे, तर तो जागचा हलला आणि जणूं मारणार असा त्यानें आविर्भाव केला.

इतका वेळ गुळाला चिकटणाऱ्या मुंगळ्याप्रमाणें लोंचटपणें उभा राहिलेल्या भिकाऱ्याला आतां मात्र आपली धडगत नाहींसें वाटलें आणि त्यानें काढता पाय घेतला.

आतां खरें पाहिलें तर यांत बाबुरावाचा तरी काय दोष? सकाळपासून बिचारा सारखा भिकाऱ्यांच्या तावडींत सांपडला आणि कंटाळून नुकताच कोठें चौपाटीच्या गार वाळूवर बसून शांततासुख अनुभवण्याच्या विचारांत होता, तोंच हा भिकारी 'शे ऽऽठ' म्हणून तोंड वांकडें करून पुढें दत्त म्हणून उभा! मुंबईत जरा टाकटीक पोशाख करणाऱ्याच्यामागें एखादा भिकारी लागला नाहीं असें होतच नाहीं. तो त्याला कुठें गांठील, कसा

गांठील याचा मुळीं नेमच नाहीं ना! या भिकाऱ्यांनीं सर्व दिवसभर बाबुरावाला कसें सळो कीं पळो करून सोडलें होतें हें सांगितलें, म्हणजे तो इतका भडकला याचें कारण कळेल.

* * *

सकाळीं फिरावयास जाणें हा बाबुरावाचा नियम. सकाळच्या शांत वेळीं, सूर्याच्या सोनेरी किरणांनीं नटलेली सृष्टि कशी आनंदी दिसत असते! पण हा आनंद लुटण्याचें भाग्य बाबुरावाच्या नशिबीं नसे. तो घराबाहेर पडला, कीं त्याच्या मागें कोणी ना कोणी लगेच. "शेऽट थंडीनं कुडकुडतोंय्, जरा चहाला चार पैसे द्या ना." म्हणून कोणी पाठीस लागे, तर "सर, वुइल यू फेवर मी वुईथ फाईव्ह आनाज्?" म्हणून कुणी सुशिक्षित भिकारीही त्याला गांठी. शहरांतील रस्त्यावरील भिकाऱ्याच्या या जाचाला कंटाळून जनसंमर्दापासून दूर अशा एकांत जागीं जाण्याच्या उद्देशानें बाबुराव ठाकुरद्वारच्या रस्त्यानें चर्नी रोड स्टेशनकडे जावयास निघे. त्या रस्त्यानें जातांना सारा रस्ता निर्मानुष पाहून तोंडानें शीळ घालीत मोठ्या आनंदानें तो मरीन लाईन्सच्या रस्त्याला लागतो न लागतो, तोंच फूटपाथवर बसलेली भिकारीण आपल्याजवळच्या लहान मुलासाठीं दूध पाहिजे म्हणून वांकडें तोंड करून पैसा मागूं लागे. तिला टाकून पुढें जातो, तों फूटपाथरीवरील इतर भिकारी त्याला आडवे येत. यावेळीं तेही आपल्या मोहिमेवर जाण्याच्या तयारींत असत आणि त्यांना समोर दिसे बाबुराव! मग काय, पहिली स्वारी त्याच्यावरच होई!! या भिकाऱ्यांत एकटादुकटा भिकारी बाबुरावाला दिसत असे असें नव्हे, तर 'सहकुटुंब सहपरिवार' आपली कार्यसिद्धि करण्यासाठीं सज्ज झालेले भिकारीही त्याच्या दृष्टीस पडत. अर्थात् हवा खाण्याऐवजीं भिकाऱ्यांना नकार दिल्यामुळें त्यांनीं दिलेल्या शिव्या खाण्यांतच बाबुरावाला सुख मानून घ्यावें लागे!

* * *

ऑफिसची वेळ होती आणि बाबुराव खुषींत होता. अशा खुषींत तोंडांतला विडा चघळीत स्वारी चालली होती. आतां आपण ट्रॅममध्यें

१८१८८

बसलों, कीं भिकाऱ्यांच्या तावडींतून सुटणार हा गोड विचार त्याच्या डोक्यांत घोळत होता. तो ट्रॅम स्टँडवर आला. पहातो तर ट्रामचा पत्ता नाहीं ! आतां ' कर कटावरी ठेवूनीया ' फूटपाथवर पंढरीनाथ होऊन उभे राहण्यावांचून गत्यंतर नव्हतें. तो उभा आहे असें पाहतांच बाबुरावावर गेली एका भिकारणीची नजर ! " शेऽऽठ ! " आपल्या चेहऱ्यावर शक्य तेवढी दीनता आणून ती म्हणाली, " गरीबने एक पैसा आपो ने. " बाबुरावानें तिच्या चेहऱ्यावर नजर टाकली. त्याचा चेहरा बदलला. त्याचा हात वर झाला; पण तो खिशांत जाण्याऐवजीं कांखेंत गेला. त्यानें कांखेंतील फुकटांत मिळविलेलें वर्तमानपत्र काढलें. बाईची त्याच्यावर नजर होतीच. त्यानें तिच्या अस्तित्वाची जाणीवही नसल्याचें दर्शवून वर्तमानपत्र उघडून वाचण्यांत गढल्यासारखें दाखविलें. पण नजर मात्र हळूच त्या बाईवर लावली. त्याला वाटलें आपल्या एवढ्या आविर्भावानें ती बाई हटेल; पण ही समजूत सुतराम् खोटी ठरली. बाबुरावानें आपल्या कांखेंतील पेपर काढून तिला चकविण्याचा प्रयत्न केला, तर तिनें आपल्या कडेवरील पोर खालीं उतरून त्याला उत्तर देण्यास कमर कसली. तें पोर जें खालीं आलें तें बाबुरावाचे पायच धरून बसलें नी काय ! मग मात्र त्याच्या पायाची हालचाल झाली आणि " ये क्या ? बाजू हटो " म्हणत त्यानें तिथून ' पपा 'ची बाराखडी काढण्याचा विचार केला; पण हातचें सावज असें सहजासहजीं जाऊं देण्याइतकी ती बाई भोळी नव्हती. तिनें अशा किती तरी लोकांशीं सामना दिलेला होता. बाबुरावानें जरा हालचाल करून पूर्वेस मान वळविली; तर तिनेंही मुलासह पूर्वेच्या बाजूनें हल्ला चढविला. त्यानें हल्ला चुकविण्यासाठीं पश्चिमेस तोंड फिरविलें, तर त्याही दिशेला ही सवत्स भिकारीण आहेच ! त्यानें लंबकाप्रमाणें दक्षिणोत्तर दिशा दाखविणारा पवित्रा घेतला, तरीही तोंड चुकविण्याचा त्याचा हेतु सफल झाला नाहीं. आतां " ऊर्ध्वायै दिशे ब्रह्मणे नमः " म्हणून आकाशाकडे नजर लावणें, नाहींतर ' हरलों ' म्हणून लाजेनें मान खालीं घालणें हे दोनच उपाय राहिले होते. तेही त्यानें करून पाहिले. कलियुगांत ' वरून ' मदत मिळण्याची आशा करणें मृगजळाप्रमाणें व्यर्थ आहे आणि खालीं मान घालणें म्हणजे पायाशीं लोळण घेतलेल्या त्या पोराला उत्तेजन देणें. तेव्हां

अक्कलहुषारीबद्दल प्रसिद्ध असलेल्या बाबुरावाची किंकर्तव्यमूढ स्थिति झाली. आतां तो " दे हाता ऽ ऽ, या शरणागता " म्हणून धांवा करणार, तोंच गजेंद्राच्या हांकेला धांवून येणाऱ्या गरुडवाहन विष्णूप्रमाणें ट्रॅमच तेथें येऊन दाखल झाली आणि तो टणकन् उडी मारून आंत शिरला. घारीच्या नजरेनें त्यानें रिकाम्या सीटसाठीं चौफेर पाहिलें आणि उतरण्यासाठीं उभा रहाण्याच्या तयारींत असलेल्या एका इसमाला 'खो देउनीया उठवा गड्याला' तसा प्रकार करून तो त्या जागेला जळूसारखा चिकटला. आतां नळराजानें पकडलेल्या हंसानें मुक्त झाल्याबरोबर " क्षणभर निजदेहीं मुक्ति विश्रांति घ्यावे " असें कायसें केलें ना, तसा कांहींतरी प्रयत्न बाबुराव करणार इतक्यांत ट्रॅमचा दुसरा स्टँड आला. तेथें पहावें तों खिडकींत आपली थाळी धरून भिकारी उभा! आतां मात्र बाबुरावाला ब्रह्मांड आठवलें. पण ब्रह्माच्या गोष्टी करण्यापेक्षां मायेच्या पसाऱ्यांतील भिकाऱ्याकडे लक्ष देणें त्याला भाग होतें. त्यासाठीं काय करावें म्हणून त्यानें आपलें टकल पडलेलें डोकें खाजविण्यास सुरवात केली. त्याच्या डोक्यांतून कांहीं युक्ति बाहेर पडण्यापूर्वींच ट्रॅम कंडक्टरची 'टिन् टिन्' करून घंटा वाजली आणि त्या थाळीवाल्या भिकाऱ्याला मागें टाकून आणि बाबुरावाला पोटांत घालून ट्रॅम पुढें चालू झाली.

वाटेंत प्रत्येक स्टँडवर बाबुरावाला भिकारी दिसले आणि ट्रॅम जंक्शनवर तर त्यांना जोरच आला होता. गाडी स्टँडवर आली, कीं बाबुराव आपलें डोकें वर्तमानपत्रांत खुपसून वाचनांत गढून जाई! बाहेरून भिकारी कितीही ओरडला तरी कान असून ऐकावयाचें नाहीं व डोळे असून पहावयाचें नाहीं असें व्रत बाबुरावानें स्वीकारलें. स्टँडवर ट्राम कांहीं फार वेळ उभी रहात नसल्यामुळें त्याचा हा कावा साधला. पण जंक्शनवर गाडी उभी राहिल्यावर वर्तमानपत्र वाचण्यांत गढून गेलेल्या बाबुरावाच्या हाताला स्पर्श करून, " शे ऽ ऽ ठ, दोन्ही हात नाय, पाय नाय " म्हणून एका भिकाऱ्यानें ललकारी मारली. बाबुराव आश्चर्यानें पाहूं लागला. आपण इतकी काळजी घेऊनही फुकट कशी गेली म्हणून त्यानें पाहिलें; तर वर्तमानपत्र डोळ्यांपुढें धरतांना आपलें कोंपर खिडकीच्या चौकटीवर टेकण्याचा अपराध आपल्या हातून घडल्यामुळें ही

आपत्ति आल्याचें त्याच्या ध्यानांत आलें ! झालें. त्यानें आपलें सबंध अंग चोरून, एकही भाग बाहेर जाणार नाहीं–कोटाचा अगर शर्टचा थोडाही भाग खालीं लोंबणार नाहीं असें बसण्याचा निश्चय केला. 'गाडी-बाहेर तोंड काढूं नका' म्हणून ट्रॅममधील 'सेफ्टी फर्स्ट'ची सचित्र जाहिरात यापूर्वीं त्याला बजावीत असे तरी त्यानें तिकडे लक्षही दिलें नव्हतें. पण तेंच भिकारी उभा आहे म्हटल्याबरोबर अंगच काय, पण सदऱ्याचा वा कोटाचा लोंबता भाग, हाताची बाही, कांहीं म्हणतां कांहीं, बाहेर लोंबत ठेवण्याची त्याची छातीच होईना ! 'सेफ्टी फर्स्ट'वाल्या चळवळ्यांनीं अशीं निर्जीव चित्रें लावण्यापेक्षां भिकाऱ्यांना आपले उपदेशक म्हणून नेमल्यास बरेचसे अपघात टळतील असें वाटतें. भर रहदारीच्या रस्त्यावर भिकारी उभा केल्यास आपोआपच मनुष्यासारखे जिवंत प्राणी त्या बाजूला प्राण गेला तरी फिरकणार नाहींत ! मग अपघात होण्याची बातच कशाला ?

ट्रॅममधून उतरून बाबुराव ऑफिसांत तर आलाच. निदान सात-आठ तास तरी भिकाऱ्यांच्या तावडींतून सुटलों या आनंदानें तो ओंठां-तल्या ओंठांत ( मिशांतल्या मिशांत हंसणें हा वाक्प्रचार आतां तरुण-वर्गापुरता तरी वस्तुस्थितीला धरून होणार नाहीं. ) हंसत होता. एक-दोघां समव्यवसायी मित्रांनीं पृच्छा केली, कीं "किं कारणार्थं हास्य-मिदम् ?" पण बाबुराव उत्तरादाखल आणखी जरा हंसला. "काय बाबुराव, आज घराहून येतांना एखादा गोडसा—" म्हणूनही एकानें विचारण्याचें धैर्य केलें. दुसऱ्या एकानें 'गोडसा' इति लाडूबिडू म्हणून शंकानिरसनही केलें ! पण बाबुराव हंसतच राहिला. आतां मात्र कारकून लोकांत निरनिराळे तर्क आणि त्यांचीं निरनिराळीं उत्तरें येऊं लागलीं. सर्व हरले अशी खात्री झाल्यावर बाबुरावानें आपल्या आनंदाचें कारण **भिकारी** म्हणून सांगितलें. मित्रांनीं आपल्या कल्पनादौर्बल्याबद्दल अगोदर माना खालीं घातल्या आणि मग भिकाऱ्याचा व बाबुरावाच्या आनंदाचा संबंध विचारला. सकाळपासूनची हकीगत सांगितल्यावर त्यांनाही बाबुरावाचा आनंद योग्य ठिकाणीं असल्याची खात्री पटली. पण कांहीं वेळानंतर बाबुरावाला या संकटानें पुन्हां दर्शन दिलें.

त्याचें असें झालें; बाबुरावानें दोनतीन तास काम केल्यावर आतां जरा इकडे तिकडे पहावयाचा विचार केला. कागदांतून त्यानें डोकें वर केलें मात्र, त्याला एक काळसर हात पुढें होत असलेला दिसला. त्या हातांत टाईप केलेला एक कागद होता. बाबुरावाला वाटलें कचेरींतील कांहीं कामाचा कागद असेल. त्यानें तो कागद घेतला आणि वाचावयास सुरवात केली—

" सदरहू इसम, मुका, बहिरा व आंधळा असून त्याला तीन मुली व दोन मुलगे आहेत. याची बायको पांगळी असून थोटी आहे. याच्या मुलींचेंही लग्न व्हावयाचें आहे, तरी दयाळू गृहस्थांनीं याला मदत करावी अशी मी शिफारस करतों. " असें लिहून कुणा सोमाजी गोमाजी कापशे यानें त्याखालीं सही केली होती !

बाबुरावाच्या दुर्दैवानं पुन्हां उचल खाल्ली. कांहीं काळापूर्वीचा त्याचा आनंद कुठेंच्या कुठें मावळला ! तो कागद आणणाऱ्या त्या अभिनव भिकाऱ्याकडे वर मान करून पहाण्याचें कांहीं त्याला धैर्य झालें नाहीं. हळूच खालच्या मानेनें त्यानें तिरकी नजर करून पाहिलें आणि त्याच्या काळया हाताप्रमाणेंच सर्व ऑफिसभर काळोखी पसरली आहे असा त्याला भास झाला. त्याच्या डोळयांपुढें अंधारी आली. त्यानें आपलें डोकें टेबलावर टेकलें. टेकलें कसलें, आपटलेंच म्हणा ना ! नंतर कांहीं वेळानें शुद्धीवर येऊन किलकिले डोळे करून अगोदर भिकारी नाहीं अशी खात्री केल्यावर त्यानें साफ डोळे उघडले आणि मग तो पुन्हां कामास लागला.

संध्याकाळीं ऑफिस सुटलें, पण घरीं येण्यास बाबुरावाला उत्साह वाटत नव्हता. कांहीं झालें तरी घरीं हें जावयास पाहिजेच होतें. विषण्ण चित्तानें मागेंपुढें पहात त्यानें कचेरी सोडली. स्टँडवर भिकारी नाहीं असें पाहून त्यानें ट्रॅमगाडींत उडी घेतली आणि खिडकीच्या बाजूस बसण्याचें टाळलें. ट्रॅमचे स्टँड येत तसे भिकाऱ्यांचे स्वर त्याच्या या कानांत शिरून त्या कानांतून निघून जात :

'दे रे देवा आंधळ्याला । आंधळ्याला दे रे देवा ।'

म्हणून 'पांडवा सम्राट पदाला' या चालीवर गाणें गाऊन भीक मागणारा भिकारी मागें पडला !

राज्य ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
२५ ...४५७२६ ... भिकारी ...
... २०६७ ... २९४३।०

'दया धरमका मूल है'
म्हणून धर्माच्या मुळाची (कीं मुलाची?) जाणीव करून देणाऱ्या व थाळीवर पैसा वाजवून तालावर भीक मागणाऱ्या भिकाऱ्याकडे त्यानें मान वळवूनही पाहिलें नाहीं!!

'मला द्या तांब्याचा, तुम्हांला देव देईल सोन्याचा'
म्हणून एका म्हाताऱ्या भिकारणीनें आमिष दाखविलें, पण बाबुराव त्याला बळी पडला नाहीं!!!

"अल्ला हूं! अल्लाह!" म्हणून कोणाकडूनही जणुं भिक्षा मिळण्याची वाट न पहातां सारखा ओरडत रहाणारा निष्काम कर्मयोगीही त्याला दिसला, पण त्याकडे बाबुरावानें जाता कटाक्ष फेकला.

शेवटीं या साऱ्या अप्रिय दृश्यांतून सहीसलामत सुटून बाबुराव ट्रॅममधून उतरला. इथेंच आपलें घर असतें तर असा '—उजव्या बाजूलाच नाडी पहाण्यापुरता एक डावा हात असता तर!' असें म्हणणाऱ्या तळीरामाच्या वैद्याप्रमाणें—एक विचार त्याच्या डोक्यांत येऊन गेला.

तो भराभर चालूं लागला. येत असतां—

"देवाच्या दारीं कवापास्नं म्हातारी वरड वरड वरडतीया, पण कुनीच भीक घालीत नाय रे ऽऽ" म्हणून देवळाच्या दारीं बसून देवाला गाऱ्हाणें घालणाऱ्या म्हातारीचे शब्द त्याच्या कानीं आले. त्यानें तिच्याकडे पाहिलें. ती पांगळी असल्यामुळें आपल्या मागें येणार नाहीं या विचारानें त्याला समाधान वाटलें आणि तो पुढें सटकला.

घरीं आल्यावर चहा वगैरे झाल्यावर वाटेंत भिकारी भेटतील या भीतीनें त्यानें गाडी करून चौपाटी गांठली. पण दुर्दैवानें तिथेंही त्याला गांठलेंच!

असा कातावून गेल्यामुळेंच सुरवातीला सांगितल्याप्रमाणें तो भिकाऱ्याला मारावयास निघाला!

मुंबई शहरांत भिकाऱ्यांपासून बचाव करण्याचा तोडगा त्याला कुणी सांगेल काय?

—*—

# ट्रॅम कंडक्टर



" मत् चढो, मत् चढो ! "

ट्रॅम कंडक्टर आक्रोश करीत होता. त्याचा हा मनाई हुकूम मान्य करण्याच्या मनःस्थितींत मात्र कुणीच नव्हता. गाडी भरवेगांत होती तरी ती पकडण्यासाठीं पॅसेंजरांची मारे धडपड चालली होती. हा 'धकाधकीचा मामला ज्या अशक्तांना सोसवणें' शक्य नव्हतें ते नुसते असहायपणें त्या जात्या गाडीकडे पहात उभे होते ! अर्थात् त्यांत म्हातारे आणि कारकुनी करणाऱ्या नाजूक तरुणी यांचाच भरणा दिसत असल्यास नवल नव्हतें.

ऑफिसचा टाईम होत आल्यामुळें ज्यांना ही ट्रॅम पकडणें अवश्य होतें त्यांनीं चढावयाच्या फळीवर उभे राहून तपश्चर्या चालू केली होती. ज्या ठिकाणीं ट्रॅम थांबते तेथें आंत चढणें अशक्य असल्यामुळें कांहीं दूरदर्शी पॅसेंजर थोडे पुढें चालत जाऊन ( सामोरे जाऊन गाडीचें स्वागत करण्यासाठीं कीं काय ! ) गाडी पकडण्याचा प्रयत्न करीत होते. चालत्या ट्रॅमगाडीला पकडण्यासाठीं, सायकलीवर बसतांना एका पायानें जमिनीचा आधार घेत स्टार्ट घेतात त्याप्रमाणें, ट्रॅमच्या उभ्या लोखंडी दांड्याला धरून स्टार्ट घेण्याचा त्यांचा विचार असावा. पण मुळाकडच्या

फळीवर इतर कांहींजण उभे राहिले असल्यामुळें तो दांडा पकडणें कठीण काम होतें. असें असलें तरी कुठल्याही लोकांत चारदोन धाडसी लोक आढळतातच, तसेच इथेंही होते. अशा एकादोघांनीं तो लोखंडी दांडा आधारासाठीं धरायला जमत नाहीं असें पाहून त्या दांड्याला धरून उभ्या असलेल्या मनुष्याच्या दंडालाच धरून कार्यभाग साधण्याचा प्रयत्न केला ! आपल्या दंडाला धरून कुणी ओढतें आहे असें ध्यानीं आल्यावर स्वतःच्या बचावासाठीं अशा इसमानें जवळच उभ्या असलेल्या मनुष्यावर तोच प्रयोग केला तर तें साहजिकच होतें. अशा तऱ्हेनें एकानें दुसऱ्याच्या, दुसऱ्यानें तिसऱ्याच्या अशा थाटांत लोखंडी दांड्यापासून लोकांच्या दंडाची सांखळीच बनली !

बिचारे दंडधारी ! रस्त्यावरच्या ट्राम इन्स्पेक्टरला कांहीं त्यांचें हें कौशल्य पाहवलें नाहीं ! गाडी चालू झाली तेव्हां आतां आपणांस जावयास मिळणार ह्या आशेचे मनोरे उभारणारे फळीवर उभे असलेले सर्व लोक त्या इन्स्पेक्टराच्या एका शिटीसरशीं कोसळून पडले. जळूप्रमाणें चिकटलेल्या आणि वटवाघुळाप्रमाणें आडवे, उभे, तिरपे लटकलेल्या लोकांना ट्राम इन्स्पेक्टरानें म्हटलें, " साब, ये ऐसा नहीं चलेगा. खडे रेहनेवाले सब लोक उतर जाव ! "

त्याचे ते ' खडे ' बोल पालथ्या घड्यावर पाण्यासारखे झाले. तेव्हां ट्राम कंडक्टरनें टिन् टिन् करीत घंटा वाजवून गाडीच खडी करून टाकली. मग तेथें उभें रहाण्यांत अर्थ नाहीं असें पाहून एकेकानें काढता पाय घेतला. त्यांतले जे कांहीं चिकट होते ते आतां इन्स्पेक्टर येणार व उतरून घालणार हें ओळखून निरनिराळे पवित्रे घेऊं लागले. कुणीं बसलेल्याच्या दाढीला हात लावला, कुणीं ' प्लीज ' म्हटलें, कुणीं ' खाली एक इस्टेशन जाना है ' म्हणून दया उपजविण्याचा प्रयत्न केला, कुणीं पोराला मांडीवर घेऊन जागा करण्याचा यत्न केला, तर कुणीं पुरुषांच्या जागेवर बसलेल्या बाईला बायकांसाठीं खास राखून ठेवलेल्या बाकावर बसा म्हणून विनंति केली.

पण एका बाकावर दोनच पॅसेंजर बसावयाचे हा दंडक कडक रीतीनें

पाळण्याचें कंपनीनें ठरविलें असल्यामुळें ह्या गनिमी काव्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

सर्व जादा पॅसेंजर खालीं उतरले हें पाहिल्यावर इन्स्पेक्टरनें सर्व 'क्लिअर' झाल्याची शिटी वाजविली, आणि कंडक्टरनें दोरी खेंचून घंटा वाजवून त्याला दुजोरा दिला आणि एकदांची गाडी चालू झाली.

पण लोक तरी असे लबाड, त्यांतील कांहीं पुढें कांहीं अंतर चालत जाऊन ट्रॅमच्या वाटेवर उभे राहिले. ज्यांना जंक्शनवर उतरवून घालण्यांत आलें तेच हे लोक होते! गाडी जवळ आल्यावर त्यांनीं भराभर आंत उड्या घातल्या आणि पुन्हां गाडी भरून टाकण्यास सुरवात केली.

अर्थात् कंडक्टरच्या हातीं असलेला उपाय दोरी खेंचून गाडी थांबविण्याचा तो त्यानें लगेच अंमलांत आणला.

झालें; चढलेल्या सर्व लोकांना खालीं उतरावें लागलें!

आणि गाडी एकदांची चालू लागली, पण ती मुंगीच्या गतीनें. कुणींही चढावें आणि जादा पॅसेंजर असल्यामुळें कंडक्टरनें तो उतरेपर्यंत गाडी थांबवून ठेवावी असा प्रकार मधून मधून होत राहिला.

शेवटीं एकदांची गाडी धोबी तलावजवळ आली आणि कंडक्टरला तिकिटें देण्यास जरा उसंत मिळाली.

कंडक्टरनें 'पिट् पिट्' करून हातांतील लोखंडी क्लिपर वाजवून विचारलें, "किधर?"

उत्तर आलें, "डायरेक्ट."

जानव्याप्रमाणें खांद्यावरून गेलेल्या कातडी पट्ट्याच्या टोंकाला असलेल्या पिशवींत कंडक्टरनें आणेलीचें नाणें टाकलें आणि दुसऱ्या खांद्याला अडकविलेल्या पट्ट्याच्या टोंकाला लटकणाऱ्या पत्र्याच्या पेटीचा वरचा पत्रा जरा वर करून एक तिकीट खेंचून काढलें. मग हातांतील क्लिपरनें त्याला दोन भोकें पाडून तें तिकीट त्या इसमाच्या हातीं दिलें. हें झाल्यावर "तिकिट प्लीज" म्हणून पलीकडच्या बाकावरील पारशी पोराला हटकलें. तेव्हां त्या पोरानें आपली पुस्तकांची बॅग सांवरीत म्हटलें, "अध्धा तिकट देव, बोरीबंदर."

"अध्धा ? तुमकू कितना बरस है ?"

"नऊ बरस." त्यानें पाठ केल्यासारखें पटकन् उत्तर दिलें.

"नऊ बरस !" कंडक्टर हंसत हंसत तेच शब्द उद्गारून बोलला. "तुमारा ये नऊ बरस कितना बरस चलेगा ?"

तो मुलगा कांहींच बोलला नाहीं. त्याची नेहमींचीच रीत होती ही !

"देखा–" कंडक्टर पॅसेंजरांना उद्देशून म्हणाला, "ये लडका बोलता है, इनकी उमर खाली नऊ बरस है !"

आणि त्यानें प्रचंड हास्य केलें.

कांहीं लोकांनीं त्या मुलावर नजर फेकली. मोठा मिष्किल पोरगा दिसत होता तो. त्याच्या चेहऱ्यावरून तो चांगला अकरा-बारा वर्षांचा असावा हें उघड दिसत होतें. घरून ट्रॅमसाठीं एक आणा घेऊन दोन पैशांत शाळेला जाणारा व उरलेल्या अर्ध्या आण्याची चैन करणारा पोरगा होता तो. त्याच्या वयाची प्रगति नऊ वर्षांपुढें जाण्यासच तयार नव्हती ! त्याच्या शरीराची ठेवण खुजी असल्यामुळें ती त्याच्या बतावणीला पोषकच ठरे. कंडक्टराला तर हे नेहमींचेच अनुभव. त्या मुलासारखीं मुंबईंत कांहीं मुलें आहेतच. पण त्यांचें वय सिद्ध करूं जाण्यास कंडक्टरला कुठें वेळ आहे ? त्यानें मुकाट्यानें तांबड्या रंगांत छापलेलें एक तिकीट पेटींतून खेंचलें आणि त्या मुलाच्या हातीं दिलें.

* * *

"ये तिकट नहीं चलेगा."

"टराम चलता है, फिर तिकिट कायकु नहीं चलेगा ?"

"हम् बोलता है, की ये नहीं चलेगा."

एका भय्याचें आणि ट्रॅम कंडक्टराचें बोलणें होतें हें. भय्याची खात्री होती, कीं तिकीट चालणारच. ट्रॅम चालते आहे तर तिकीटही चाललेंच पाहिजे. हा कंडक्टर आपणास फसवूं पहातो आहे. भय्याला एवढी खात्री होती याचें कारण त्याचा मित्र बदरी यानें तें तिकीट एक आणा देऊन काढून दिलें होतें. तो खोटें तिकीट कसें काढून देईल ? बदरी

मागील स्टेशनवर उतरला होता आणि त्यानें भय्याला पुढील स्टँडवर बदली* करून जाण्यास सांगितलें होतें. या खात्रीमुळें भय्या जोरानें म्हणाला, "अबी हमकू बदरीनें तिकट दिया..."

"दिया होगा, मगर अब ये 'कंडम' हुवा है. नहीं चलेगा."

"मगर हमारे पास तो अबी निकालेला तिकट है." भय्यानें जोरदारपणें म्हटलें.

तेव्हां शेजारच्या एका दोघांनीं तें तिकीट पाहिलें तर तें काढून चांगले चार तास होऊन गेलेले दिसत होते. भय्या बदलीच्या ठिकाणीं उतरून कुठें इकडे तिकडे गेला असावा हें उघड होतें.

तें तिकीट पहाणाऱ्यास कंडक्टरनें म्हटलें, "देखा ना आपने, ये तिकट कैसा चल सकता है?"

बरोबर आहे अशा अर्थानें त्यानें मान हलविली.

पण भय्याचें मात्र समाधान झालें नाहीं. तो म्हणाला, "चार कलाक हुवा तो क्या हुवा? रेल गाडीका तिकट अख्खा दिनतक चल्ता है......"

"हां हां भय्या, मगर ये रेल नहीं टामरेल है! अभी उतर जाना, नहीं तो एक आना देके नया तिकट लेना." कंडक्टरानें जरा जोरांतच सांगितलें.

"दुसरा कायकू? यही चलेगा."

"नहीं निकालना है तो उतर जाव." म्हणून कंडक्टरनें टण्टण् करून घंटा वाजविली आणि गाडी उभी करून त्याला उतरून लावलें.

तोही तोंडानें पुटपुटत उतरला एकदांचा!

हे मुंबईकर आपणावर अन्याय करीत आहेत असें त्याचा चेहरा उघड दर्शवीत होता.

* * *

प्रत्येक बाकाच्या पाठीवर आपल्या क्लिपरनें टक्टक् असा आवाज करीत आणि तोंडानें तिकट, तिकट असें उच्चारीत कंडक्टर पहिल्या

बाकापासून शेवटच्या बाकापर्यंत फिरला आणि पुन्हां 'राईट अबाउट टर्न' करून तसेंच विचारीत येत तो ट्रामगाडीच्या टोंकाला येऊन उभा राहिला. तेथें उभा असतांना खिडकींतून बाहेर पाहणारा एक पारशी तरुण आपण तिकीट विचारावयास गेलों कीं बाहेर पाहूं लागतो असें त्याच्या ध्यानीं आलें, म्हणून त्यानें पुन्हां त्याच्याजवळून जाऊन पाहिलें. तों त्याच्या हातांतल्या अंगठींत तिकिटाची घडी खोंवलेली दिसली.

पण पुन्हां त्याला संशय आला. असे फॅशनेबल लोक एखादें तिकीट अंगठींत किंवा रिस्टवॉचच्या पट्ट्यांत खोंवून ठेवतात पण तें जुनें तिकीट असतें, तेव्हां काय ती शहानिशा करावी आणि ह्या लुच्चा इसमाला बेमालूम पकडावें म्हणून त्यानें त्याच्याजवळ जाऊन दंडाला स्पर्श करीत पुकारलें, "साब, आपका तिकट ?"

"है, बाबा है." त्या तरुणानें बेफिकीरपणें म्हटलें.

"हां है तो सच; मगर देखना तो देव."

"खालीपिली सताता है." असें पुटपुटत तरुणानें अंगठींतील तिकीट काढून दिलें.

कंडक्टरचा चेहरा पहाण्याजोगा झाला. ज्या उद्देशानें तो त्याचें तिकीट पहावयास गेला होता तो फसल्यामुळें त्याचा हिरमोड झाला होता. तरी पण तिकीट मागितलें तेव्हां त्याला तें उघडून पहाणें भागच होतें.

आणि काय चमत्कार! तिकीट उलगडून पाहिल्यावर कंडक्टराच्या चेहऱ्यावर शिताफीनें सावज पकडल्याचा आनंद दिसूं लागला.

तो पारशी तरुण त्याच्याकडे पहात होताच.

"साब, ये तिकट नहीं चलेगा."

"नहीं ?" त्या तरुणानें आश्चर्यमुद्रेनें प्रश्न केला.

"ये बदलीका * तिकट है." ट्राम कंडक्टर.

"हां हां, ये हमे मालूम है."—पारशी तरुण.

"निकालके तीन कलाक हुवा है."—कंडक्टर.

"कौन बोल्ता है ?"—पारशी तरुण.

"बोलनेकी क्या जरूरत ? तिकट 'कंडम' हुवा है. दूसरा निकालना पडेगा."

"ये हम अब लिया है. अधा कलाकबी नहीं हुवा."

"ये कैसे हो सकता है ? तिकट तो देखो."

"देखनेकी कुछ जरूरत नहीं."

"साब, दूसरा निकालना पडेगा."

"जादा बात मत् करो. हम बोलता है, की ये तिकट बराबर चलेगा. तुमारा इनस्पेक्टरकु आना देव."

"अच्छा, अबी बोरीबंदरपर फेसला हो जायगा, कौन बराबर और कौन गल्त !" म्हणत कंडक्टरनें तें तिकीट तरुणाकडे परत दिलें.

तो पारशी तरुण मोठ्या ऐटींत बसला होता.

बोरीबंदर आलें. कंडक्टरनें इन्स्पेक्टराला बोलावून ही हकीगत सांगितली. इन्स्पेक्टरनें तरुणाला तिकीट दाखविण्यास सांगितलें. त्यानें बेफिकीरपणें कोटाच्या खिशांतून तिकीट काढून दिलें. इन्स्पेक्टरनें तिकीट पाहिलें. तिकीट काढून तासही झाला नव्हता. त्यानें कंडक्टरला म्हटलें, "अरे दोसो पचपन ! तिकट तो बराबर है. क्या हुवा इसको ?"

"बराबर है ?" आश्चर्याचा धक्का बसून कंडक्टरानें प्रतिप्रश्न केला. "तिकट निकालके तीन कलाक हुवा था."

"तुमबी अजीब आदमी हो ! ये देखना." म्हणून इन्स्पेक्टरानें तें तिकीट त्याच्या हातीं दिलें. तें पाहून कंडक्टर सर्दच झाला ! त्यानें तिकीटावरील टाईमची लाईन निरीक्षण करून पाहिली. त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना ! मग तीन तास झाले असें दर्शविणारें मघाचें तिकीट काय झालें ? त्यानें त्या पारशी तरुणाकडे पाहिलें. तो आपणाकडे पाहून मिष्किलपणें हंसत असल्याचें त्याच्या ध्यानीं आलें.

तो पारशी तरुण आपणावर अन्याय झाला होता अशा ऐटींत इन्स्पेक्टरला म्हणाला, "देखा ना अपने ? तिकट तो बिल्कूल बराबर था. लोगोंको सताना ये कंडक्टर लोगकी आदतही होती है."

" माफ करना. " म्हणून म्हणत व कंडक्टरला दम देत इन्स्पेक्टर-साहेब उतरून गेले. गाडी चालू झाली.

गाडींतील पॅसेंजर भिन्न भिन्न भावानें एकदां त्या पारशी तरुणाकडे व एकदां कंडक्टरकडे पहात होते.

बिचारा कंडक्टर कोपऱ्यांत उभा राहून, ' दो तिकट रखता है और हमकु फसाता है. ' म्हणून पुटपुटत होता.

म्युझियमकडे जाणाऱ्या गाडींत चढून व्हिक्टोरिया गार्डनचें तिकीट मागणारीं माणसें कंडक्टराला आढळतात. बायकांच्या बाकामागील बाकावर बसून पुढील ' सुंदर चित्राचें ' आपादमस्तक निरीक्षण करणारे प्राणीही त्याच्या नजरेस पडतात. एखाद्या सुंदर स्त्रीला आपली जागा झट्कन् मोकळी करून स्त्रीदाक्षिण्य दाखविणारे महाभागही तो पहातो. ऑफिसांतील साहेबाचा उग्र चेहरा आणि मस्टरवर लाल लाईनीखालीं सही करावी लागणार या भीतीनें पळत पळत ट्राम पकडणारा कारकूनही त्याला दिसतो. शाळेंत जावयाच्या वेळीं ट्राममध्यें पुस्तकें उघडून आपला अभ्यास करणारीं पोरेंही त्याला आढळतात. आपल्या गांवच्या गप्पा मोठमोठ्यानें करणारे आणि जणूं आपण आपल्या घरींच आहों अशा थाटांत बोलणारे महाभाग गाडींत आढळतात. पॅसेंजराच्या बावळटपणाचा फायदा घेऊन त्याच्या पोटांतील पाणीही हलूं न देतां त्याचा अलगद खिसा कापणारे कलावंतही गाडींत असतात. वरच्या मजल्यावर बसून खालीं विड्याची पिचकारी मारणारे रंगीन इसमही त्याला अपरिचित नाहींत. कांहींचे चेहरे चिंतातुर, कांहींचे आतुर, कांहींचे चलाख तर कांहींचे मंद; कांहीं अक्कडबाज तर कांहीं गबाळे असें नाना तऱ्हेच्या चेहऱ्यांचें प्रदर्शन रोज त्याला पहायला मिळतें. एखाद्या जातिवंत कलावंताला ह्या नाना भावदर्शी चेहऱ्यांच्या व्यक्ती व त्यांच्या हालचाली यांच्या सूक्ष्म निरीक्षणानें सुंदर कलाकृति निर्माण करितां येतील; पण बिचाऱ्या कंडक्टराला त्याचें कांहीं नाहीं ! तो सर्व दिवसभर ' तिकिट प्लीज् ' म्हणून विचारीत असतो आणि तिकिटें देत असतो ! !

—*—

* बदली तिकिटाची पद्धत आतां बंद झाली आहे.

# ऑफिसांतील भट



एखाद्या मोठ्या कारखान्याचें पॉवर हाऊस जसें एका कोपऱ्यांत अगर एका बाजूस असलें तरी त्याचें महत्त्व कांहीं कमी लेखतां येत नाहीं; त्याचप्रमाणें कचेरींतील चालत्याबोलत्या यंत्रांना ( कारकुनादि नोकरवर्गाला ) उत्साह देणारें पॉवर हाऊस जिन्याच्या तळाशीं अगर एखाद्या छोट्याशा खोलींत असलें म्हणून मामुली समजतां येणार नाहीं. या पॉवर हाऊसचा ऑपरेटर असतो भट. मुंबई शहरांत व्यापाराची वाढ होऊन नव्या नव्या कचेऱ्या निघूं लागल्या, तशी अशा भटांची गरज भासूं लागली. कचेरींतील नोकरांना पाणी पाजणें, या कामावर मूलत: यांची योजना झाली. मुंबईंतील एकएक धंदा पाहिला तर एकएका प्रांतांतील लोकांनीं व्यापिलेला दिसतो. उदाहरणार्थ, फळेंविक्या जुन्नरकडील तुकाराम फॅशनची पगडी धारण करणारा असावयाचा, तर दूधवाला बहुधा युक्तप्रांतीय भय्या असावयाचा. हॉटेलवाला कारवारी असतो, तर पाणी पाजणारा हा भट गुर्जरदेशीय आढळतो. जात ब्राह्मणाची, पण ब्राह्मण्याचे कांहींच संस्कार ह्याच्यावर दिसत नाहींत. पण स्पर्शास्पर्श मानणाऱ्या हिंदु जातींत केवळ ब्राह्मण कुळांत जन्मला म्हणूनच पाणी पाजण्याचें काम याला मिळालें असावें ! कारण त्याच्या

हातचें पाणी पिण्यास कुणाचीही हरकत असणें शक्य नव्हतें. पाणी पाजण्यासाठीं कचेरी-प्रवेश केलेल्या या ब्राह्मणानें पाण्याचा अर्थ केवळ 'पाणी'च न करतां 'चहा-पाणी' असा करून हळूहळू आपल्या प्रादेशिक गुणाचा–वणिक्वृत्तीचा परिचय करून देण्यास सुरवात केली असल्यास नवल नाहीं. इंग्रजांच्या अनुकरणानें चहाबाज बनलेल्या व चहा पिणें हें एक नित्यकार्य समजणाऱ्या सुशिक्षित वर्गाला–कारकुनांना–केवळ चहा विकण्याचा धंदा करून हा स्वस्थ बसेल ही गोष्ट त्याच्या बाण्याला शोभणारी नव्हती. चहाबरोबरच त्यानें गुजराथी लोकांना प्रिय असलेलें फरसाण (शेव, गांठिया, भजीं) विकण्यास सुरवात केली. फक्त तिखट पदार्थ खाणाऱ्या मंडळीच्या जिभेची गरज भागविण्यावर समाधान न मानतां पेढे, लाडू, जिलबी, गुलाबजांबू वगैरे शर्करायुक्त गोड पदार्थांचाही त्यानें व्यापार सुरू केला. अशा तऱ्हेनें प्रारंभीं एक हांडा व लोटा घेऊन 'बावडीचें जल' पाजणाऱ्या ह्या भटानें आपल्या कर्तबगारीनें एक दुकान थाटून भटाला दिली ओसरी अन् भट हातपाय पसरी ह्या म्हणीचें प्रात्यक्षिक उभें केलें.

बरें; भटाला ही सवलत देणाऱ्या मालकांचे यांत चार चव्वल वेंचले गेले आहेत असें नाहीं. गांठचे पैसे खर्च न करितां परस्पर नोकरवर्गाच्या पैशानें त्यांना तरतरी आणणारें पेय पाजलें जाऊन आपलें काम अधिक होत आहे हें पाहून मालकांनीं तिकडे कानाडोळा केला. त्यांचें गेलें काय, तर सर्व इमारतींतील दुर्लक्षणीय अशी एखादी खोली, नाहीं तर जिन्या-खालची काळोखांतली निरुपयोगी जागा !

एखाद्याच्या कार्याचा नाश करायचा असेल, तर 'तुझ्या कामांत भट पडो' अशी शापवाणी उच्चारीत असत. पण कचेरीच्या 'कामांत' हा भट पडल्यामुळें कार्यहानी होण्याऐवजीं कार्य अधिक सुकर आणि सुखानें होतें असा अनुभव आहे. कारकून कामांत असतां भट आला आणि त्यानें चहाचा कप पुढें आणून ठेवला, तर कारकून तें उत्साहदायी पेय पिऊन अधिक काम करूं शकतो. कचेरीच्या मरुभूमींत जर एखादा 'ग्रीन स्पॉट' असला, तर हा 'भट' होय! लंब वर्तुळ चेहरे करून भटाच्या

खोलींत शिरणारे लोक गोड तोंड करून बाहेर पडतांना दिसतात! ऑफिसच्या निरुत्साही, निराशाजनक आणि नीरस वातावरणांत 'रस' आणण्याचें काम भटच करतो. 'भट' नसेल, तर कचेरींतील 'काव्य' जाऊन काम तेवढें शिल्लक राहील. क्रिकेटमधील खेळाडू ज्याप्रमाणें 'सिंगल' रन् काढून आपल्या खेळाचा मुहूर्त करतो, तसा कचेरींतील कारकून 'सिंगल' पिऊन कामाला सुरवात करतांना आढळतो. कचेरींतील आनंदाचे प्रसंग साजरे करतांना भटाचें सहाय्य होत असतें. एखाद्याला गंडा घालावयाचा असल्यास, कुणाला वश करून घ्यावयाचा असल्यास, अगर कांहीं कारणामुळें उत्पन्न झालेला वाद विरघळून टाकावयाचा असेल, तर तो भटाच्या चहांतच विरघळतो.

या भटाचा अवतार मोठा पहाण्याजोगा असतो. त्याचें तें गुडघ्या-पर्यंत काचा मारलेलें आणि अनेक दिवस चुकूनही पाण्याचा विटाळ न झालेलें धोतर, मुंडेछाट पैरण आणि डोकीवर पूर्वी फोल्डिंग फॅशन्ची असलेली पण आतां षट्कोनी अष्टकोनी बनलेली काळी टोपी, कळकट चेहरा पण त्यांत उठून दिसणारीं कानांतील सोन्याचीं वळीं! त्याच्या श्यामल वर्णाला शोभून दिसणारा हा वेष आणि तशीच त्याची ती शामळू भाषा, असा वरवरचा थाट असला तरी या भटाच्या अंगीं 'नाना कळा' आहेत हें परिचय झाल्यावर ध्यानांत आल्यावांचून रहात नाहीं.

नुसती भटाची स्मरणशक्ति पाहिली तर मन गुंगून गेल्यावांचून रहात नाहीं. बसल्या जागेवर दिवसांतून तीनचार वेळां चहा मागविणारे आणि मधल्या सुटींत भटाच्या खोलींत नाना पदार्थांवर ताव मारणारे, तसेंच आपल्या अकाऊंटवर लोकांस चहा पाजणारे कारकून अशा समजुतींत असतात, कीं आज एकंदर किती देणें झालें याची बरोबर मोजदाद कांहीं भटाच्या ध्यानांत येणार नाहीं; आपण त्याला सहज चकवूं शकूं. संध्याकाळीं भट बिल वसुली करावयास आला, कीं हा ऐटींत त्याला विचारतो,

"भट, आजना केटला पैसा थया?"

"बारा आना थया." भट संथपणें उत्तरतो.

" आँ ! बारा आणा ? साला भट, तूं तो मने हैराण करे छे. सवारे एक चाय, पछी बपोरे चाय अने साथे शेव चिवडा; अने हवे खाली चाय; तो केटला थया ? "

" अरे मारा बाप ! जरा हिसाब करीने तो जुवो. तमारा बे मेहमान आव्या हता तेना माटे बे स्पेशल काफी मंगावी हती; अने तमे पण सवारे चाय साथे केक लिधी हती–"

कारकून आपणास कांहीं समजत नाहीं असा चेहरा करतो.

" –तो बधा मळीने बार आना थया. " भट हिशेब देतो.

अशा रीतीनें भटाला चकवू पहाणारा कारकून चाट पडतो आणि मनांतल्या मनांत भटाच्या स्मरणशक्तीचें कौतुक करतो.

भटाचें देणें देण्याच्या बाबतींत कारकूनवर्ग कशा क्लृप्त्या योजतो त्या पहाण्याजोग्या असतात.

आतां हेंच पहा ना ! पहिली तारीख झालेली आहे व पगार झाला असल्यामुळें भट वसुलीसाठीं फिरतो आहे.

" काय, तूं आलास काय ? " एका कारकुनानें विचारलें, " आज शनिवार आहे. शनिवारीं कुणाला पैसा देऊं नये. जा, उद्यां ये. "

" उद्यां ? उद्यां तो रविवार हाय ने ? आजच पैसा देऊन टाका. पैसा फार झालेला हाय ! "

" अरे ज्या ! म्हणे पैसा फार झाला आहे ! आम्ही काय पळून जातों कीं काय ? आज नाहीं उद्यां, केव्हां तरी तुझे पैसे देणारच. "

" ते खरा ! तुमी तसा बुडवायच्या नाय ते हमी जाणते. " भट मान हल्वीत म्हणाला, " खाली तुमच्या सात महिन्याच्या बाकी राहिलेला हाय ! ! "

" सात महिने झाले म्हणून काय बिघडलं ? देऊं तुझे पैसे " म्हणत कारकुनानें आपला पगार खणांत ठेवला आणि खणाला कुलुप लावून टाकलें, आणि फाईल पुढें ओढून कामास सुरवात केली.

" पण शे ऽ ऽ ठ, पैशाच्या— "

"पैशाच्या! साला पिशाच्यासारखा मागं लागलाय! चल, चालता हो! तुला असा फिरूं देतां कामा नये. काम करूं देत नाहीं म्हणून साहेबाकडे रिपोर्ट केला पाहिजे तुझा!" एक एक डोळा 'हा' करीत कारकुनानें तावातावानें म्हटलें.

बिचारा भट "खायच्या वक्ताला विचार करते नाय आणि पैसा द्यायच्या झाला कीं असा—" असें पुटपुटत निघून गेला.

कारण ह्याच कारकुनाकडे धरणें धरून बसल्यास त्याला धंदाच करायला नको! पगार घेतल्याबरोबर कारकुनांकडे गेलं तरच कांहीं वसुली व्हावयाची!

आतां भट दुसऱ्या एका कारकुनाकडे गेला; तर त्यानें एक फाईल घेऊन साहेबाकडे जातो आहे असा आविर्भाव आणला. भट तिसऱ्या कारकुनाकडे गेला.

"हं भट! बरा आलास. एक फक्कडसा चहा आण पाहूं! डोकं दुखतंय आणि काम तर हें असं पडलंय."

"चहा आणते; पण गया महिन्याचा पैसा तो देल?"

"पैसा? किती झालाय?"

"ज्यास्त नाय; आठ रुपिया, त्रण आणा, छे पाय."

"काय! इतके पैसे? इतकं खाल्लं तरी काय मीं?"

"ते चोपडीमंदीं लिखेला हाय. बगून घ्या हवा तर."

"नको. ती आतां नको." पुढें केलेली चोपडी बाजूला सारीत कारकुनानें म्हटलें, "साला तूं भट मोठा लबाड आहेस. मला सर्व अकाऊंट तपासून पाहिला पाहिजे. पण आतां वेळ नाहीं. जा जा, अगोदर चहा पाठवून दे. माझा राजा तो. अरे, हें स्टेटमेंट आज पुरं झालं पाहिजे."

अशा तऱ्हेनें भट भ्रमंती करीत असतो आणि देणें न देण्यांत पटाईत असणारी कारकून मंडळी त्याला टोलकावीत असते. पण भटही कांहीं भोळ्या आईचं दूध प्यालेला नसतो; तो त्यांना पुरून उरतो. तोही अशा

लोकांना निराळ्या तऱ्हेनें बनवीत असतो. त्यांचीं बिलें वाढवून लिहिणें, त्यांना चांगला माल न देणें, त्यांच्या ऑर्डरी वेळेवर न पुरविणें, चार लोकांत त्यांची नाचक्की करणें, वगैरे साधनांनीं तो याची भरपाई करून घेत असतो.

ऑफिस सुरू होण्याच्या वेळीं हातांत चहाचा कप घेऊन येणारा ' भट ' देवदूताप्रमाणें भासला, तर संध्याकाळीं हातांत चोपडी व कानावर पेन्सिल ठेवून पैशाची वसुली करावयास आलेला भट कारकुनांना सैतानासारखा वाटतो ! हा भट सकाळीं गोड गोड बोलून एक एक पदार्थ लोकांच्या घशाखालीं उतरवीत असतो, तर संध्याकाळीं कठोर वाणीनें देणें देण्याची जाणीव देत असतो. सकाळचें त्याचें सौम्य स्वरूप पाहून जगन्माता अंबेची आठवण होते, तर संध्याकाळीं जगसंहारक कालीमातेचा तो अवतार वाटतो.

पण असें असलें, तरी भट हा सर्वांना हवा असतो. ' भटा'ला वगळा, कीं सारीं ऑफिसें ' गतप्रभ ' झालेलीं दिसतील. भट ही ऑफिसची शोभा आहे.

भट नसेल, तर बिचाऱ्या कारकुनांची काय अवस्था होईल याची कल्पनाही करवत नाहीं ! घरांतून सौभाग्यवतीवर रागावून यावें, पोटांत कावळे कोकलत असावेत, पुढें कामाचा डोंगर पडलेला असावा, इतक्यांत ऑफिसांतील त्या परिचित भटानें अनाहूतपणें पुढें चहाचा कप आणून ठेवावा; अशा वेळीं कारकुनाला केवढा आनंद होत असेल, याची कल्पना ' जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे ! '

—*—




" पोटाचा सवाल । डोईवर माल ।
मी तो हा हमाल । पाटीवाला ॥ "

पाटी उशाशीं ठेवून तो पदपथावर निजला आहे. पांघरावयाला कांहीं नाहीं. आणि असणार कुठून ? पदपथावरील गारशी जमीन अंथरूण आणि डोक्यावरील निळें, पांढरें, ढगाळलेलें जसें असेल तसें आकाश हें त्याचें पांघरूण. त्याच्या अंगांत अनेक ठिकाणीं फाटलेला एक सदरा असून नेसलेलें धोतरही त्याच नमुन्याचें आहे. अशाच अर्ध्या धोतराचा भाग रुमाल म्हणून त्यानें डोक्याला गुंडाळलेला असून, त्यामधून सारें डोकें डोकावत आहे. रस्त्यावरील दिव्याचा डोळ्यांवर पडणारा प्रकाश सहन न होऊन तो अडविण्यासाठीं त्यानें आपला हात डोक्यावरून आडवा नेलेला दिसत आहे. स्वतःच्या देहाशिवाय या जगांत त्याचें असें कांहीं नसल्यामुळें चोराचिलटांच्या भीतीनें त्याची झोंपमोड होण्याचें कारणच नाहीं. भर रस्त्याच्या फूटपाथवर तो इतका निश्चिंतपणें निजला आहे, कीं जसा काय स्वतःच्याच घरीं आहे ! रस्त्यावरून आवाज करीत जाणाऱ्या मोटारी, सिनेमा सुटल्यामुळें बोलत ओरडत जाणारे लोक, किंवा

इतर आवाज यामुळें त्याची झोंपमोड होण्याऐवजीं त्याच्या झोंपेला मदतच होत असावी !

पहांट झाली. रस्त्यावर रहदारी सुरू होण्यापूर्वी पाटीवाल्याला झोंप आवरणें भागच आहे. फूटपाथ कांहीं त्याच्या मालकीचा नाहीं. तसेंच निजून रहावयाचें ठरवून तो जागचा हालला नाहीं, तर पोलिसाचा दंडुका त्याच्या पाठींत बसेल; नाहींतर रस्त्यावर पाणी शिंपडणाऱ्या म्युनिसिपालिटीच्या पाण्याचा फवारा अंगावर येऊन त्याला सचैल स्नान घडेल.

तो पहा आपला पाटीवाला उठला. उशाला असलेली पाटी–त्याचें पोटाचें साधन–त्यानें डोक्यावर चढविली. तें चक्राकार पागोटें मस्तकावर धारण करून पोटाला देणाऱ्या देवतेविषयीं जणूं त्यानें आदर व भक्तिभाव व्यक्त केला. आतां तो डोळे चोळीत चालूं लागला. जरा वांकडें वळून रस्त्यावरील सार्वजनिक नळावर त्यानें तोंड धुतलें. त्या थंड पाण्यानें त्याला तरतरी वाटली, तरी हवेंतील गारव्यामुळें त्याला चहाची आठवण झाली. त्यानें कनवटीकडे हात नेला व निराशेनें मागें घेतला. समोरच्या हॉटेलांत दिव्यांचा झगझगाट असून कपबशांचा खणखणाट ऐकूं येत होता. 'एक इसम, दोन आगे' वगैरे ललकाऱ्याही त्याच्या कानांवर आल्या. इच्छित वस्तु समोर असूनही त्याला तिचा उपयोग नव्हता. मुंबईंत उपाहारगृहें पुष्कळ आहेत; पण पैशाशिवाय तीं असून नसल्यासारखींच समजलीं पाहिजेत !

तो तसाच चालूं लागला. वाटेनें जातांना त्यानें कानावर ठेवलेली विडी काढून रस्त्यावरून जाणाऱ्या एका इसमाच्या पेटलेल्या विडीवर पेटविली आणि एक झुरका मारला. त्याला जरा ऊब आलीशी वाटली. रस्त्यानें येणाऱ्याजाणाऱ्या माणसांवर, गाड्यांवर तो आसावलेल्या नजरेनें पहात होता. पण त्याला कुणीं हटकलें नाहीं, कीं तशी गरज असलेलें कुणी दिसलें नाहीं. तो चालतच राहिला.

येतां येतां तो क्रॉफर्ड मार्केटजवळ आला. मार्केटमध्यें एक आंग्ल युवती फळें खरेदी करीत होती. त्याच्या नजरेंत आशेचा किरण दिसला. तो तिच्यामागून फिरत राहिला. "मेमसाब, हमाल मंगता है ?" हें

शब्दांचें टुमणें त्यानें चालूंच ठेविलें होतें. तिनें त्याच्याकडे लक्षच दिलें नाहीं.

फरुटवाल्यानें करंडी भरली असें पाहून ती उचलण्यासाठीं तो झटकन् पुढें झाला.

“ साला सुवर, खालीपिली सताता ! पाटीवाला नहीं मांगता ! ” ती गरजली.

तिचा आवाज कोमल–अगदीं कोमल–होता. पण तिच्या तुच्छतादर्शक दृष्टीनें व हावभावांनीं कोणाच्याही काळजाला घरेंच पडलीं असतीं. ती स्त्री मार्केटबाहेर आली. फरुटवाल्याच्या मनुष्यानें ती करंडी तिच्या मोटारींत आणून ठेविली आणि पहातां पहातां मोटार निघूनही गेली !

त्या मोटारीबरोबरच त्याची ‘ सकाळचा चहा ’ मिळण्याची आशाही निघून गेली !

तो निराश झाला नाहीं. त्याला हे अनुभव रोजचेच होते. त्याच्या भावना कुसुमकोमल राहिल्या नव्हत्या. परिस्थितीनें व अनुभवानें त्यांना वज्राचा कठोरपणा प्राप्त झाला होता.

तो जरा पुढें गेला. एक बोहरी भाजी खरेदी करीत होता. पाटी-वाल्याची आशा पुन्हां जागृत झाली.

“ शेऽऽट, पाटीवाला मंगता है ? ” त्यानें अदबीनें विचारलें.

“ पाटीवाला ? ” आपल्या हातांतील भाजी घातलेला हातरुमाल मागें पुढें हल्वीत तो उद्गारला, “ और इतनीसी शाक ले जानेके लिये ? ले जानेका कुछ नहीं है. मगर खुद् हमकू पाटीमें डालके ले चलेंगे तो ? आह् !...बहोत मजा आ जायगी ! ! ”

आणि त्यानें हास्याचा मजला उभारला. जवळच्या दोघातिघांनीं त्याच्या हंसण्याला साथ दिली.

पाटीवाला मात्र तळमजल्यावर फेकल्यासारखा झाला; आणि पुढचे शब्द कानीं येण्यापूर्वींच त्यानें पुढें पाऊल टाकलें.

तो मार्केटबाहेर आला. बोरीबंदरच्या बाजूनें एक व्हिक्टोरिया येत होती.

नुकत्याच आलेल्या गाडीचे पॅसेंजर घेऊन ती चालली होती. पाटीवाल्याच्या सामान–शोधक दृष्टीला तींत कांहीं आशा उत्पन्न करणारें दिसलें.

त्याला तें मोठें घबाड मिळाल्यासारखें वाटलें आणि डोक्यावरची पाटी सांवरीत तो पळत सुटला. गाडी भरधांव वेगानें चालली होती. तो त्या गाडीमागून धांवत चालला. वळणावर गाडीचा वेग जरा कमी झाला, ही संधि साधून त्यानें सायकलवर बसतांना स्टार्ट घेतात तसा घेऊन गाडीमागील आडव्या लोखंडी दांड्याला धरून टणकन् उडी मारली व आडव्या दांड्यावर तो स्थानापन्न झाला. आपल्या हातांतील टोपली गाडीखालीं गवताचें पोतें लोंबत होतें त्याच्या आश्रयानें ठेवून दिली. त्याच्या चेहऱ्यावर आतां समाधान दिसत होतें.

गाडी ' अपने गतमो ' चालतच होती !

गाडी जात असतां रस्त्यावरील पोरांनीं त्याला पाहिलें. त्याचा हा फुकटा प्रवास त्यांना रुचला नाहीं. त्यांच्या पोरस्वभावानें उचल खाल्ली.

" ए गाडीवाला, चाबूक ! गाडीवाला ऽऽ चाबूऽक ! ! " त्यांनीं एकच गिल्ला केला !

गाडीवाल्यालाही मागें कांहीं जडसें भासलें असावें. त्यानें लागोलाग मागें वळून आपल्या हातांतील चाबकाचा फटकारा लगावला.

चाबूक सप्कन् पाटीवाल्याच्या पाठीवर बसला. तो चांगलाच कळवळला. त्याच्या तोंडून ' ओय् ' असा करुण स्वर आला.

" ए साला, निकल ज्याव ! " गाडीवाला गरजला.

गाडींतील माणसांनीं मागील पडदा वर करून मागें पाहिलें. त्यांना दया आली असावी. " रहना देव. चलना देव. " त्यांनीं सांगितलें. पण उपयोग झाला नाहीं. गाडीवाल्यानें गाडी थांबविली. बिचारा पाटीवाला केव्हांच बाजूला झाला होता.

गाडी चालू झाली. आतां पाटीवाल्यानें आपली टोपली डोकीवर ठेवली आणि तो त्या गाडीमागून धांवत चालला. हातचें सावज सोडून पळत्याच्या पाठीस लागण्यांत अर्थ नव्हता. शेवटीं जेव्हां गाडी थांबेल तेव्हां या मंडळींना हमालाची गरज लागणारच आणि मग तिथल्या

कुठल्याही हमालापेक्षां आपण बरोबर जात राहिल्यामुळें आपणांसच पसंती मिळणार हें तो जाणून होता.

चांगली मैलभर पळण्याची शर्यत केल्यावर एकदांची गाडी थांबली. दुसरा एखादा हमाल बोलाविण्याची संधि देण्यापूर्वींच हा पाटीवाला चटकन् गाडींतील सामान उतरण्यास सिद्ध झाला.

गाडींतील सामान उतरवून त्यानें त्या जड ट्रंका आणि बोजे आतां इमारतींत नेण्यास सुरवात केली. सर्व सामान चौथ्या मजल्यावर चढवायाचें होतें. एक एक बोजा वर नेतां नेतां त्याचा जीव कासावीस होण्याची पाळी आली. सकाळपासून चहाचें पाणीही त्याच्या पोटांत गेलें नव्हतें. काल केवळ एक कप चहा व अर्धा पाव यावर त्यानें रात्रीचें जेवण भागविलें होतें.

तें सर्व सामान खोलींत व्यवस्थित उतरवून धांपा टाकीत आपली टोपली डोक्यावर तिरकी ठेवून मजुरीच्या पैशाची वाट पहात तो उभा राहिला.

सामानाच्या मालकानें त्याच्या हातावर पावली ठेवली.

" शेऽठ, ये क्या ? कितना सामान था..."

" बस् बस्. इतनाही " म्हणत आपलें पोट सांवरणारा तो गुजराथी आपल्या घरच्यांना म्हणाला, " साला ए पाटीवाला लोको घणा हैराण करे छे. "

" शेऽठ, आठ बोजेका खाली चार आना ? जरा धरमसे देखना..."

" धरमसे क्या देखनेका ? " तो हंसत उद्गारला. " बडा आया धरम सिखानेवाला ! लेना होय तो लेव. "

" मगर शेऽठ ! गरीबका पेटकाही कुछ ख्याल करो... "

" हम क्या तेरेकु बोलववा आवेला क्या ? तूं तो पोतेच आवी गया... "

" हां, सच है. मगर कितने बोजे थे उसका तो ख्याल करो. " पाटीवाल्यानें त्या प्रचंड सामानाकडे बोट करीत म्हटलें.

" अच्छा अच्छा ! चलो, निकलो अबी. हम् थक गये हैं. कुछ आराम करना दो. "

" शेऽऽठ– " त्यानें दीनवाणीनें पुकार केला.

" अच्छा, ये लेव. " म्हणून त्यानें एक आणेली फेकली आणि धाडकन् दरवाजा लावून घेतला.

पाटीवाल्याला त्या गुजराथी इसमाच्या या वागणुकीची चीड आली. सकाळपासून निराशाच पदरीं आल्यामुळें तो त्रासल्यासारखा झाला होता. आतां आपल्या दयेच्या याचनेला दरवाजा बंद झालेला पाहून तो संतापला. पण करतो काय ? मालकानें फेकलेली आणेली घरंगळत गेली होती ती त्यानें शोधून काढली आणि जिना उतरतां उतरतां—

" साला ये सब लोक हराम है. गरीबकी याद नहीं करते. सालेका सत्यानाश हो जाय ! इतना भारी बोजा चार माळेपर चढा दिया; मगर इसकाबी ख्याल नहीं. कामका भी दाम नहीं, फिर खुसी कहां की ? "

अशी बडबड त्यानें चालविली होती.

तो रस्त्यावर आला. आतां अगोदर पोटाची व्यवस्था करणें जरूर होतें. कोंपऱ्यावर ' महांकाली हिंदु खाण्याचें गृह ' होतें. तेथें जाऊन त्यानें एक प्लेट उसळ, एक मिसळ व एक कप चहा घेतला. हे पदार्थ त्याच्या पोटाच्यां कोपऱ्यांतही बसले नाहींत; पण एवढ्यानेंच मोठ्या मेटाकुटीनें मिळविलेल्या पांच आण्यांचा खुर्दा उडाला होता !

आतां पुन्हां पुरा कफल्लक बनून तो नव्या गिऱ्हाईकाच्या शोधासाठीं हॉटेलबाहेर पडला.

—*—

# व्हिक्टोरियावाला




" तात्या, विक्टोरिया पायजे काय ? "

" भाऊच्या धक्क्यावर व्हिक्टोरियांची रांग लागून राहिली होती. तात्या काल २ वाजतां बोटींत बसले होते, ते सकाळीं आठ वाजतां उतरल्यामुळें त्यांना गळून गेल्यासारखें वाटत होतें. त्यांच्या डोळ्यांपुढें वाटोळीं वर्तुळें दिसूं लागलीं होतीं, आणि त्यांची स्वत:ची पायानें जाण्याची इच्छा असली तरी पायांत ताकद नव्हती. अशा दमलेल्या स्थितींत उगीच कोणाच्या तरी गाडींत बसून जाण्यापेक्षां व्हिक्टोरियांत बसून जाणें सुरक्षितपणाचें आहे असें त्यांना वाटेल, आणि त्यांच्याकडे आशाळभूतपणानें पाहणाऱ्या व्हिक्टोरियावाल्याला ते म्हणाले,

" हां. पण तुझी व्हिक्टोरियाच आहे ना ? " गृहस्थ गाडी दोन्ही डोळ्यांनीं ( तेसुद्धां चष्मा लावलेले नव्हे ! ) पहात आहे आणि वर असें विचारतो, हें पाहून गाडीवाल्याला हंसूं येणें अपरिहार्य होतें, पण त्यानें तें आवरलें आणि त्याच वेळीं ' तात्या ' मुंबईला नवा दिसतो हेंही ताडलें.

" हां, तुमाला कुठं जायच्या हाय ? "

" झावबाच्या वाडींत. आमच्या बाळूच्या घरीं ! "

" पोचवेल, पोचवेल ! तुमच्या बाळूच्या घरींच पोचवेल. च्यला, बसा नी. " असें म्हणत गाडीवाला सांवरून बसला.

"पण तूं काय घेशील तें सांग ना अगोदर?" तात्यांनीं त्याला आपादमस्तक न्याहाळून मनुष्य सच्चा दिसतो अशी खात्री झाल्यावर विचारलें.

"तुमी बोला ने!" गाडीवाल्यानें म्हटलें.

"पण तुमी काय देल ते तर सांगा."

तात्यांना धीर आला. व्हिक्टोरियावाल्याच्या भाषेंत देलघेल उलट अर्थानें वापरत असावेत हें त्यांच्या ध्यानांत आल्याविना राहिलें नाहीं.

"आमी, सहा रुपिया देल."

"मी तीन रुपये घेल; चल येत असलास तर."

"तात्या, त्ये कसा परवडायच्या? पण तुमाला म्हणून नेते आमी, चला."

तात्या गाडींत बसले. सहा रुपयांचें तीन रुपयांत भागलें, म्हणजे तीन रुपये फायदा झाल्यामुळें त्यांना आनंद झाला होता, आणि दुसरें अंतस्थ कारण म्हणजे ते व्हिक्टोरियांत बसले होते. ज्या राणीनें हिंदुधर्मांत आपण हात घालणार नाहीं म्हणून घोषणा केली, तिचें पवित्र नांव दिलेल्या गाडींत बसावयाला मिळण्यास पुण्याई पाहिजे!

गाडी चालू होत असतां दुसऱ्या गाडीवाल्यानें विचारलें, "केटला?"

या गाडीवाल्यानें उत्तर दिलें, "तीन. तात्या छे!"

"हां, सारा सवदा किधा. मज्या करो."

गाडी चालत होती. तात्यांचे विचारही चालूच होते. व्हिक्टोरियांत बसल्यामुळें 'व्हिक्टोरिया धन्य सती। अवतरली या जगतीं' ह्या कवितेचें त्यांना स्मरण होऊन ती म्हणण्यांत ते गढून गेले होते!

कॅरनॅक बंदरजवळच्या दगडी रस्त्यावर आल्यावर गाडीच्या खडबडण्यानें ते भानावर आले नसते, तर त्या सतीच्या वर्णनांत गुंगून गेले असते. आजूबाजूच्या बिल्डिंगवर ते आश्चर्यचकित नजर लावीत होते. एकामागून एक बिल्डिंग मागें पडत होत्या. गाडी पुढें चालली होती. पण साऱ्याच उंच बिल्डिंग्स् पाहून त्यांना कंटाळा आला. त्यांनीं विचार केला, 'बिल्डिंग काय, पाहूं मग; गाडीवाला कसा काय आहे, तें तर पाहूं अगोदर."

गाडीवाला जोरांत होता. रस्त्यावर गर्दी दिसली, कीं आपल्या हातांतील चाबकाचा उलटा भाग गाडीवर खटखट आपटीत तो चालला होता. त्यानें तांबडी गोंड्याची टोपी तिरकी घातली असून एखादा नबाब असावा अशा थाटांत तो बसला होता. गाडीच्या हादरण्याबरोबर टोपीच्या गोंड्याला गति मिळून तो एकदां टोपीपासून दूर, तर दुसऱ्यानें टोपीला येऊन भिडत होता. आपल्या प्रियकरणीपासून उसना राग आणून, जातों असें दाखविणाऱ्या पण लगोलग मागें वळून प्रेमानें तिला बाहुपाशांत बद्ध करणाऱ्या प्रियकराप्रमाणें त्या गोंड्याची कृति होती. त्याच्या अंगांत खाकी रंगाचा शर्टवजा कोट होता आणि पायांत एक चांदीचा बारीक वाळा होता. उच्च आसनावर असल्यामुळें आपण कोणी स्वर्गांतले आहोंत आणि रस्त्यांत जाणारे लोक अगदींच सामान्य मृत्युलोकांतील अशा आविर्भावानें तो बसला होता आणि याच दृष्टीनें तो येणाऱ्याजाणाऱ्या लोकांकडे पहात होता. केवळ घोड्याचीच नव्हे तर जाणाऱ्यायेणाऱ्यांच्या लगामा आपल्याच हातांत आहेत, असा त्याचा थाट होता. आपल्या गाडींत कोणी बसलें आहे कीं नाहीं, याची जणूं त्याला पर्वाच नव्हती! घोडा वेगांत होता, इतक्यांत वळणावर गाडी आली आणि तो गरजला,

"ए ऽ जानेवाला! साला मरनेका है क्या?"

तात्यांनीं बाहेर पाहिलें; एक दहाबारा वर्षांचें पोर काखेंत पुस्तकांची बॅग अडकवून रस्त्याच्या एका टोंकाकडून दुसरीकडे पळत जात होतें. ते म्हणाले,

"गाडीवाला! तें पोर आत्तां सांपडत होतं!"

"हो, तात्या. ए साला छोकरालोक असाच पळत रस्त्यावरून जाते."

तो काळबादेवीच्या रस्त्यानें भुलेश्वरकडे शिरला. रस्त्याला फारच गर्दी दिसली.

त्यानें चाबकाची काठी जोरानें वाजविण्यास सुरवात केली. पायानें घंटा वाजविण्याचेंही काम चालू होतें.

"ए डोशी मा! रस्तामा मरी जऊं छे के?"

—"शे ऽ ऽ ठ, बाजू हटो ने."

—“ ए मोटारवाला, बाजू लेव. ”

अशीं तोंडांतून मुक्ताफळें बाहेर पडत होतीं.

गर्दी म्हणजे मी म्हणत होती. त्या गर्दीतून चालणें म्हणजे पायांनीं जावयाचा प्रयत्न करतांना चार लोकांच्या खांद्यावरून जाण्याचा प्रसंग ओढवून आणणें. रस्त्याची रुंदी अतिशय कमी. दोन गाड्या येणेंजाणें सुद्धां कठीण. वर त्यांत पायदळाची भर पडलेली ! अशा स्थितींत केवळ तोंड, हातपायच नव्हेत, तर तितक्याच वेगानें गाडी चालविणाऱ्या त्या गाडीवाल्याची कोणींही तारीफच केली असती.

रस्त्यानें जाणारे लोक तर इतके निढावलेले दिसले, कीं त्यांना उद्देशून, “ शेट संभालो, ” “ ए बाजू हटो, ” असल्या सोडलेल्या वाग्बाणांनीं ते घायाळ होण्याऐवजीं एखाद्या कसलेल्या वीरासारखी आपली चालण्याची तऱ्हा व जागा न सोडतां जात होते.

असें करीत असतां कित्येक वेळां गाडीकडे पाठ करून जाणाऱ्या इसमाच्या पाठीला घोड्याचें तोंड लागून तो तोंडघशी पडतो कीं काय अशी स्थिति येई. पण घोड्याला शिंग नसल्यामुळें तो शिंगावर घेईल ही भीतिही त्यांना नव्हती. तात्यांचा गाडीवाल्याविषयीं आदर वाढला. त्यांनीं गाडीवाल्याकडे साभिमानमुद्रेनें पाहिलें. गाडीवाल्याला त्याचें विशेष वाटत नसावें. त्यानें वळूनही पाहिलें नाहीं. हें तो कर्तव्य म्हणून करीत होता. त्याबद्दल आपणांस कोणीं शाबासकी द्यावी अशी त्याची इच्छाही नसावी.

पण तात्यांच्या मनांत त्याला त्याच्या कर्तबगारीबद्दल धन्यवाद द्यावे असें अनेक वेळां आलें. पण बाहेरगांवच्या गाडीवानांसारखा तो आपल्या गाडींतील पॅसेंजरांशीं बोलणाऱ्यांपैकीं नव्हता. कदाचित् मुंबईत असेंच असावें. दुसऱ्याबद्दल बेफिकिरी ही वृत्ति मुंबईकरांच्या हाडींमासीं खिळलेली. नाहीं तर आपल्या तिकडचे गाडीवाले. गाडी चालू असतां आपली सर्व माहिती सांगतील. बैल कधीं खरेदी केले; गाडीचा धंदा किती वर्षें करीत आहों; मोटारीमुळें आपलें कसें नुकसान होत आहे; आपल्या घरांत, कुटुंबांत किती माणसें आहेत; आपला धाकटा मुलगा व त्याची आजी यांना एकमेकांचा कसा लळा आहे; इत्यादि स्वतःच्या गोष्टी सांगूनच

न थांबतां बंदरावरून निघाल्यापासून घरीं पोहोंचेपर्यंत, गांवांत कुठली नाटक कंपनी आली, खेळाला गर्दी होते कीं नाहीं, एक ना दोन, हजार गोष्टींचें वर्तमानपत्र गाडींत बसलेल्या इसमाच्या डोक्यांत भरावयाला ते नेहमीं अगदीं उत्सुक. अशा गाडींत बसणें म्हणजे केवळ बंदरावरून एकटेच आपण घरीं जाणें नव्हे, तर बरोबर गांवांतील एकूण एक बातम्या डोकींत भरून घेणें होय. केवळ गाडीच्या भाड्यांत हें कांहीं महाग नाहीं, पण तात्यांना तो चान्स इथें दिसेना.

तेव्हां त्याच्याशीं बोलण्याची खटपट करण्यापेक्षां आणि कदाचित् मागें वळून प्रयत्न करील तर पुढच्या गर्दींत त्याचा घोडा कुठें जाऊन अपघात मात्र व्हावयाचा हा सुज्ञ विचार करून गाडीवाल्याला द्यावयाची शाबासकी त्यांनीं उतरतांना द्यावयाचें ठरविलें. आणि मग इतर आजूबाजूच्या गाड्यांकडे त्यांनीं लक्ष द्यावयास सुरवात केली. गाडींत बसलेल्या लोकांच्या तऱ्हा पाहून त्यांची बरीच करमणूक झाली. एक रंगेल गडी, मागच्या सीटवर बसून पुढच्या लहान सीटवर लांब पाय पसरून तिरका बसला होता; आणि एका हातानें पिंजारलेले केस सांवरीत आणि विड्यानें लाल झालेल्या तोंडांतील पांढऱ्या सिगारेटचा धूर सोडीत चालला होता. त्याची नजर वरच्या खिडकीवर होती. एका गुजराती शेठनें तर आपल्या पिंपासारख्या पोटाला पुढच्या बारीक सीटचा आधार दिलेला दिसत होता. एकानें आपण कसेंबसें मागच्या सीटवर बसून दोन्ही सीट-मध्यें एक जंगी कपाट व इतर सामान ठेविलें होतें. त्याचें कपाटामागून डोकावणारें डोकें तेवढें लोकांना दिसत होतें! कपाटासाठींच जणुं ती गाडी भाड्यानें केली होती. चवथा एक गाडीला चारी बाजूंनीं पांढरें कापड लावून आपला झनाना घेऊन चालला होता. तो स्वतः आपल्या तिचें जणुं रक्षण करीत पुढच्या सीटवर बसला होता, तर त्याची 'ती' मागील लहान पडदा वर करून, त्याची नजर चुकवून, अन्य जगावर नजर फेकीत होती. एका गाडींत इतकीं माणसें बसलीं होतीं, कीं त्यांच्या भारानें गाडी घोड्यासह "क्विक् मार्च" करण्याऐवजीं एकदम "हॉल्ट" करील असें वाटत होतें. एका गाडींतल्या गर्दींत गांजणाऱ्या सासवेनें प्रेमानें सुनेला मांडीवर घेतल्याचा भास होत होता, तर दुसऱ्या

राजा ग्रंथ संग्रहालय, आप. स्थानक
नुक्रम ७५७२६ वि. निबंध
१२६७६ नौ दि. २१।३।६१
१८७८८


एका गाडींत दुसऱ्याला पैही न देणाऱ्या म्हाताऱ्यानें आपल्या गड्याला मांडीवर घेतल्याचें ( दत्तक घेतल्याचें ) दृश्य दिसत होतें. एका गाडींत एक रंगेल जोडपें गुलगुल गोष्टी करीत चाललें होतें, तर दुसरींत चार गिरणबाबू 'चाय्' केव्हां मिळेल अशा विवंचनेंत आंबट तोंड करून चालले होते. तात्यांनीं तें सर्व पाहिलें. विचार करूं लागल्यास 'साध्याही विषयांत आशय कधीं मोठा असें आढळे' याची त्यांना खात्री पटत चालली होती. असे नाना तऱ्हेचे लोक आपल्या गाडींतून नेत असतांना मुंबईच्या गाडीवाल्याची जिज्ञासूवृत्ति कधींच जागृत होत नाहीं याचें त्यांना आश्चर्य वाटलें. त्याच आश्चर्याबरोबर असें करण्यास त्याला केवढें आत्मसंयमन करावें लागत असेल, याचीहि त्यांना कल्पना आली. कारण गाडीवानाचा वर्ग चालत्याबोलत्या वर्गापैकीं आहे. बोललेली जीभ आवरून धरणें अति कठीण काम आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळें तात्यांचा त्या गाडीवाल्याविषयींचा आदर दुपटीनें वाढला. त्यांची दृष्टि मागें वळली. गाडीवान–सारथी ! त्यांच्या स्मृतीला उजाळा मिळूं लागला. याच गाडीवानासारखे आपले भगवान् श्रीकृष्ण रथांत बसलेल्या पार्थाला त्यांनीं सारी गीता सांगून टाकली. शल्य ! कर्णाचा प्रसिद्ध सारथी. त्याच्या जिभेला तर हाडच नव्हतें. त्यानें रथांत बसलेल्या कर्णाची चांगली हजेरी घेतली. ही झाली जन्मजात सारथी–गाडीवाले–नसलेल्यांची गोष्ट. अशा अतिरथी–महारथी सारथ्यांना आपल्या जिभेला लगाम घालतां आला नाहीं, पण–आपला गाडीवान–आतां तर तात्यांच्या गाडीवानाविषयींच्या आदराला सीमाच राहिली नाहीं. धन्य तो गाडीवान आणि अशा गाडींत बसणारे आपणही !—

पण इतक्यांत ही विचारशृंखला तुटली. गाडीवानानें "झावबाची वाडी" म्हणून पुकारलें.

" होय का, चल बाळूच्या चाळींत. "

" बाळूची चाळ आमी नाय जानते, तात्या— "

" कांहीं हरकत नाहीं. मी इथं उतरेन. नको तूं तसदी घेऊं. मला तुला कांहीं विचारायचं होतं; पण जाऊं द्या. "

असें म्हणून तात्यांनीं झाडण्या अडकविलेली ट्रंक व लाल झालेलें पोतें रस्त्यावर उतरलें आणि त्या गाडीवानाच्या हातावर कडुसरीचे तीन रुपये काढून ठेविले.

त्यानें पण 'तात्या ! जरा गरिबाला...' म्हटल्यावर आणखी एक पावली त्यांनीं त्याच्या हातावर ठेवली व त्याला नमस्कार केला आणि 'येतों आतां !' असें म्हणून ट्रंक खांद्यावर घेऊन आणि वळकटी हातांत घेऊन ते चालूं लागले. वाडीच्या जिन्यावर येतात तों प्रत्यक्ष बाळूच हातांत सिगरेट, डाव्या खांद्यावर धोतराचा शेवट, अशा थाटांत जात असलेला दिसला. 'बाळू !' म्हणून त्यांनीं हांक मारिली.

त्यांना पाहिल्याबरोबर विजेचा झटका बसावा त्याप्रमाणें हातांतील सिगरेट टाकून तो नमस्कारून म्हणाला,

"चला, या ना !"

घरीं गेल्यावर काका (तात्या) त्या व्हिक्टोरियावाल्याची स्तुति करूं लागले. "भला माणूस ! आणि संयमशील तरी किती !! कुणास कधीं फसवायचा नाहीं. 'कर्मण्येवाधिकारस्ते' अशी वर्तणूक !"

"हो, पण काका, त्यानं बंदरावरून यायला काय घेतलं ?"

"तीन रुपये."

"तीन रुपये ? फसवलंन् तुम्हांला त्यानं ! फार तर दोन रुपये !" बाळू म्हणाला.

तात्यांना धक्का बसला; पण ते म्हणाले, "मला काय माहीत नाहीं का काय ? पण त्याचा चांगुलपणा पाहिला आणि मुद्दाम तीन रुपये ठरविले. एवढंच नव्हे तर उतरल्यावर एक पावली खुशीची दिली. अरे, माणसाची कांहीं किंमत आहे का नाहीं ? का आपला पैसा ?"

तात्यांची ही सारवासारव आणि फसल्याची कबुली न देण्याची मखलाशी बाळूनें ओळखली; पण—तात्यांपुढें बोलणार कोण ?

—*—

# सलूनवाला



तात्या मुंबईला येऊन आतां दोन महिने होऊन गेले होते. कोंकणांतून निघाले त्या वेळीं त्यांनीं दाढी करून फक्त दीड महिना झाला होता! मुंबईतील दोन महिन्यांच्या वसतीनें त्यांची दाढी व आसपासचा प्रदेश चांगलाच तरारला. मुंबईत आपल्या चेहऱ्यावरून रोजच्या रोज पोलादी पातें फिरविणारे लोक असल्यामुळें त्यांना तात्यांच्या या तराईच्या प्रदेशाकडे पाहून कसेंसेंच होई! त्यांत 'उवा' नांवाचा प्राणी कळप करून रहात असावा, असाही शोध चाळींतील एका फॅशनेबल तरुणानें लावला; तर दुसऱ्यानें तात्यांची वाढलेली दाढी तशीच रहाण्याचें कारण असें सांगितलें, कीं त्यांना कन्या अगर पुत्रयोग लवकरच येणार याची ही खूण आहे. तिसऱ्यानें तात्यांवर चिक्कूपणाचा आरोप केला.

या साऱ्या तर्ककुतर्कांना 'मूले कुठारः' या न्यायानें खोटें पाडण्यासाठीं त्या प्रदेशावरून वस्तरा फिरवून घेणें ही एकच युक्ति होती. तात्यांना मीं तसें करण्याविषयीं सुचविलें.

झालें; असा कारागीर मिळावा म्हणून आम्हीं शोध चालविला. रस्त्याच्या नाक्यावर असे कांहीं लोक बसतात, त्यांतल्या कुणाला बोलवावा तर चाळीच्या गॅलरींत हा समारंभ घडवून आणावा लागणार. साहजिकच

साऱ्यांच्या नजरा तात्यांवर लागणार; त्यापेक्षां एखाद्या सलूनांत गेलें तर 'गुपचूप' सर्व व्यवहार होईल म्हणून मीं तात्यांना सलूनांत घेऊन जाण्याचें ठरविलें. पण तात्या त्याला कबूल होईनात. त्यांना तें महापाप वाटूं लागलें. याला इलाज म्हणजे ज्या ईश्वरी नामानें सकल पातकें भस्म होतात तें नांव धारण करणाऱ्या सलूनमध्यें त्यांना नेणें. म्हणून मीं त्यांना 'रामायण हेर कटिंग सलून'मध्यें घेऊन गेलों. आम्ही सलूनसमोर गेल्या-बरोबर तात्या बाहेरच उभे राहिले. ते बघतात काय म्हणून मी पहातों, तर प्रवेशद्वारीं असलेल्या स्प्रिंगच्या अर्ध्या दरवाजाखालून आंत असलेल्या इतर लोकांचे दिसणारे पाय! कां कुणास ठाऊक! आंत शिरण्यास त्यांचा पायच घेईना. त्यांनीं मग सलूनच्या दोहों बाजूंस लटकणाऱ्या पाट्यांवर दृष्टि फेकली. पहातात तों—

दाढी......दोन आणे.
केंस दाढी...बारा आणे.
खाली केंस...दहा आणे.
बॉब्र कट... बारा आणे.

असा मजकूर होता. हें वाचल्यावर व आंतून बाहेर पडणाऱ्या तात्यांच्या ओळखीच्या एका गृहस्थाचा सफाचट् गोटा झालेला पाहून त्यांना धीर आला आणि ते आंत शिरले.

आंत पहातात तर अनेक लोक आपल्या पाळीची वाट पहात बसले होते. तात्या जात्याच निरीक्षणशील असल्यामुळें तेथें बसल्या बसल्या त्यांनीं सलूनच्या अंतर्भागाचें चांगलें निरीक्षण चालविलें. सलूनमध्यें एवढा साज-शृंगार असेल असें त्यांना स्वप्नांतही वाटलें नव्हतें. विशेषतः केशकर्तनाचा व शृंगाराचा अन्योन्य संबंध इतका घनिष्ठ असेल हें त्यांना आजच माहीत झालें! सलूनच्या चारी भिंतींवर पहातात तों काय, अनेक सुंदर स्त्रियांच्या चित्रांचें प्रदर्शनच. सिनेमा नटींचीं चित्रेंही कानाकोपऱ्यांतून लाविलेलीं असल्यामुळें पहातील तिकडे तात्यांना 'स्त्रीसाम्राज्य' दिसूं लागलें. स्त्रीसौंदर्याचा तो उत्तान आविष्कार पहाण्यापेक्षां डोळे मिटून घ्यावे असें तात्यांना वाटलें; पण इतक्यांत त्यांना सहारामध्यें हिरवळ आढळावी

त्याप्रमाणें दत्ताची एक तसबीर तेथें आढळली. त्या तसबिरीवर काल घातलेला हार अजूनही बऱ्याच चांगल्या स्थितींत होता. तात्यांनीं तें दृश्य पाहिलें; आणि एवढ्या शृंगाररसांत भक्तिरसाचा एक बिंदु तरी आहे हें पाहून तात्यांच्या आत्म्याला समाधान वाटलें. भिंतीवरच्या छोट्या कपाटामध्यें कर्तनालयाला लागणाऱ्या साहित्याचा सांठा करण्यांत आला होता. तो पाहिल्यावर सलूनऐवजीं असलें सामान विकणारेंच हें दुकान असावें असाच कुणालाही भास झाला असता! रंगीबेरंगी साबणाच्या पेट्या, नाना तऱ्हेचीं तेलें असलेल्या बाटल्या, पोमेडच्या डब्या, त्यांचे आकर्षक आकार, यामुळें सर्व दृश्य मोठें मनोहारी दिसत होतें. हें इतकें साहित्य जर गिऱ्हाईकांसाठीं उपयोगांत आणीत असतील तर बराचसा झिजलेला साबण, बहुतेक केंस गेलेला ब्रश आणि अडकित्याच्या आकाराचा वस्तरा वापरणाऱ्या फिरत्या कारागिराकडे जाणारा इसम मूर्ख असला पाहिजे असें तात्यांना वाटलें.

दोन दोन कपाटांच्या मध्यभागीं लटकविलेल्या मोठ्या आरशांत फिरत्या खुर्चीवर बसलेल्या व केंस कापले जाणाऱ्या गिऱ्हाईकांचीं पाठमोरीं प्रतिबिंबें दिसत होतीं. आठदहा खुर्च्यांवर बसलेल्या त्या मंडळीवर चाललेले प्रयोग पहात असतां आपणास येथें येऊन किती वेळ झाला याचें तात्यांना भानही राहिलें नाहीं! "शे ऽऽठ, चला" म्हणून कारागिरानें त्यांना पुकारलें तेव्हां कुठें तात्या सावध झाले.

तात्या पुढें झाले. त्या फिरत्या खुर्चीला त्यांचा धक्का लागला आणि ती जी गर्रकन् फिरली ती तात्यांकडे तोंड करून बसली! सलूनमधील कारागिरानें ती सरळ करून दिल्यावर तात्या एकदांचे तीवर आरूढ झाले. आपली श्मश्रू कशी करावयाची तें त्यांनीं सांगितलें आणि सलूनवाला कामास लागला. त्यानें खुर्चीचा मान टेकावयाचा आंकडा वर करून तात्यांची मान त्यावर ठेवली. बळी जाणाऱ्या बोकडाप्रमाणें तात्यांना हा प्रकार वाटला. या आंकड्यावर मान ठेवल्यामुळें त्यांची नजर वर—म्हणजे छतावर—लागली. ज्यानें तात्यांची मान या आंकड्यावर ठेविली होती त्याचा कुठें पत्ता नव्हता! बरें, आपली मान इकडे तिकडे करण्याची तात्यांची छाती

होईना. त्यांनीं आपली नजर वर लाविली होती. त्यांच्या कानावर 'चट्पट् चट्पट्' असा आवाज येत होता. सलूनमधील कारागीर आपल्या शस्त्राला धार लावीत असावा असा त्यांनीं तर्क केला. इतक्यांत कोणसें जवळ आल्याचा भास झाला. तो बहुधा तोच असावा कीं ज्यानें तात्यांना असें बसविलें होतें. ब्रशावर साबणाचा फेंस घेऊन त्यानें तो तात्यांच्या डोक्याला फांसला आणि पुन्हां तो कुठेंतरी गेला. 'चट्पट्' असा आवाज येत असल्यामुळें तो जवळपास असावा एवढी तात्यांना खात्री होती. जरा वेळानें "साला चाय आन, चा प्याल्याशिवाय मना नाय काम व्हनार." असे शब्द त्यांच्या कानावर आले. पुन्हां कांहीं वेळ सामसूम! बिचाऱ्या तात्यांची मान आंखडून लांकूड बनली होती.

चहा पिऊन ताजातवाना झालेला आणि विडीचा धूर सोडणारा तो कारागीर तात्यांच्या जवळ आला आणि अशा 'सुगंधी' वातावरणांत कामास सुरवात झाली. तात्यांना एकदोन ठिकाणीं वस्तरा लागला व त्यांनीं जरा 'हाय' केलें; पण तो असल्या 'हायला' भीक घालणारा नव्हता. कारागिरानें आपला संचा फिरविण्यास सुरवात केली तेव्हां त्याचें कौशल्य तात्यांच्या ध्यानीं आलें. तात्या हँगिंग गार्डनवर फिरावयास गेले असतां तेथील दूर्वांकुर कापीत जाणारा रूळ त्यांनीं पाहिला होता, त्याची त्यांना आठवण झाली. तो रूळवाला मध्यें विसांवा घेण्यास तरी थांबत असे; पण यानें एका दमांत मागून संचा धरून पुढें आणून सोडला. शेत नांगरतांना जमिनींत जसे भाग पडत जातात तसे भाग आपल्या डोक्यावर पडत असल्याचें तात्यांना आरशांतून दिसत होतें. 'आपलें डोकें चांगलेंच नांगरलें जात आहे तेव्हां तें सुपीक बनणार यांत शंका नाहीं.' ते मनांत म्हणाले.

केशकर्तन संपल्यावर तात्यांचा कंठ सद्गदित झालेला व त्यांच्या डोळ्यांत अश्रू आलेले दिसत होते. एका बाजूस मान करून ती लांकडासारखी ताठ धरणें, एकाच दिशेला नजर लावणें, कारागिरानें धक्का दिला कीं मान वर करणें, आकाशांत नजर लावणें, डोळे मिटून घेणें वगैरे सर्व प्रकारच्या कवाईतींतून एकदांचे तात्या पार पडले.

आतां एक बाटली तात्यांसमोर धरून कारागिरानें तात्यांच्या तोंडावर असा फवारा सोडला, कीं पॉयशाचा फवारा त्याच्यापुढें काय! अर्थात् असा प्रकार होत असतांना तात्या गैरसावध असल्यानें त्यांच्या उघड्या असलेल्या सर्व अवयवांत पाणीच पाणी झालें! पशूचा बळी देत असतांना त्याचें आक्रंदन ऐकूं येऊं नये म्हणून मोठमोठ्यानें वाद्यें वाजवितात तसाच हा पाणी मारण्याचा प्रकार; त्यामुळें तात्यांच्या डोळ्यांतील पाणी कुठल्या कुठें नाहींसें झालें! नळांतून पाणी वहात जातें त्याप्रमाणें फवाऱ्याचें पाणी तात्यांच्या उघड्या तोंडाच्या नळांतून खालीं जाऊं लागलें. क्षणभर त्यांना गुदमरल्यासारखें झालें. पण विषानें विष मारलें जावें त्याप्रमाणें त्यांच्या तोंडावरील पाणी पुसण्यासाठीं जो टॉवेल वापरण्यांत आला त्याच्या वासानें गुदमरणें कुठेंच जाऊन फक्त मरणेंच शिल्लक राहिलें. मग तात्यांच्या डोक्यावर तेल ओतून कारागिरानें आपले दोन्ही हात त्या तुळतुळीत गोट्यावर चालविण्यास सुरवात केली. तात्यांचें डोकें म्हणजे शाई लावलेला तबलाच. कारागीर त्यांतून 'ना धी धिन्ना'चे बोल काढण्याचा प्रयत्न करतो आहेसें त्यांना वाटलें. तबला लावण्यासाठीं लहानशा हातोडीनें टोकाटोकांना आघात करतात तसे तात्यांच्या डोक्यावर केल्यावर तर त्यांतून सरस बोल येऊं लागले! या तालाला सूर धरण्यासाठीं कुणी गाणें म्हणेल तर किती बहार होईल असें तात्यांना वाटतें, तोंच "**बाळा जो जो रे एँ ऽ एँ ऽ बाळा...**" हें गीत कारागिरानें गुणगुणण्यास आरंभ केला. हा तालसुराचा जलसा कांहीं काळ चांगलाच रंगला!

शेवटीं कारागिरानें तात्यांची शेंडी विंचरून त्यांना मोकळे करण्याचा विचार केला. त्यानें ती साफ विंचरून काढली. मग अंगावर पडलेले केंस झटकण्यासाठीं हातांतल्या टावेलानें तात्यांच्या अंगावर चांगले पांच-सहा फटकारे मारले! जणुं तो तरवारच फिरवीत होता. अर्थात् हा खुर्ची सोडण्याचा इषारा होता; पण तात्यांनीं जागा सोडली ती आणखी फटकाऱ्यांपासून बचाव करण्यासाठीं.

तात्यांनीं कनवटीचा पांढरा चकचकीत रुपया काढून कारागिराच्या

हातीं दिला. त्यानें मोड देईपर्यंत पुन्हां एकदां सलूनमधील त्या सर्व सुंदर चित्रांवर त्यांनीं दृष्टि फिरविली. त्या चित्रांत एक एन्लार्ज केलेला फोटो त्यांना आढळला. तो सलून स्थापन करणाऱ्या गृहस्थाचा असावा हें उघड होतें. ज्यानें इतकें सुंदर आणि कलापूर्ण कर्तनालय काढलें, त्यांत असे कलावंत कारागीर नेमले, त्याच्या तसबिरीपुढें आपलें डोकें मनांतल्या मनांत लववून तात्या सलूनबाहेर पडले.

—*—

# हॉटेलवाला



" फालुदा ईज रेडी "

हॉटेलांत शिरतांना प्रवेशद्वाराजवळील ती पाटी माझ्या नजरेंत भरल्यावांचून राहिली नाहीं. आंत शिरल्याबरोबर मालक महाशयाचें दर्शन झालें. आपणासभोंवतीं जणूं अभेद्य कोट करून तो उभा होता. त्याच्या मागच्या बाजूला भिंत असून ( भिंतीपेक्षां आरसा होता असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल ) पुढें एक कपाट होतें. त्या कपाटाचा त्याला टेबलासारखा व शो–केससारखा उपयोग होत असे. त्या कपाटाच्या खणांतून रंगीबेरंगी सिगारेटचीं सुंदर पाकिटें, बिस्किटाचे पुडे, पोमेडच्या बाटल्या आणि टिनचे इतर छोटे डबे आकर्षक रीतीनें मांडले होते. वरच्या बाजूला पेपरमिंट आणि चॉकोलेटनें भरलेल्या चमत्कारिक आकाराच्या कांचच्या बरण्या होत्या. दोन्ही बाजूंस मांडलेल्या या बरण्यांच्या मध्यभागीं गिऱ्हाईकानें पैसे टाकण्यास एक जाड व छानदार असें वाटोळें कांचपात्र ठेविलेलें होतें. त्याच्या आंतून दिसणारें चित्र त्या पात्राइतकेंच मनोहर होतें. त्या दर्शनी कपाटाच्या दोन्ही बाजूंना फळ्या लावलेल्या होत्या. त्यापैकीं एका बाजूचा भाग बंद असून दुसऱ्या बाजूच्या भागाला दार केलेलें होतें. या चार भागांच्यामध्यें उभा राहिलेला तो मालक ' प्रिझनर इन् द डॉक ' सारखा भासत होता.

त्याला तसा उभा पाहून, मराठी पुस्तकांतील, 'मास्तर पिंपळाच्या पारावर उभे राहून मुलांना रस वांटीत होते' या वाक्याची मला आठवण झाली. मास्तरांप्रमाणेंच ही व्यक्तीही गिऱ्हाईकांना सोमरस (चहा) पाजीत होती. त्याच्या शरीराकडे पाहिलें तर तें स्थूलच भासत होतें. त्यामुळें 'सुंदर–मुख तुंदिल–तनु नंदिकेश्वरा' ही ओळ गुणगुणावी असें वाटे. त्याच्या अंगांत मलमलीचा लांब सदरा असून कमेरला पवित्र जानवें होतें. डोक्यावरील वाटोळी मखमली काळी टोपी फक्त तालूरक्षणार्थ घातलेली असावी. त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलें, कीं तो विरक्तासारखा उभा राहून तप करीत आहे असा भास होत असला तरी कांचपात्रावर पैशाचा मधुर नाद झाला, कीं तो एकदम संसारांत आल्याविना रहात नसे.

मी एका कोपऱ्यांतील खुर्चीवर स्थानापन्न झालों आणि कांहीं तरी मागविणार, तोंच तीन व्यक्ती आंत शिरल्या आणि वाटोळ्या टेबलाभोंवतींच्या खुर्च्यांवर स्थिर झाल्या. तेथें पहिल्यानेंच एक तरुण बसला होता. त्याला पाहून या तीन व्यक्तांपैकीं मिस्किल दिसणारी एक व्यक्ति म्हणाली,

"ओ हो! मिस्टर गोखले, तुम्ही? नी इराण्याच्या हॉटेलांत?"

बाकीच्या दोघांनींही प्रश्नार्थक मुद्रा केल्या. त्यांच्या चेहऱ्यावर एखाद्याला अधर्माचरण करतांना पकडल्याचें आसुरी हास्य दिसत होतें.

गोखले हंसत हंसत म्हणाला, "काय हो रेगे! मी नाहीं तर काय तुम्हीं यायचं?"

"शोभणा नाय रे ह्या तुकां." रेगे मालवणी भाषेंत पुटपुटला!

"भटांनीं ताळच सोडल्यानी." दुसरा उद्गारला.

"इराण्याच्या हॉटेलाखेरीज त्यांका 'चा' गोडच लागणा नाय!" तिसरा पुस्ती जोडीत म्हणाला.

"खरांऽ" गोखले त्यांच्या शब्दाच्या शेवटच्या अक्षराला ओढून बोलण्याच्या पद्धतीची टिंगल करणारा आवाज काढून म्हणाला.

भटानें मात्र धर्मानें वागलें पाहिजे, इतरांनीं वाटेल तसें वागण्यास मुळींच हरकत नाहीं, अशा समजुतीच्या ह्या तरुणांना गोखले तेथें येण्याचा हक्क दर्शवितो हें पाहून आश्चर्य वाटलेलें दिसलें.

गोखले उभा राहिला आणि वक्त्याच्या थाटांत म्हणाला, "मत्प्रिय मित्र हो, सांगतों ऐका. आम्ही चित्पावन मूळ इराणांतून हिंदुस्थानांत आलों असं कांहीं इतिहास-संशोधकांचं म्हणणं आहे. तें तुम्ही जाणत असालच—"

"होय, मग त्याचं काय?" रेग्यानें विचारलें.

"मग आमच्या पूर्वभूमींतील लोकांनीं येऊन हीं दुकानं उघडलीं असतां त्यांना आश्रय न देण्याइतके आम्ही स्वाभिमानशून्य खास नाहीं; उलट हें आमचं कर्तव्यच ठरतं. त्यांच्या पूर्वी आम्ही इकडं आलों, म्हणून आम्हीं आमच्या पूर्वदेशियांना विसरावं कीं काय?"

"जब्बरो रे बाबा!" रेगे टोपीनें वारा घेत उद्गारला.

"तर मग आतां सांगा, मी इथं येऊन अधर्माचरण करीत आहें कीं कर्तव्यपालन? आणि इथं यायचा हक्क माझा अधिक कीं तुमचा?"

"सैतानानं पवित्र ग्रंथाचा आधार देण्यासारखंच आहे हें." एकजण पुटपुटला.

"कसंही असो, हें माझं म्हणणं चूक आहे असं कांहीं तुम्हांला म्हणतां येणार नाहीं." गोखल्यानें म्हटलें.

"होय बाबा, होय; तुझंच म्हणणं बरोबर. मग तर झालं? आतां तुझं म्हणणं तरी काय?" रेग्यानें विचारलें.

'जितं मया' अशा थाटांत गोखले खालीं बसला; आणि म्हणाला, "माझं म्हणणं दुसरं काय असणार? माझ्या चहाचे पैसे तुम्हीं दिले पाहिजेत. बोलूनचालून भट आहें मी आणि तोही कर्तव्यपालन करणारा!"

सर्वांच्याच चेहऱ्यावर हंशा दिसला. आतां त्यांचें भाषण निराळ्या विषयाकडे वळलें.

* * *

कोंपऱ्यांतील खुर्चीवर बसून एक इसम वाचण्याचें पवित्र कार्य करीत होता. त्यानें 'इलस्ट्रेटेड विकली'चीं सर्व पानें पालथीं घातलीं आणि जाग्यावरून उठून पलीकडच्या टेबलावरील 'सन्डे क्रॉनिकल' पडला

होता तिकडे मोर्चा वळविला. तेथें बसून त्या अंकांतील मजकूर डोक्यांत भरल्यावर तो तेथून उठला आणि एकजण 'विविधवृत्त' वाचीत होता त्याच्यामागें जाऊन उभा राहिला. तो जसजसा पानें उलटीत होता तसतसा हा मजकुरावरून नजर फिरवीत होता. शेवटीं ज्याच्या हातीं विविधवृत्ताचा अंक होता त्याला आपल्यामागें लागलेल्या या समंधापासून सुटका करून घ्यावीशी वाटली आणि त्यानें वृत्ताचा अंक समोरच्या टेबलावर फेकला. पिंड टाकल्याबरोबर कावळा झडप घालतो त्याप्रमाणें ह्या वाचकानें त्या टेबलावरील अंकावर झडप घातली. तो हातीं घेऊन अथपासून इतिपर्यंत वाचणाऱ्या वाचकासारखा चाळण्यास सुरवात केली.

इतक्यांत पलीकडे बसलेल्या त्याच्याच वर्गात मोडणाऱ्या दुसऱ्या एका इसमाची दृष्टि त्या विविधवृत्तावर गेली आणि तो बोलला, "पाहूं जरा वृत्ताचा अंक. पहातों नी एका मिनिटांत देतों."

केवळ एका कटाक्षानें पक्ष्याला जाळणाऱ्या त्या पुराणप्रसिद्ध तापसाप्रमाणें पहिल्या इसमाच्या दृष्टींत दाहकता दिसत होती.

जणूं काय आपणच 'वृत्ताचे' मालक आहों अशा ऐटींत त्यानें त्या दुसऱ्या इसमाकडे पाहिलें आणि जरा कुऱ्यांतच उत्तर दिलें, "दिसत नाहीं का मी वाचतोंय तें?"

आणि एवढें बोलून त्यानें अंकांत डोकें खुपसलें!

बिचाऱ्या दुसऱ्या फुकट्या वाचकाला खीर खाणाऱ्या कोल्ह्याकडे करकोचा पहात राहिला तसें पहात रहावें लागलें!!

आतां मिळेल, मग मिळेल आणि आपण तो विविधवृत्ताचा अंक वाचूं या आशेनें हा दुसरा इसम पांच मिनिटें वाट पहात बसला. पण पहिला इसम त्या अंकाला जळूसारखा चिकटून राहिला होता. शेवटीं निराश होऊन दुसऱ्यानें हॉटेलबाहेर गमन केलें.

पहिल्या इसमानें त्या हॉटेलांतील सर्व पेपर वाचले. आतां केवळ माझ्यापुढें पडलेला नवशक्तीचा अंक राहिलासें पाहून तो माझ्या रोखानें येऊं लागला.

तें पाहून हॉटेलांतील पोऱ्यानें 'मैं लाता हूं' म्हणून सांगितलें आणि तो माझ्याजवळ आला.

" साब, ये अखबार आपकू मंगता है ? " त्यानें मला विचारलें.

मीं मानेनेंच नकार दर्शविला.

" तो जरा दे देता हूं " म्हणत तो अंक त्या इसमाला देऊन तो माझ्याकडे आला व म्हणाला, " ये लोक क्या खाली चा पिनेकु आते हैं ? एक आनेका चा पीना और सब अखबार पढना. "

मलाही कुतूहल होतेंच. मीं विचारलें, " इनको आकर कितना टेम हुवा ? "

" हुवा एक कलाक ! " तो तिरस्कारानें उत्तरला व मग त्यानें मला म्हटलें, " साब, आपके लिये क्या लाऊं ? "

" एक मस्का स्लाईस और एक पावणा. " मीं ऑर्डर दिली आणि त्या फुकट्या वाचकाच्या वाचनप्रियतेचें कौतुक वाटून मी त्याजकडे पाहूं लागलों.

चार पैशांचा चहा पिऊन वर सर्व दैनिकें व साप्ताहिकें वाचण्याच्या त्याच्या करामतीचें मला कौतुक वाटलें. माझा त्याच्याविषयींचा आदर वाढला. हॉटेलला लायब्ररीचें रूप देण्याच्या त्याच्या अजब कर्तबगारीबद्दल त्याला मनांतल्या मनांत धन्यवाद दिल्यावांचून माझ्यानें राहवलें नाहीं.

माझ्यापुढें आणून ठेवलेल्या मस्का–स्लाईसचा समाचार घेण्यांत मी गढून जातों तों माझ्या कानांवर भांडवलशाही, शेतकरी–कामकरी, लेनिन, सोव्हियट असे कांहीं शब्द आले. मागें वळून पहातों तर चारपांच बोडके तरुण मॉस्कोप्रणीत राजकारणाचा जोरजोरानें काथ्याकूट करीत आहेत. ह्या लोकांना चहाच्या कपावर आपल्या योजना स्वस्थपणें बसून ठरवायला इराण्याच्या हॉटेलासारखं दुसरं सोयिस्कर ठिकाण नाहीं.

नखशिखांत परदेशी गरम कपड्यांनीं नटलेला एक तरुण म्हणत होता, " या भांडवलवाल्यांनीं कामकऱ्यांच्या रक्ताचं शोषण चालविलं आहे, त्याला आळा बसलाच पाहिजे. "

आणि असें बोलतां बोलतां त्यानें चहा शोषून घेतलेला पावाचा तुकडा कपाबाहेर काढला आणि तोंडांत घातला !

माझ्या हा प्रकार नित्याच्या परिचयाचा असल्यानें तिकडे दुर्लक्ष करून मीं चहा पिण्यास सुरवात केली. सहज समोर नजर जाते तर एक इसम

कांहीं तरी पुटपुटत असल्याचें दिसलें. अर्थात् तो कवि तरी असावा, नाहीं तर वेडा तरी असावा. पलीकडे शाळेंत जाणारीं चारपांच पोरें आईस्क्रिम खात बसलीं होतीं.

डोक्यावर लाल टोपी असलेला एक कावडवाला वसईकर कोरा चहा घेऊन त्यांत दूध घालून पीत होता. तर अगदीं एका बाजूला बसून स्वस्थपणें सिगारेट ओढीत एकजण कसल्या तरी घोर विचारांत मग्न झालेला दिसत होता. त्याच्याजवळच्या टेब्लावर अर्धा चहा तसाच निवत टाकून एक पारशी रेसचे घोडे निवडण्यांत गढून गेला होता.

मध्येंच कुणी कांहीं तरी खरेदी करून जात होतें.

चहा पिऊन मी हॉटेलबाहेर पडलों तरी त्या इराण्याच्या हॉटेलांत आढळणारा सर्वसंग्राहकपणा माझ्या डोक्यांत फिरत होता. त्याच्या त्या राऊंड टेब्लाभोंवतीं हिंदुस्थानांतील यच्चयावत् जाती गुण्यागोविंदानें नांदतांना दिसतात. एरवीं एकमेकांच्या गळ्यावर धांवणारे हिंदु–मुसल्मान या ठिकाणीं गळ्यांत गळा घालतात. इराण्याचें हॉटेल म्हणजे पारशी, खिश्चन, हिंदु, मुसलमान सर्वांना मुक्तद्वार. हिंदुस्थानांतील सर्व जातींचें ऐक्य घडवून आणण्यास इराणी हॉटेलसारखें दुसरें साधन नाहीं.

हॉटेलच्या मालकाचा परिचय करून देतांना मीं त्याला 'प्रिझनर इन् द डॉक' ची उपमा दिली होती. एखाद्या सनातनी न्यायाधिशापुढें त्याला उभा केल्यास तो म्हणेल, "प्रिझनर इन् द डॉक! जातींमध्यें भ्रष्टाकार माजविल्याबद्दल मी तुला हद्दपारीची शिक्षा देत आहें."

—*—

# पेपरवाला




" इस्ट्यांडर, फिप्परेऽऽस ! "

पहांटे पांचाचा सुमार असेल. पेपरवाला तारस्वरानें ओरडत चालला होता. त्याच्या कांखेत एका गाढवाचें ओझें भरेल एवढे पेपर असतील ! ' गाढवाचे पाठीं साखरेच्या गोणी ' असल्या तरी त्याचा जसा त्याला उपयोग नाहीं, तद्वतच वर्तमानपत्रांचीं नांवेंही नीटपणें म्हणतां येत नाहींत अशा ह्या अक्षरशत्रु पेपरवाल्यास त्याचें काय होय ? किती बातम्या, केवढें ज्ञान, किती रहस्यें, किती गंमती आपण कांखोटीस मारून चाललों आहों याची बिचाऱ्याला कल्पनाही असणें शक्य नाहीं !

पण पेपरांत त्याला कांहीं कळत नसलें तरी ह्या पेपरांची किंमत जाणणारे कोण आहेत याची त्याला चांगली कल्पना आहे. सकाळच्या चहाबरोबर पेपर पाहिजेच अशी संवय असलेले, सर्वांच्या अगोदर ताज्या बातम्या वाचून लोकांवर इंप्रेशन पाडूं पहाणारे, फिगरवर पैसे लाविल्यामुळें कुठला फिगर आला म्हणून केव्हां एकदां पेपर पहातों अशा अधीर मनोवृत्तीचे आंकडेबाज, कोडीं सोडवून पैसे मिळवूं पहाणारे, आपल्या कोड्याचें उत्तर केव्हां पहातों म्हणून आतुर झालेले, भविष्य जाणूं इच्छिणारे, रेसच्या घोड्यांचें ' सिलेक्शन ' करण्यासाठीं मोती, टर्फ इत्यादि

पुस्तकें खरेदी करणारे, परीक्षांचे निकाल पहावयास उत्सुक झालेले, ही सारी मंडळी आपलीं खास गिऱ्हाईकें आहेत हें तो जाणतो. तसेंच या सर्वांना लवकरांत लवकर पेपर हवा असतो हें त्यानें बरोबर हेरलेलें असतें.

आणि म्हणूनच नाक्यावरील एजंटाकडून किंवा पेपरच्या कचेरींतून 'काप्या' मिळाल्या, कीं त्याच्या शरीरांत जणुं संचार झाल्यासारखा होतो! कर्कश शिटी वाजवीत बोगद्यांत शिरणाऱ्या आगगाडीप्रमाणें तोंडानें पेपरांचीं नांवें पुकारीत तो गल्लीबोळांत शिरतो. त्याच्या पायांची पंजाब मेल थांबवावयाची असेल तर 'ए पेपरवाला!' 'शुत् शुत्!' 'अरे ए लोकमान्य!' अशा शब्दांचे ब्रेक लावावे लागतात; पण असल्या ब्रेकनेंही ही गाडी फार काळ थांबवितां येत नाहीं. पेपर दिला, कीं याची पायगाडी पटकन् पुढें चालूं लागते.

पेपरवाला माड्या चढतो, जिने उतरतो, गल्ल्या धुंडतो, बोळ पालथे घालतो. चाळींतील माणसें चमकून उठतील एवढ्या 'गोड' सुरांत तो नांवें पुकारीत जातो. भात्यांतून बाण केव्हां काढतो आणि धनुष्याला केव्हां जोडतो तें कळतही नाहीं असें अर्जुनाच्या हस्तलाघवाचें वर्णन केलेलें आहे तोच प्रकार या पेपरवाल्याचा. कांखेंतील बाडांतून पेपर केव्हां बाहेर काढतो आणि तो दाराच्या कडींत केव्हां खोवतो वा खिडकींतून फेकून देतो त्याचा पत्ताही लागत नाहीं! एका क्षणांत हें काम उरकून तो धडधड जिना करीत केव्हांच उतरून जातो. त्याच्या पुडक्यांतून जसजसा एक एक पेपर बाहेर जातो तसतसें तें हलकें होत जातें आणि त्याचें हृदयही हलकें होऊन आनंदानें नृत्य करूं लागतें. हृदयाच्या या नर्तनाला खिशांत गोळा झालेल्या नाण्यांचा 'खुळखुळ' असा सूर साथ देत असतो.

* * *

पहांटेच्या प्रहरीं पेपरवाला पळत असतो, पण जसजसें उजाडत जातें तसतशी त्याची ही प्रवृत्ति मंदावते आणि मग तो एखाद्या नाक्यावर उभा रहातो. कारण या ठिकाणीं येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या गर्दींतच आपलें गिऱ्हाईक असणार हें तो ओळखून असतो.

तो पहा आपला पहांटेचा पेपरवाला नाक्यावर उभा आहे. हें ट्रॅमचें नाकें आहे. त्याच्या पायांना आतां काम नसलें तरी तोंडाची हालचाल चालूच आहे.

" ए ऽ पेपरवाला ! शुत् शुत् !! "

नाक्यावरून सुटलेल्या ट्राममधून एक इसम मागें वळून पहात तोंडानें 'शुत् शुत्' करून बोलावीत आहे. नुकतीच नाक्यावरून ट्राम चालू झाली असल्यामुळें आतां या ट्राममधून कोणी पेपर घेणार नाहीं, या खात्रीनें पेपरवाला आपल्याजवळ उभ्या असलेल्या दोस्ताची टिंगल करण्यांत गुंतला होता. तो आवाज ऐकून त्यानें आपले कान उभारले आणि तिकडे नजर फेकली. गिऱ्हाईक आपणांस बोलावीत आहे असें लक्षांत येतांच कांखेंतील वर्तमानपत्रांचं बंडल सांवरीत त्यानें पळावयास आरंभ केला. ट्रामगाडी व पेपरवाला यांची 'रनिंग रेसच' चालू झाली. या रेसमध्यें पेपरवाल्याचा जय झाला ! आपणास बोलाविणाऱ्या इसमाचा रुबाब पाहून हा 'टाईम्स' नाहींतर 'स्टँडर्ड' घेईल असें वाटून त्यानें हे दोन पेपर बाहेर काढले. हे पेपर पाहून त्या गिऱ्हाईकानें म्हटलें, " अं हं ! ते नको. 'मोती डेली' दे. " हें ऐकून पेपरवाला गारच पडला ! बंडलांत पहातो तर 'मोती' नाहीं. झालें; पुन्हां पूर्वजागीं येऊन स्टॉलवरून तो पेपर घेण्यासाठीं त्यानें पळण्यास प्रारंभ केला. अर्थात् दोन परस्परविरुद्ध जाणाऱ्या गणितांतील गाड्यांप्रमाणें ट्राम व त्याच्यामधील अंतर वाढत चाललें. पूर्वजागीं येऊन 'मोती डेली' घेतला आणि अतिशय वेगानें पळावयास सुरवात केली. तोंवर ट्राम दुसऱ्या स्टॉपजवळ गेली होती. पळत असतां वाटेंत येणाऱ्या गाडी–घोड्यांस, चालत्या लोकांस व मोटारींस न जुमानतां त्यानें ट्राम गांठली. तो पेपर देऊन व गिऱ्हाईकानें दिलेला आणि इतक्या प्रयासानें मिळविलेला आणा सुरक्षित खिशांत ठेवून तो आपल्या पूर्वस्थळीं पोहोंचला.

त्याला पाहिल्याबरोबर त्याच्या दोस्तानें म्हटलें, " काय मिळ्‌लं का नाय गिऱ्हाईक ? "

" हो हो ! " पेपरवाला विजयोन्मादानें ओरडला, " मी सोडतांय व्हय त्याला ? "

" ए लोक असा काय रे ? साला, टामरेल उभी रहाती तवा पेपर घेत न्हाई आणि चालू झाली कीं ' शुत् शुत् ' करून हांक मारते. "

" ए: ! " पेपरवाल्यानें पचकन् थुंकून तिरस्कार दर्शवीत म्हटलें, " साला लोकच असला ! पेपर घेईल पण साला सतावून घेईल ! "

" बरं तें जाऊं दे. च्यापानी काय देतोस काय ? "

" कसलां च्यापानी ! सकाळपास्नं सालं धा आणंत्री फायदा मिळ्ला नाय ! " खिशांतून पैसे काढून दाखवीत पेपरवाल्यानें म्हटलें.

" अरे नाय तर नाय. दोन पैसे तर देशील ? मी दोन पैसे घालतों. चल अर्धा अर्धा चाय पिऊं या. "

पेपरवाल्यानें आजुबाजूस एखादी ट्राम येत नाहीं ना म्हणून पाहिलें आणि ते दोघे शेजारच्या हॉटेलांत शिरले.

तेथें गेल्यावर " एक कप चहा आणि एक खाली बशी " अशी पोऱ्याला ऑर्डर देऊन ते गप्पांत रंगून गेले.

लोकांची पेपर घेण्याची वेळ जवळ जवळ टळून गेली होती. एखादें चुकार गिऱ्हाईक मिळेल तेवढेंच. पेपरवालाही आतां उभा राहून राहून थकून गेला होता. त्यानें आपल्याकडील पेपर कोपऱ्यावरच्या फुटपाथवर लावले आणि तो जवळच बसून राहिला. तो ट्राम स्टँडचा कोपरा असल्यामुळें गाडीसाठीं वाट पहाणारे उभ्या उभ्या त्याच्या पेपरवर दृष्टि फेकून तेवढेंच वाचन-सुख अनुभवीत होते !

इतक्यांत एकही दिडकी खर्च न करितां आपली वाचनक्षुधा शमविणारा एक फुकट्या वाचक तेथें आला. पसरलेलीं तीं नियतकालिकें पाहून त्याच्या डोळ्यांत आनंद चमकला. त्यानें आपल्या खिशांतून एक फर्मास विडी काढून पेटविली आणि दुसरी पेपरवाल्यापुढें धरून म्हटलें, " विडी ओढतोस का ? " आयती विडी मिळत असेल तर कोण नाकारतो ? पेपरवाल्यानें ती हास्यमुद्रेनें स्वीकारली. ते दोघे विडीचा धूर सोडूं लागले. पेपरवाला फुकट मिळालेल्या विडीच्या धूम्रपानांत आनंदून गेलेला आहे या भूमिकेचा उपयोग करून घेण्यासाठीं त्या फुकट्यानें प्रश्न टाकला,

" हल्लीं पेपर चांगले निघतच नाहींत. वाचण्यासारखं आंत काय असेल तर शपथ "

" मला काय त्यांत कळतंय म्हणा! पण पहिल्यासारखा पेपरला खप नाय खरा!"

" कसा असणार? आणि पेपर तरी किती निघाले आहेत! घेणाऱ्यानं काय काय म्हणून घ्यायचं?"

" होय तर काय? चार चार पेपर! ह्या पहा ना किती काप्या शिल्लक हायत त्या." पेपरवाल्यानें न खपलेल्या वर्तमानपत्राकडे बोट दाखवीत म्हटलें.

गृहस्थानें पसरलेल्या पेपरांमधून एक उचलला आणि वरवर वाचावयास सुरवात केली. त्यांतील हवा तो मजकूर वाचून झाल्यावर त्यानें तो खालीं ठेवून दिला. आणखी दोनतीन दैनिकें चाळून पाहिलीं. इतक्यांत पेपरवाल्यानें भिंतीला टेकून मासिकें लावून ठेविलीं होतीं त्यावर गृहस्थाची घारीसारखी नजर गेली. घार आपल्या भक्ष्यावर झडप घालते त्याप्रमाणें यानेंही मासिकांवर झडप घातली. त्यांतील एक एक उचलून चाळून पाहिलें आणि आतां पलीकडे 'इलस्ट्रेटेड विकली' होता तो त्याच्या दृष्टीस पडला. पण त्याला हात घालण्यापूर्वीं तो पेपरवाल्याकडे वळला आणि म्हणाला, " काय विडी विझली? ही घ्या ना काड्याची पेटी."

पेपरवाला पेटी घेऊन अर्धवट राहिलेलें विडीचें थोटूक पेटवीत आहे तोंच त्या गृहस्थानें पूर्वोक्त 'विकली' वर धाड घातली. त्यांतील एक एक पान उलटून चित्रें पहात व कांहीं मजकूर वाचीत त्यानें तो खालीं ठेवून दिला.

आतां बहुतेक पेपर वाचून झाले होते. एक टाईम्स राहिला होता, पण त्याला हात घालण्यापूर्वीं पेपरवाल्याशीं दुसरें कांहीं जिव्हाळ्याचें बोलणें जरूर आहे हें जाणून तो म्हणाला, " काय हो, हे न खपलेले पेपर परत घेतात काय?"

" कांहीं मालक घेतात, कांहीं नाहीं. त्यामुळं तर त्रास होतो ना?" आपल्या आवडीचा विषय निघाल्यामुळें बरें वाटून पेपरवाल्यानें सांगितलें, " पेपर खपला नाय तर पडला अंगावर."

" परत घेत नाहींत हें कांहीं बरं नव्हे." पेपरवाल्याला खुलविण्यासाठीं गृहस्थानें म्हटलें, " तुम्हां लोकांची गरीब स्थिति पाहून परत घ्यायला हवेत त्यांनीं."

" अहो, गरिबाचा वाली आहे कोण ? " पेपरवाला उद्गारला.

" होय, तर काय ? " असें पुटपुटत सहज अशा तऱ्हेनें गृहस्थानें टाईम्स चाळला आणि त्याच वेळीं म्हटलें, " दुसरी एक गोष्ट आहे. कुणाला पैसा टाकून पेपर विकत घ्यायला नको. जो तो फुकट वाचायला बघणार. शेजारीपाजारी आणि मित्र यांच्या पेपरवर भागवणार... "

" तुम्ही म्हणतां तें खरं, एक विकत घेतो आणि दहा वाचतात. पण त्याला काय करणार ? "

" काय करणार म्हणून म्हणण्यांत काय अर्थ नाहीं. कुणालाही फुकट म्हणून वाचूं देतां कामा नये. वाचायला मात्र पाहिजे आणि पैसे कांहीं खर्च करायला नको लेकाच्यांना ! "

आणि असें पुटपुटत तो गृहस्थ निघून गेला.

* * *

पेपरवाल्याकडे अजून बरेच पेपर विकावयाचे राहिले होते. विक्री झाली असली तरी तींतून म्हणण्यासारखा फायदा रहात नव्हताच. विषण्ण मनानें त्यानें आपल्या जीवनावर विचार केला आणि कांहींशा निराशापूर्ण मनःस्थितींत तो बसला. इतक्यांत—

" ए साला उठाव ! कर ते पेपर गोळा. मांडल्यान पेपर फुटपायऱ्येर आणि बसला ! फुटपायरी काय तुझ्या बापाची असा काय रे ? " असे कर्कश शब्द त्याच्या कानावर पडले. एकदम दचकून तो भानावर आला. आपण त्वकर उठलों नाहीं तर पोलिसदादा आपले पेपर गोळा करून नेईल या विचारानें त्याच्या पोटांत गोळा उठला. त्यानें सरसर पेपर गोळा करून तिथून काढता पाय घेतला. पोलिसाच्या नजरेआड एका रस्त्यावरील कोपऱ्यावर उभा राहून आपल्या कांखेंतील वर्तमानपत्रांवर आणि खिशांतील पैशांवर दुःखमिश्रित दृष्टि फिरवितांना तो दिसत होता.

पहांटेपासून जिवाचें रान करून, आरडून ओरडून पोट भरूं इच्छिणारा आणि तरीही अर्धपोटी रहाणारा बिचारा पे–प–र–वा–ला !

—*—




निठूर गिरिधारी चांगला मजबूत शरीराचा होता. आपल्या गांवीं पोट भरेना म्हणून आपल्या इतर बांधवांप्रमाणें 'पोट भरेना जेथें ऐसा देश काशाला ?' असा विचार करून त्यानें मुंबईचा रस्ता पकडला. त्याच्या डोक्यावर इंच दीड इंच रुंदीची पांढरी टोपी असून अंगांत गळ्याकडे कॉलर नसलेला व गुडघ्यापर्यंत पोहोंचणारा सदरा होता. कमरे-कडे लटकणाऱ्या सदऱ्याच्या लोंबत्या पिशवीसारख्या खिशांत त्याला लाग-णारें पानपट्टीचें साहित्य होतें. पायांत चढावा होत्या. डोक्याला बोटभर लांबीची व जाडीची शेंडी चिकटल्यासारखी दिसत होती. नेसूचें धोतर चांगलें कसून बांधलेलें असून तें जरासें गुडघ्याखालीं आलेलें होतें. एवढें सांगितलें म्हणजे निठूरचें स्वरूप ध्यानांत येण्यास हरकत नाहीं. त्याच्या शरीराची बाजू चांगली ऐसपैस वाढली असल्यामुळेंच कीं काय, त्याच्या बुद्धीची बाजू लंगडी पडली होती.

आपल्या गांवानजीकच्या स्टेशनवर गाडींत बसल्यापासून ही गाडी मुंबईलाच जाते ना असा प्रश्न तो उतारूंना विचारीत होता. पण अने-कांना विचारूनही त्याचें समाधान होत नसे. जो नवीन आणि साधारण शिकलेला असा इसम डब्यांत चढतांना त्याला आढळे त्याला तो हाच

प्रश्न करी. स्टेशनवरचा पोर्टर, तिकीट कलेक्टर, स्टेशनमास्तर व शेवटीं हिरवें निशाण दाखवून गाडीला निघण्याचा इशारा देणारा गार्डही त्याच्या तावडींतून सुटला नाहीं! गाडी दादरवर पोहोंचली तरीही त्याला ही गाडी मुंबईलाच जाते कीं नाहीं याची शंका वाटत होती! शेवटीं गाडी प्रत्यक्ष बोरीबंदरवर आली तरी उतरतां उतरतां, "क्यौं हो फलाणे? यही बंबई है ना?" म्हणून त्यानें फलाटावर उभ्या असलेल्या एका भय्याला विचारलेंच!

बरें; तो स्वतः मुंबईला आला तरी तिकीट मुंबईला येईल अशी त्याला खात्री नव्हती; कारण तिकीट मुंबईचें असलें तरच तें मुंबईला येणार! गाडींत बसल्यापासून त्यानें जशी गाडी मुंबईला जाते ना म्हणून विचारण्याचा सपाटा चालविला होता, त्याप्रमाणेंच प्रत्येक वाचत्या व्यक्तीला तो 'हें तिकीट मुंबईचेंच आहे ना?' म्हणून प्रश्न करी आणि होकारार्थी उत्तर आलें, कीं त्याची किंमत काय, तें कितीला घ्यावें असा दुसरा प्रश्न करी. तिकीट मुंबईचेंच व पैसेही दिले तेवढीच किंमत असें कळल्यावर त्याचा जीव पानपट्टीच्या डबींत पडे आणि तींतील एक पट्टी काढून तो मोठ्या प्रसन्नपणें चघळूं लागे. तरी पण अधून मधून शंका डोकावेच. कारण त्यानें असें विचारलें असतां एका फॅशनेबल तरुणानें तें तिकीट 'औरतका' असल्याचें सांगितलें होतें, त्यामुळें त्याच्या मनांत धागधुग होती. त्यानंतर दुसऱ्या एका दोघांकडे हें तिकीट बायकांचें नाहीं ना. अशी पृच्छा केल्यावर त्यांनींही गालांतल्या गालांत हंसत होकारार्थी मान हलविली होती. यामुळें मुंबईला प्रत्यक्ष उतरून स्टेशनबाहेर पडेपर्यंत त्याच्या जिवांत जीव नव्हता. आपल्यासारख्या पुरुषाच्या हातीं बायकांचें तिकीट पाहून तें आपण कोणा बाईचें चोरलें असावें या कल्पनेनें पकडल्यास अफाट मुंबईत आपली काय अवस्था होईल? शेवटीं बोरीबंदरवरील तिकीट कलेक्टरानें त्याच्याकडे हें 'नवें पार्सल' आलेलें दिसतें, अशा अर्थानें आपादमस्तक न्यहाळून पाहिलें तरी त्याला सरळ बाहेर जाऊं दिलें हें पाहून त्याच्या आनंदाला पारावर राहिला नाहीं. स्टेशनाबाहेर त्याचा गांवकरी 'बदरी' वाट पहात उभा होताच. "ओ! निठूर, तुम आ गये?" "हां बदरी, तुम कैसे हो" अशी क्षेमकुशल विचारणा करीत

दोघांनीं एकमेकांस मिठ्या मारल्या आणि आनंदित होत्साते घरीं जावयास निघाले.

बदरी हा एका दूधवाल्याकडे नोकरीस होता. तो बोरिवलीस रहात असे. अर्थात् निठूरला त्यानें आपल्या शेठकडे नेलें. शेठनें त्याला नोकरी-वर ठेविलें. नवीन इसमास शहरांत दूध घालण्यास पाठविणें शक्य नव्हतें. तेव्हां निठूरला म्हशीचें मलमूत्र काढण्याच्या कामावर नेमण्यांत आलें. ह्या कामावर नेमलेल्या इसमाला 'गोब्र्या' असें म्हणतात. त्याचें लठ्ठ शरीर, मठ्ठ डोकें आणि एक सोडून दहा टोपल्या टाकाव्या लागल्या तरी हूं कीं चूं न करण्याचा त्याचा बाणा यामुळें त्या चतुष्पाद प्राण्यांत हा द्विपाद प्राणी चांगलाच उठून दिसूं लागला! हें काम झाल्यावर गोठ्याच्या लगतच एक खाट टाकून तीवर तो पडून राही. ह्या नोकरींत त्याला पगार नव्हता. केवळ पोटावारी नोकरी करण्यांत त्याला कांहीं वाटत नव्हतें; पण त्याचा मित्र बदरी याला निठूरनें कांहीं पैसे मिळवावे असें वाटे आणि त्यानें मोरे खटपट चालविली होती.

आणि काय करायचा दुसरा एखादा व्यापारधंदा? निठूरचा देव-घेवीचा व्यापार (आळस देणें व झोंप घेणें) चांगला चालला होता! झोंप घेण्याच्या बाबतींत तो कुणाला हार जाणें शक्य नव्हतें. दोन वेळ खायला मिळतें आहे आणि भरपूर झोंप मिळत आहे यावर निठूर सुखी होता.

पण कोणाच्याही आयुष्यांत नेहमींच सरळवाहिनी नद्या आढळत नाहींत. निठूरच्याही आयुष्याची नदी आतां वळण घेणारसें दिसूं लागलें. त्याचा परममित्र बदरी याचे वडील वारल्यामुळें बदरीला घरची व्यवस्था पहाण्यासाठीं मुंबई कायमची सोडण्यावांचून गत्यंतरच राहिलें नाहीं. बदरीचें काम कोणाला द्यावें हा प्रश्न पडला. शेठच्या डोळ्यांपुढें निठूरची जाडजूड मूर्ति उभी राहिली. बदरीची पगारी नोकरी त्याला देणें योग्य होणार होतें.

आपण ज्या ज्या ठिकाणीं दूध घालतों त्या जागा बदरीनें त्याला नेऊन दाखविल्या. दोनचार दिवस त्याला तो वेगवेगळ्या ठिकाणीं घेऊन गेला आणि संभाळून रहा, गाडी पकडतांना काळजी घे, रस्त्यावरून

दुधाचे हांडे नेतांना नीटपणें ने, वेळच्या वेळीं दूध घालीत जा असें बजावून बदरीनें त्याचा मोठ्या कष्टानें निरोप घेतला.

झालें. निठूरच्या कामास सुरवात झाली. दुसऱ्या दोन भय्यांबरोबर त्यानें बोरिवलीहून निघणारी पहिली गाडी पकडली. अर्धवट झोंपेंतच तो गाडींत बसला. लहान मुलांना पाळण्यांत घालून हलवावें त्याप्रमाणें गाडीमध्यें हेलकावे मिळूं लागल्यामुळें त्याच्या जन्मजात निद्रेनें त्याला गांठलें. तो पहिल्यानें हलूं लागला, नंतर डोलूं लागला आणि शेवटीं दुधाच्या हांड्यावर त्यानें डोकें टेकलें! आजवर रात्रभर झोंप घेण्याची संवय असलेल्या निठूरची अशी अवस्था होणें साहजिक होतें. या रात्रीं त्याच्या कार्यक्रमांत व्यत्यय आला होता.

त्याला चांगलीच झोंप लागली. बरोबरच्या दोन भय्यांनीं दादर आलें असतां त्याला सावध करून डब्यांतून गमन केलें. यानें 'हां हां' म्हणून पुन्हां झोंपासुराचें आख्यान लाविलें; शेवटीं गाडी चर्चगेट स्टेशनवर आली आणि तिथल्या पोर्टरनें त्याला जागें केलें. त्यानें डोळे चोळीत इकडे तिकडे पाहिलें. गाडी स्टेशनांत उभी होती. डब्यांत कोणी नव्हतें. पोर्टरला त्यानें विचारलें, "ये इस्टेशन कोनसा है?" त्यानें म्हटलें, 'चर्चगेट.' यावर निठूरनें प्रश्न केला, "गिरांट रोड कहां?"

"वो तो दो इस्टेशन पिछे रहा. ये छेला इस्टेशन है." पोर्टरनें सांगितलें. हें ऐकल्यावर निठूर बावरल्यासारखा झाला. आतां काय करावयाचें? तो स्टेशनबाहेर पडण्यासाठीं निघाला तेव्हां दारावरील तिकीट चेकरनें त्याला पकडलें. त्याच्याकडे तिकीट होतें तें ग्रँटरोडचें. यामुळें त्याला जादा पैसे भरावे लागले. ते कसेबसे देऊन तो कावड घेऊन ग्रँटरोडला पायींच यावयास निघाला. विचारीत विचारीत एकदांचा तो ग्रँटरोडला येऊन पोहोंचला; तोंवर चांगलेंच उजाडून गेलें होतें. पांच वाजतां येणारा दूधवाला अजूनही आला नाहीं म्हणून पहांटे गरम गरम चहा प्यावयास सोकावलेल्या गिऱ्हाईकांचीं डोकीं गरम झालीं होतीं. जाईल तेथें 'ए कितना देर करता है? कल जलदी आना.' म्हणून थोडा दम व थोडी सूचना मिळूं लागली. निठूरनें ज्यांचा जेवढा रतीब होता तेवढा त्यांना विचारून घातला आणि आपलें काम संपवून एकदांचें

स्टेशन गांठलें. अर्थात् त्याला बोरिवलीस परतण्यास उशीर झाला, पण पहिलाच दिवस आहे म्हणून शेटनें तिकडे दुर्लक्ष केलें.

दुसऱ्या दिवशीं पहांटे धांवत पळत, धांवत पळत त्याला गाडी गांठणें भाग पडलें. कारण त्याला झोंपेमुळें निघण्यास जरा उशीर झाला होता. आज आपण गाडींत झोंपावयाचें नाहीं या निश्चयानें तो गाडींत बसला होता. पण इतके दिवस वास करणारी त्याच्या अंगांतील ही ' अक्काबाई ' त्याला लवकर सोडून थोडीच जाणार? गाडीच्या हलण्यानें आणि वाऱ्याच्या गार झुळुकीमुळें त्याला डुलकी येऊं लागली. पण आज त्यानें एक सावधगिरी घेतली होती. ग्रँट रोडला उतरणाऱ्या भय्यांना गांठून त्यांच्याबरोबर तो बसला होता. त्यामुळें स्टेशन चुकून पुढें जाण्याची धास्ती नव्हती. झोंप आली तरी बरोबरच्या भय्यांनीं त्याला जागें केलें आणि स्टेशनबाहेर पडून तो आपल्या गिऱ्हाईकांच्या चाळींकडे वळला. पहांटे साडेचार पावणेपांचची वेळ होती. रस्त्यावर म्युनिसिपालिटीच्या दिव्यांचा उजेड असल्यामुळें त्याला कांहीं जड गेलें नाहीं; पण तो एका चाळींत शिरला तेव्हां तेथील जिन्याजवळचा काळोख पाहून तो जरासा गोंधळला. जिना कुठें आहे का म्हणून त्यानें चांचपून पाहिलें, पण कांहीं अंदाज लागेना. तेव्हां खांद्यावरील कावड तिथेंच काळोखांत खालीं ठेवून त्यानें जिना शोधण्यास सुरवात केली. एका कोपऱ्यांत त्याला तो आढळला. आतां त्याला आपली कावड शोधण्याचें काम करावयाचें होतें. ती चांचपडत शोधून काढून त्यानें खांद्यावर घेतली व जिना चढावयास सुरवात केली. पहिल्या संकटांतून तो वांचला, पण आतां दुसरेंच संकट पुढें उभें राहिलें. वर चढतांना त्याला सगळ्याच खोल्या सारख्या दिसूं लागल्या. आतां दूध कुठल्या खोलींत घालावयाचें? त्याला साधारण आठवण झाली. जिन्याजवळची खोली असल्याचें बदरीनें सांगितलें होतें. त्यानें कावड खालीं ठेविली आणि त्या खोलीजवळ जाऊन दार ठोठावण्यास सुरवात केली. दार उघडलें गेलें; पण दूध किती घालावयाचें? पावशेर, शेर का दीड शेर? त्यानें मनांत ठरविलें आपण घालीत रहावें, गिऱ्हाईकानें पुरें म्हटलें कीं थांबवावें. खोलींतला इसमही झोंपेंत होता. त्यानें भांडें पुढें केलें. निठूरच्या डोळ्यांवरही

झांपड पडत होती तरी तिला दाद न देतां तो उभा राहिला. त्यानें भांड्यांत दूध घालण्यास सुरवात केली. एक दोन तीन–एकामागून एक पावशेरानें तो दूध ओतीत होता. गिऱ्हाईक आपल्याच गुंगींत होतें. भांडें भरावयास आलें तरी गिऱ्हाईक पुरे म्हणेना. निठूरनें भांडें भरे-पर्यंत दूध घातलें आणि आतां अधिक मावत नाहीं असें झाल्यावर तो थांबला. तो थांबलासा पाहून त्या गिऱ्हाईकानें भांडें आंत ठेविलें आणि धाडकन् दरवाजा बंद करून घेतला. निठूरनें कावड खांद्यावर घेतली आणि जिना उतरण्यास सुरवात केली. हातानें चांचपत एकदांचा सही-सलामत जिना उतरून तो चाळीबाहेर तर पडलाच. दुसऱ्या दोन चाळींत विशेषसा त्रास न पडतां त्यानें दूध घातलें आणि तिसऱ्या इमारतीकडे जाण्यास निघाला. आतां त्याला शेवटच्या मजल्यावर जावयाचें होतें. तो एकसारखा चढत राहिला. शेवटीं एकच खोली असलेल्या त्या मजल्यावर येऊन तो पोहोंचला. काळोख तर मी म्हणत होता. त्यानें कावड खालीं ठेविली. मग खोलीच्या कडीस धरून त्यानें खडखडा-विण्यास सुरवात केली. तो सारखा खडखडावीत राहिला. पण दार उघडण्याचें चिन्ह दिसेना! त्याच्या डोळ्यांवर झोंप तर मी म्हणत होती. त्या कडीला धरून तो खालीं बसला आणि खडखडावूं लागला. शेवटीं त्याचें हें वाजविणें कमी कमी होत जाऊन निठूरला तेथेंच डुलकी आली आणि कांहीं वेळानें तो घोरूंही लागला. त्याचा एक हात कडीवर तसाच होता!

असा तो किती वेळ निजून राहता कुणास ठाऊक! पण आंतल्या गृह-स्थाचा पहांटे 'साडेसात' वाजल्याखेरीज उठावयाचें नाहीं असा शिरस्ता असल्यामुळें त्यानें आपल्या रोजच्या वेळीं दरवाजा उघडला. पहातो तर एक भय्या कडीला धरून गाढ झोंपीं गेला आहे! त्यानें भय्याला गदगदां हलवून जागें केलें. तो खडबडून उठला. साफ उजाडलें असून सूर्य हातभर वर आलेला पाहून त्याला चरकाच बसला. कालच्याप्रमाणें आजही दूध उशीरां मिळालें म्हणून गिऱ्हाईकांची ओरड होणार. त्यानें पाहिलें, तर कावड जवळच होती; पण तींतील हांडे मात्र कुणा वलीनें साफ रिकामे केले होते! नशीब, हांडे तरी जाग्यावर राहिले; नाहींतर

शेठला तोंडच दाखवायला नको होतें! आतां ज्यांना दूध मिळालें नाहीं तें गिऱ्हाईक तक्रार नेणार, पण ती कांहीं लागोपाठ होणारी नव्हती. मुकाट्यानें बोरिवलीस जाणारी गाडी पकडून निठूर एकदांचा घरीं पोहोंचला.

दूध घालावयास जाणें म्हणजे त्याला एक दिव्यच वाटूं लागलें. सुरवातीसच असे अनुभव मिळाल्यामुळें तो भेदरून गेला. पण दूध घालण्यास जाण्याचें काम करण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. तो तिसरे दिवशीं दूध घालण्यासाठीं म्हणून तयार होऊन बसला. त्याची विलक्षण झोंप त्याला एकसारखी भेडसावीत होती. गाडी निघण्याच्या सुमारास त्याला डुलकी आलीच! मग तो दचकून जागा झाला व खांद्यावर कावड घेऊन जणूं पळतच सुटला. गाडी स्टेशनांत शिरत होती. रेल्वेच्या लोखंडी कुंपणाच्या दोनचार पट्टया काढून ' चोरवाट ' बनविण्यांत आली होती तींतून शिरून त्यानें गाडी तर मिळविलीच. आज गाडींत मुळींच झोंप न घेतां त्यानें जागें रहाण्याचा विक्रम केला. ग्रँटरोड स्टेशन आल्यावर तो सरळ खालीं उतरला. अशा तऱ्हेनें आज त्यानें बराच पल्ला गांठला. आतां काल ज्यांना दूध घालतां आलें नाहीं त्यांना अगोदर घालावें म्हणून त्यानें त्या इमारतींच्या रोखानें पाऊल टाकलें. पहिल्याच इमारतीच्या जिन्याच्या पायऱ्या मोठ्या और होत्या. त्या अगदीं ताठ असून दोन पायऱ्यांमधील अंतरही सर्वसाधारण असावें त्याहून अधिक होतें. आपली कावड सांवरीत एक एक पायरी निठूर मोठ्या मुष्किलीनें चढत होता. आतां तो दुसरा जिना चढूं लागणार, पण तेथें दिवा नसल्यामुळें पायरी समजून त्यानें पाय टाकला आणि तो जो कोलमडला तो गडगडत कावडीसह जिन्याच्या मुळाशीं येऊन पडला! त्याचें अंग चांगलेंच ठेंचाळून निघालें. सारें दूध सांडून जिन्याच्या पायथ्याशीं दूधसागर बनला. कावडींतील हांडे तर कुठेंच्या कुठें जाऊन पडले! अंग ठणकत होतें; तरी त्या दुःखापेक्षां आपल्या हातून घडलेला प्रकार भयंकर आहे हें ओळखून तो कसाबसा उठला. दूध तर सांडलेंच होतें; पण हांडे शोधून काढणें भाग होतें. त्या काळोखांत हें काम मोठें कठीण होतें. सुदैवानें चांचपडत चांचपडत त्यानें एक हांडा तर मिळविला; पण दुसऱ्याचा पत्ता लागेना! आतां उजाडल्याशिवाय दुसरा कांहीं हातीं लागणें शक्य नाहीं

म्हटल्यावर तो त्या एकुलत्या एका हांड्याला टेकून कोपऱ्यांत बसून राहिला. दोन्ही हातांत डोकें धरून बसलेल्या निठूरच्या डोक्यांत विलक्षण विचार चालले होते. गेल्या तीन दिवसांतील प्रसंगांनीं त्याला धक्काच बसला होता. आपल्या नशीबीं काय लिहिले आहे तो काशीविश्वेश्वर जाणे !

कांहीं वेळानें दुसरा एक दूधवाला त्या इमारतींत दूध घालण्यासाठीं आला. बॅटरीचा लाईट पाडून जिना चढायला सुरवात करणार तोंच त्याला निठूरची ही करुण मूर्ति दिसली. त्याच वेळीं निठूरलाही आपला दुसरा हांडा दिसला; पण कुठल्या स्थितींत? हांड्याची वर्तुळाकार स्थिति जाऊन तो चपटा बनला होता. तें दृश्य पाहून निठूरचें अंतःकरणच चेपटल्यासारखें झालें. त्या भय्यानें याला उठविलें आणि चार सांत्वनपर शब्द बोलून तो निघून गेला. यापरतें तो तरी काय करणार?

कोणाही गिऱ्हाईकाला आज दूध मिळालें नव्हतें. निठूरच्या डोळ्यांपुढें या भीतीपेक्षां त्या चेपटलेल्या हांड्याचें रूप धास्ती उत्पन्न करीत होतें!

निठूरसंबंधीं तक्रारी शेठकडे आल्याच होत्या. हांड्याची स्थितीही शेठनें पाहिली. निठूरला चांगलाच दम मिळाला व निठूरला शिक्षा म्हणून त्याचा चार महिन्यांचा न देण्यांत आलेला पगार जप्त करण्यांत आला!

दूधवाला होऊं पहाणारा निठूर पुन्हां 'गोबऱ्या' बनला!

—*—

# पानपट्टीवाला



खण् खणण् खण् खण् खण् !

आवाज एखाद्या घंटेसारखा येत होता. नवख्या माणसाला मागें वळून काय वाजतें तें पहावें अशी इच्छा झाल्याविना राहिली नसती. मागें दृष्टि फेकल्यास एक पंचविशींतील इसम दिसत होता. हातांतल्या लांकडी दांड्यानें त्यानें एका पितळेच्या भांड्यामध्यें आघात करण्यास सुरवात केली होती. जरा वेळानें त्यानें तो दांडा बाहेर काढला आणि काढतां काढतां त्या भांड्याच्या कांठावर पुन्हां दोनतीनदां आपटला. नंतर हा दांडा रस्त्यावर रूळ फिरवितात तसा एका पानावर फिरविला आणि रंगलेलें हें पान त्यानें तशाच इतर पानांजवळ ठेवून दिलें. ज्या ठिकाणीं हा प्रकार चालला होता तें पानपट्टीचें दुकान होतें हें काय सांगायला पाहिजे ?

पण याला केवळ पानपट्टीचें दुकान असें कोण म्हणेल ? चैत्रामध्यें बायका गौरीची आरास करतात त्याप्रमाणें त्यानें जणु आरासच केली होती. मागील बाजूस एक भव्य आरसा उभारलेला दिसत होता. उजव्या व डाव्या बाजूस छोटे छोटे आरसे लावलेले होते. एखाद्या हॉलमधील छताला चारी बाजूंनीं झालर लावावी तद्वत् ' फिगरचे ' छाप असलेलीं रंगीबेरंगी पाकिटें तेथें लोंबतांना दिसत होतीं. मधून मधून हिरवट व पिवळट रंगाच्या लॉटरीच्या तिकिटांनीं त्या झालरीला अपूर्व शोभा प्राप्त झाली होती.

घर पाकिटें व तिकिटें लोंबत होतीं, तर खालीं वेगवेगळ्या आकर्षक रंगाचीं सिगारेटचीं पाकिटें शिस्तबद्ध पद्धतीनें मांडण्यांत आलीं होतीं. ढगाआडून डोकावणाऱ्या चंद्रबिंबाप्रमाणें पाकिटांतील रुपेरी कागदाआडून एखादी सिगारेट बाहेर डोकावतांना दिसत होती. जवळच लाजरीची लहानशी कुंडी आपल्या हिरव्या नाजूक पानांनीं त्या दुकानाला शोभा आणीत होती. आरशाच्या कोपऱ्यांना आठवड्यांतील चालू सिनेमांचीं जाहिरातवजा रंगीत चित्रें लटकत होतीं. कांहीं चित्रचंद्रिकांचीं आकर्षक चित्रें मनाला मोह घालीत होतीं.

एका बाजूला पेटवून ठेवलेल्या उदबत्तीचा सुवास दरवळून राहिला होता. एकंदरींत मन प्रसन्न करील असें तेथील सर्व वातावरण होतें.

त्यानें आपले केस एखाद्या सिनेमा–नटासारखे वाढविलेले होते. वाऱ्यामुळें डोळ्यांवर येणारीं झुलपें तो मधून मधून सांवरतांना आढळत होता. त्याच्या हाताचीं बोटें रंगलेलीं दिसत होतीं.

सुरवातीस दिलेला खणखणाट केल्यावर समोर कोणी गिऱ्हाईक नसल्यानें त्यानें आपली नजर इकडे तिकडे फिरविण्यास सुरवात केली.

ही साधारण दहाची वेळ असल्यामुळें शाळेंत जाणाऱ्या मुलामुलींची गर्दी आणि ऑफिसांत जाणाऱ्या कारकुनांची धांवपळ चालू होती. पानपट्टीचें हें दुकान अगदीं नाक्यावर असल्यामुळें चारी दिशांनीं येणाऱ्या-जाणाऱ्या ट्रॅम गाड्या तिथें जरा थांबत; आणि रस्त्यावरच्या पोलिसाचा, परवानगी दर्शविणारा, खालीं झालेला हात पाहिला कीं चालूं लागत. आतां रस्त्यावरून जाणाऱ्या गाड्यांतील पुढच्या डब्यामधल्या डावीकडच्या दुसऱ्या व तिसऱ्या बाकांवर पानपट्टीवाल्याची दृष्टि गेली आणि तेथें एखादें प्रेक्षणीय ‘ चित्र ’ दिसल्यामुळें ती ट्रॅम नजरेआड होईपर्यंत तो पहात राहिला. ती गेल्यावर रस्त्यावरून जाणाऱ्या उडत्या पदरांच्या आणि लोंबत्या वेण्यांच्या नागकन्यकांवर त्याचे डोळे त्या जातील तसतसे फिरत राहिले. नंतर जरा वेळानें रस्त्यावर आकर्षक असें कांहीं नाहीं असें पाहून त्यानें ‘ तुझ्या डोळ्यांत पडलं चांदणं ग ’ ही लावणी गुणगुणायला सुरवात केली. तो असाच रंगून राहिला असता; पण—

" ए ऽ एक पान बनाव. पुना मसाला. "

असे शब्द कानांवर पडून तो भानावर आला. त्यानें समोर उभी असलेली व्यक्ति पाहिली आणि जवळच्या पानांच्या चळतींतून एक पान चटकन् उचलून एका तांबूस रंग चढलेल्या फडक्यानें पुसलें. आणि आतां पुढें काय अशा अर्थानें त्यानें त्या व्यक्तीकडे पाहिलें. त्याचा आशय त्या व्यक्तीच्याही ध्यानांत येऊन तिनें म्हटलें,

" सुखा कथ्था ! "

पट्टीवाल्यानें एक टिनची चपटी डबी उचलली आणि तिच्या चाळणी-सारख्या भोंकांतून त्या पानावर लावलेल्या चुन्यावर काताची पूड उडविली. मग समोर हारीनें लावून ठेवलेल्या चकचकीत पितळी ताटल्यांत भरून ठेवलेला, खोबरें, सुपारी, वेलदोडा, तमालपत्र, वगैरे पदार्थांचा मालमसाला थोडा थोडा टाकून त्यानें मसालावाली पट्टी बनविली व तिला लवंग खोंचून ती त्या व्यक्तीच्या हातीं दिली. अर्धा आणा टाकून ती पट्टी चघळीत ती व्यक्ति निघून गेली.

आतां पानपट्टीवाल्यानें एक मोठा अडकित्ता घेतला आणि सुपारी कातरून ठेवण्यास सुरवात केली. त्यानें हें काम कांहीं वेळ केलें असेल नसेल तोंच गोंड्याची लाल टोपी घातलेल्या एका इसमानें त्याला हटकलें,

" क्यौं भय्या ? मै न कहता था कीं मेंढी आ जायगी ? आयी ना ? दे दोस्त टाळी ! "

" टाळी ? अरे टाळी की क्या बात ? मेरेकु ऐसा हुवा था कीं तूं कब आ जायगा; और... "

" बस्, मत् बोलना यार ! मैं समझ गया !— "

" तो ये बताव, कीं कल् क्या आयगा ? "

" कल् ? मेरा सुनना है तो मै कहता हूं कीं यार, तूं सत्त्या खेल. सत्त्या मजबूत. सत्त्या लगाना. डरना मत्. "

" मैं डरनेवाला नहीं हूं. गया सो गमाया. अब कल् सत्त्या लगाऊंगा और कुछ जरूर कमाऊंगा. "

" अच्छा, यही बात सच है तो एक पान खिलाव यार ! "

"हां हां जरूर." म्हणत पानपट्टीवाल्यानें एक जाड व साधारण काळसर हिरवी छटा असलेलें एक पान उचललें. त्या मुसलमानाला कसल्या जातीचें पान हवें असतें तें त्याला बरोबर माहीत असावें. त्या पानावर चुना फांसून जवळच्या भांड्यांतील तो लालसर द्रव पदार्थ—तें चुना कात असलेलें मिश्रण—एका दांड्यानें पानाला फांसलें. त्यावर तुकडा सुपारी टाकली आणि शेजारच्या बाटलींतील तंबाकू घातला. मग तें पान गुंडाळून त्यानें त्या मुसलमानाच्या हातीं दिलें.

त्या गिऱ्हाईकानें ती पट्टी अलगद दाढेखालीं ठेवून दिली आणि पान-पट्टीच्या दुकानांतील एका चपट्या दगडावर ठेवलेला चुना बोटानें घेऊन त्यानें आपल्या जिभेवर ठेवून दिला. त्याची जीभ म्हणजे पान आणि जणुं त्यावरच तो चुना फांशीत होता! तपकीरबाज मनुष्याच्या घ्राणेंद्रियावर जसा सबंध बाटली ओतली तरी कांहीं परिणाम झालेला दिसत नाहीं, तसेंच याचें.

अति पान खाण्यानें याचीही जीभ चुना—प्रुफ झालेली असावी!

जातांना 'सच्चा पकडना, भुलना मत्' म्हणून इषारा देऊन तो लाल टोपीवाला निघून गेला.

आणखी कांहीं वेळ गेला. पानपट्टीवाल्यानें एक छोटीशी किसणी घेऊन तिजवर खोबरें किसण्यास सुरवात केली. इतक्यांत त्याच्या दुकानावरून कप—बशी यांचा खडखड आवाज करीत जाणारा एक पोऱ्या त्यानें पाहिला आणि त्याला म्हटलें,

"अरे ए पोरा! एक शिंगल आणि एक खारी घेऊन ये."

'होय' अशा अर्थाची मान हलवीत पोऱ्यानें गमन केलें.

पांचसात मिनिटांनीं चहावाला पोऱ्या आला. त्यानें आणलेला चहा पिऊन पानपट्टीवाला ताजातवाना झाला.

जरा वेळानें समोरून एक तरुण येतांना दिसला. त्यानें पानपट्टी-वाल्याकडे हास्यमुद्रेनें पाहिलें. यावरून त्याची व ह्याची जानपछान असावीसें दिसलें. दुकानासमोर आल्यावर दर्शनी आरशांत त्या तरुणानें आपलें रूप पाहिलें. आपल्या केंसांतून बोटें फिरवून ते सारखे केल्या-

सारखे केले; कांखेंतील वर्तमानपत्र सांवरलें आणि कांखेंतील टोपी काढून ती डोक्यावर ऐटबाज दिसेल अशी तिरकी ठेवून दिली.

आरशांत आपलें रूप न्याहाळून पहातां पहातां त्याच्या मुद्रेवर प्रसन्नता विराजमान झाली. आपण स्वरूपसुंदर असून आपल्या सौंदर्यावर सारी स्त्रीजात भाळून जाईल असें त्याला वाटे. रस्त्यानें आपल्यामागून येणारी प्रत्येक तरुणी जणुं आपला पाठलाग करीत आहे, एखादी स्वतःशींच हंसणारी स्त्री आपल्याकडे पाहूनच प्रेमळपणें स्मित करीत आहे आणि सहज समोरून येणारी युवती आपणाकडेच चोरटी दृष्टि टाकीत आहे असा याला भास होत असे. अशा या प्रेमवीराची व रसिक पानपट्टीवाल्याची चांगलीच गट्टी जमल्यास त्याला ' समानशीले 'शिवाय दुसरें काय म्हणणार?

त्या तरुणानें पान खाल्लें आणि—

" नका गडे, माझ्याकडे पुनः पुनः पाहूं
लाजाळुच्या रोपटीला दृष्ट नका लावूं "

असें गाणें गुणगुणत तेथून कूच केलें.

* * *

तीन वाजून गेले असल्यानें पट्टीवाल्याकडे गिऱ्हाईकांची गर्दी नव्हती. क्वचित् एखादें भुरटें गिऱ्हाईक आलें तर. त्यानें आतां आपली बसावयाची जागा साफसूफ करावयाला सुरवात केली. पितळेच्या पत्र्यानें मढविलेला भाग ब्रासो लावून चांगला चेहरा दिसेल इतका चकचकीत केला. ओल्या कातानें पितळी भांडें साफसूफ करून टाकलें. वाऱ्यानें जरा वांकड्या झालेल्या महात्मा गांधी व सुभाषबाबू यांच्या तसबिरी सारख्या केल्या. बसावयाच्या बाजूला कोंपऱ्यांत लोंबकळत असलेल्या छोट्या बालदींतील पाणी ओतून टाकलें. अशा तऱ्हेनें आपलें सर्व दुकान ' धुवुनि–पुसुनी ' स्वच्छ करून टाकलें आणि सर्व कांहीं ठाकठीक झालें आहे असें दृष्टोत्पत्तीस आल्यावर त्याच्या चेहऱ्यावर समाधान विलसलें.

सर्वत्र स्थिरस्थावर होतें. तात्पुरती का होईना शांतता नांदतांना दिसत होती. रस्त्यावरील रहदारीही बरीच कमी झाली होती.

पानपट्टीवाल्यानें आपल्या दुकानांतील दर्शनी आरशाच्या मागें असलेली एक नोटबुकवजा वही काढली, आपल्या खिशांतील बारीकसा पेन्सिलीचा तुकडा काढून तो त्या वहींतील पानावर लिहूं लागला. तारीख आणि आंकडा, तारीख आणि आंकडा याप्रमाणें एकापुढें एक त्या वहीमध्यें लिहिण्यांत आलेलें होतें. कुठल्या तारखेला कुठला ' फिगर ' आला याची त्यांत नोंद असल्यानें त्यावरून उद्यां काय येणार याविषयीं कांहीं आराखडे पट्टीवाल्यानें बसविले होते. त्यानें कांहीं आंकडे वहीवर लिहिले. प्रत्येक आंकडा लिहितांना पेन्सिलीचें शिसें तो जिभेवर ठेवून ओलावीत होता. मध्येंच आपल्या दुकानांत ठेवलेल्या अर्धा आणावाल्या पेपरांतही कांहीं तरी पहाण्यांत तो गढून जाई. अशा तऱ्हेनें अर्धा एक तास घालविल्यावर त्यानें कांहीं निश्चय केलासें दिसलें आणि ती चोपडी त्यानें आरशामागें ठेवून दिली.

पट्टीवाल्याचा धंदा म्हणजे लोकांना पानपट्टी देण्याचा, त्यांचीं तोंडं रंगविण्याचा ! पट्टी म्हणजे विडा. विड्याच्या नुसत्या स्मरणाबरोबर प्रणयप्रसंगांतील विड्याचें स्थान डोळ्यांपुढें उभें रहातें. अशा रंगदार वस्तूचा रात्रंदिवस व्यापार करीत असल्यामुळें पट्टीवालाही रंगेल बनत असल्यास आश्चर्य नाहीं. त्याचा हा स्वभाव बनण्यास दुकानावर येणाऱ्या रंगीन प्राण्यांचेंही कांहीं कमी सहाय्य होतें असें नाहीं

—*—

REFBK-0018188
१८१८८

## रंगभूमी गाजविणारीं आमचीं नाट्यप्रकाशनें

**ग. कृ. बोडस**
भगवा झेंडा १॥·
पूज्य गांधीजी १॥·
वासुदेव बळवन्त १॥·
छत्रपतीचा छावा ·॥·
महावीर कर्ण ·॥·
राणा प्रताप ·॥·

**स. अ. शुक्ल**
लोकसिंहासन १॥·
जयद्रथवध ·॥·
वीर अभिमन्यु ·॥·

**कै. वि. ह. औंधकर**
बेबंदशाही २
आग्र्याहून सुटका २

**नानासाहेब गोखले**
सेनापति तात्या टोपे ·॥·

**वि. ना. कोठीवाले**
जयमल्हार १॥·

**ग. पां. परचुरे**
जातिवन्त जवान १।·

**ह. वि. देसाओी**
दोन लग्नें ·।॥·

**मालती बेडेकर**
पारध १।·

**मधुकर राव**
लक्षाधीश १।·

**कै. श्री. कृ. ओक**
सिंहगर्जना १

**के. पां. परांजपे**
शेजारीपाजारी १॥·

**शां. गो. गुप्ते**
झुंझारराव झांशीवाली ·॥·

**प्रिं. मो. वा. दोंदे**
वनविहार १।·

**वि. रा. हंबर्डे**
सन १८५७ १॥·

**वि. ग. धारप**
पुढचें पाऊल १।·

**कै. न. दा. सरपोतदार**
चंद्रराव मोरे १॥·

**नाना कोचरेकर**
मानी मराठा १॥·

**सौ. मालती जोशी**
सुशिक्षित सासुरवास ·॥·

**मामा वरेरकर**
द्वारकेचा राजा १॥·

---

**ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगांव, मुंबओी ४**